

सूरज गाताडे
एल. सी. बी.
केस फाईल - 00

"एल. सी. बी."

# 'केस फाईल : 00' –

'अ मर्डर एट दि गॉड्स ओन प्लॅटू!'

(कादंबरी)

## सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# 'केस फाईल : 00'

सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिनरायटर्स असोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६११२

ई-मेल आयडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सॲप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: ६ मे २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

"एल. सी. बी."

'केस फाईल : 00' - 'अ मर्डर एट दि गॉड्स ओन प्लॅटू!'

(लेखक : सूरज काशिनाथ गाताडे)

# प्रस्तावना : -



नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. आशा आहे आपण मला विसरला नसाल. २०२० साल नंतर मी काही प्रकाशित केलं नाही. आणि त्यानंतर ही माझी पहिलीच कथा, जी प्रकाशित होत आहे. सुमारे दोन वर्षांच्या वरचा काळ आणि मी काही घेऊन येऊ शकलो नाही या बाबत मी ईसाहित्य टीमची आणि तमाम वाचकांची जे माझं तोडकं मोडकं लिखाण आवडून घेऊन माझ्या लिखाणावर आणि माझ्यावरही प्रेम, माया करतात, आपुलकी दाखवतात त्यांची मी मनस्वी माफी मागून दिलगिरी व्यक्त करतो. क्षमस्व....!!!

सतत वाचकांकडून मला विचारणा व्हायची, की नवीन कथा कधी घेऊन येतोय. परंतु मला ते शक्य व्हायचं नाही. आता हा प्रयत्न केलाय त्याला वाचक पसंती देतील अशी आशा व्यक्त करतो.

दरम्यानच्या काळात लिहायची इच्छा होत असली, तरी लिहणं आपण विसरलोय, की काय असं वाटत होतं. लिहायला घेतलं, तेव्हा आता परत आपल्याला लिहायला जमेल का अशी भीतीही वाटून गेली, तरीही हा प्रयत्न केला

आहे. अगदी शब्द न सुचणे, भावना व्यक्त करताना शब्द न सापडणे, वाक्य रचना तयार न होणे अशा घटनाही घडल्या, तरी अखेर कथा पूर्ण केलीच...

सदर कथा ही अमेरिकेत वीस एक वर्षांपूर्वी घडलेल्या घटनेवरून प्रेरित आहे, परंतु या कथेतील सर्व पात्रे, कथावस्तू, कथेत घडलेले गुन्हे, घडलेल्या सर्व घटना, या पूर्णतः काल्पनिक असून माझ्या मस्तिष्काची उपज आहेत हे मी नमूद करू इच्छितो.

ही कथा कोल्हापूर लोकल क्राईम ब्रँचवर आधारित  असून तपासाशी संबंधित ज्या फॉरेन्सिक सायन्सच्या शोधप्रक्रिया यात दाखवल्या आहेत, त्यास खऱ्या आयुष्यात बराच वेळ लागतो. त्या पद्धती या वेळ खाऊ आहेत, परंतु कथा लांबू नये, कथा निरस होऊ नये, तर ती रोचक व्हावी, उत्कंठा टिकून रहावी यास्तव कथेची मांग म्हणून फॉरेन्सिक एनलिसिसची प्रोसेस लवकर लवकर झालेली अशी दाखवलेली आहे.

इतक्या अवकाशांतर मी जे काही मोडकं तोडकं आपल्या समोर जे सादर करत आहे, ते गोड मानून घ्यावे आणि वाचून जी काही समीक्षा करावयाची आहे, ती वाचकांनी करावी ही नम्र विनंती. आपल्याला आवडले, नाही आवडले, काहीही असो, कळवावे ही सादर विनम्र विनंती... धन्यवाद!!!!!!

जाणकार सुजाण वाचकांना सादर अर्पण...



# १. निद्रिस्त प्रियसी...

रात्रीच्या गडद छायेने आपली काळी चादर आसमंतात अंथरली होती. गर्द काळोख अंधारात एक चारचाकी सुमसान रस्त्यावर एकटीच आपल्या हेड लाईट्सचा प्रकाश दूरवर फेकत घाटातून वरच्या दिशेने प्रवास करत होती.

त्या गाडीत एक तरुणी तिच्या मध्यमवयीन प्रियकरासोबत प्रवासात होती...

**"सांग ना कुठे जातोय आपण?" लाडात येऊन तिने आपल्या प्रियकराला विचारलं.**

त्याचं असं हे अचानकच रोमँटिक, प्रणयसूचक वागणं तिच्यासाठी जरा आश्चर्याचंच होतं. परंतु हे आश्चर्य त्या भोळ्या व निष्पाप मुलीसाठी आनंददायक होतं.

**"सरप्राईज आहे." तो तिला लाडिक व प्रेमळ म्हणाला.**

**"असं अचानक?" तिने आपल्या आश्चर्याला शब्दांची वाट मोकळी करून दिली.**

ती विस्मयचकित असली, तरी बेहद्द खुश होती. आपला प्रियकर आपल्यावर प्रेम बरसवत आहे याचं तिला कोण कौतुक वाटत होतं... निरागस अशा तिच्या या भोळ्या प्रश्नावर तो हसला.

**"सरप्राईज असं अचानकच देतात ना बेबी... नाही तर त्याला सरप्राईज कसं म्हणायचं...?" तो तिला म्हणाला.**

आणि तीही हसली. तिच्या प्रश्नातील अल्लडपणा तिच्याही लक्षात येऊन गेला त्याच्या लाडिक प्रतिप्रश्नांने.

त्यांचे हे प्रेमी-युगुल संवाद चालू असतानाच त्यांची ती गाडी घाटातीलच जंगलात शिरली.

गर्द झाडीत शिरून ती गाडी न थांबता प्रवास करत एका पठारावर येऊन स्थरावली. आजूबाजूला दूरवर एक झाड नव्हतं इथं. काय असेल, तर ती फक्त लाल-काळी माती...

दूरवर आकाशात स्वच्छ चांदणे सांडलेले आणि खाली लांबपर्यंत शहर-गावांच्या दिव्यांचे आच्छादन पसरलेले असे मनोहारी दृश्य नजरेच्या टप्प्यात आले आणि ती तरुणी प्रफुल्लित होऊन गेली.

भविष्याच्या गोड वेधाने तिचे मन भारावून गेले होते. असंख्य सुखस्वप्नं तिच्या मनी तरळत होती.

प्रेमभऱ्या नजरेद्वारे व्यक्त होत ती एक शब्दही न उच्चारता आपल्या प्रियकराकडे पाहू लागली आणि...

गाडी जंगल-झाडीतून पठाराच्या मधोमध स्थावर झाली.

गाडी चालवणारा तो प्रियकर, तोंडातील सिगरेट काढून त्याने राख झटकली. राख गाडीतच त्याच्या पायांत पडली. सिगरेटच्या धुराचे वलय त्याच्या भोवती पसरत होते. अचानकच एका गुढतेने त्याला घेरल्याचा भास व्हावा असं काहीसं ते चित्र उभं राहू लागलं होतं.

पॅसेंजर सीटवर ती निर्मळ मनाची तरुणी. आपल्या प्रियकरावर पूर्णतः विश्वास ठेवून इथंवर आलेली ती प्रियसी... या वातावरणात पसरत जाणारी ही गूढता तिच्या बिचारीच्या ध्यानी येत नव्हती.

वीस-बावीस वर्षांची ती तरुणी अत्यंत सुंदर होती. तिने आकर्षक केशभूषा केली होती. उंची व महागातला सलवार सूट तिने परिधान केला होता. आपल्या प्रियकराने बहुत दिवसांनी तिला असं कुठे फिरायला आणलं होतं, त्यामुळे कोणता किंतु मनात न ठेवता ती निर्भेळ मनाने अशी मनमोकळी त्याच्यासोबत बाहेर आली होती.

दरम्यानच्या काळात त्यांच्यात काही वाद उभे राहिले होते. त्या साऱ्याचा निचरा करण्यासाठीच दोघे असे बाहेर फिरण्यास आले होते. आणि याच मिष्ट भावनेने ती बहरली होती. तिचा तो हसतमुख उजळ चेहरा... खूप बोलका होता. शब्दांवाचूनही ती आपल्या प्रियकराशी खूप काही मौनातच बोलत होती. ते मुखा वाटे स्पष्ट उद्धृत न झालेले, पण मौनातून असंख्य वेगाने आलेले तिचे बोल त्याच्यापर्यंत हमखास पोहोचत होते, परंतु तो...

तो मात्र खोल भीषण अंधाऱ्या डोहात हरवल्यासारखा होता. तिला आपल्या मनातील विचारांची प्रचिती येऊ नये इतकीच काळजी घेत तो आता तशीच तिला प्रतिक्रियाही देत होता.

**"रोमॅंटिक! इजंट इट?" त्याने तिला विचारलं. तो भावनारहित शुष्क होता.**

त्याच्यातील अविचलता ध्यानी न येऊन तिने त्याच्या खांद्यावर आपलं डोकं स्थिरावलं. गाडीच्या विंडशील्ड् मधून बाहेर ती भारावून आकाशातील

चांदणं आणि झगमगणारी दूरवर पसरलेली गांवं, शहरं पाहत होती. त्यांच्यातील ती चमक हिच्याही डोळयांत झगमगत होती.

**"एक्चुली!" ती म्हणाली आणि त्याच्याकडे लडिवाळपणे अतीव प्रेमाने तिने पाहिले,**

**"पण... इथे का आलोय? म्हणजे... कुठं दुसरीकडं जाऊ शकलो असतो. मग इथं..." तिने विचारलं.**

**"म्हंटलं ना बेबी; सरप्राईज आहे." पुनःश्च उत्तर टाळत तो इतकंच म्हणाला.**

आश्चर्य करत आनंदी चेहऱ्याने तिने त्याच्याकडे नजर केली.

**"आज काय झालंय काय? हं? इतकं प्रेम?!" ती मस्करीत म्हणाली.**

खूप दिवस तो तिला टाळत होता. आणि आज त्याचं असं ओतप्रोत प्रेम तिच्यासाठी आल्हाद होतं. वादाने दोघांत उभारलेलं अंतर कमी व्हावं यास्तव आपला प्रियकर प्रयत्न करतोय याचं तिला अप्रूप वाटत होतं. आपणही तणाव कमी करावा म्हणून ती मस्करी करत होती.

त्याने तिच्या चेष्टेत विचारलेल्या प्रश्नाचं काहीच उत्तर दिले नाही. तो तसाच गाडीतून उतरला. सिगरेट पुन्हा दातात दाबली.

काही अंतर गाडी समोर चालून गेला तो. चालत असताना तो अंगातील ट्रॅकसूटच्या खिशातून काही तरी काढून हाती घेत होता.

त्याच्या हातांची थोडावेळ काहीतरी हालचाल झाली आणि...

अचानक तो मागे वळला. त्याच्या हाती काही तरी चमकलेलं तिला दिसलं. पण ते नक्की काय हे समजायला तिला पळांचा वेळ गेला...

दरम्यान त्याच्या हातातील रिव्हॉल्व्हरची सेफ्टी ऑफ करून त्याने हॅमर मागे खेचला. त्या सुमसान व बेआवाजाच्या ठिकाणी चेंबर फिरतानाचा तो सूक्ष्म आवाजही भलता मोठा झाला.

गाडीतच बसून असलेल्या त्या मुलीला आतापावेतो चित्र स्पष्ट झालेलं होतं. आपल्या प्रियकराचा इरादा समजताच ती क्षणात भयग्रस्त झाली. इतकी, की बसल्या जागी ती जडवत झाली होती. गाडीतून उतरून बचावासाठी पळून जाण्याचा विचार देखील तिच्या मनी-मस्तिष्की तिळमात्र कुंधला नव्हता.

भीतीने तिचा चेहरा ताणला गेला. डोळे अविश्वासाने मोठे होत विस्फारले. हायपर होणाऱ्या तिचा श्वास मोठा... मोठा झाला. प्राणांतिक भीतीने तिच्या सूंदर मुद्रेला झाकोळून काळवंडून टाकले होते. जणू चंद्राला ग्रहण लागले असावे...

इकडे त्याचे बोट रिव्हॉल्वरच्या ट्रिगरवर दाब वाढवू लागले होते व रिव्हॉल्वरचे चेंबर फिरताना तिला सुस्पष्ट दिसत होते.

अखेर; त्याने रिव्हॉल्व्हर चालवली. रिव्हॉल्व्हर मधून गोळी सुटली!!!

त्या दरीत बंदुकीचा मोठाला आवाज घुमला, परंतु ऐकायला तिथं कोणी नव्हतं. गाडीच्या हेडलाईट्सच्या प्रकाशात गोळी चालवणारा तो प्रियकर निश्चल उभा होता. त्याच्या तोंडातील सिगरेटने निघणारा धूर आकाशभर पसरत चालला होता.

ती गोळी त्या निष्कपट कन्येच्या मस्तिष्कात घुसल्यानंतर सगळं कसं शांत... शांत झालं. ती रचत चाललेले सुखी जीवनाचे इमले त्या गोळीच्या आघाताने क्षणार्धात कोसळले होते.

रिव्हॉल्व्हर मधून फक्त पांढरा धूर निघत होता...

ती निरागस प्रियसी त्या गडद रजनीत त्या निबिड अरण्यातील त्या सुमसान पठारावर निश्चल अशी अनंत काळासाठी कायमस्वरूपी अशी निद्रिस्त झाली होती...

◆◆◆

दुसरा दिवस, अगदीच सकाळची वेळ. उजेड होता पण प्रखर ऊन नव्हतं. उन्हाला कोवळीक होती. आणि तशा उन्हात पोलीस त्या कोवळ्या पोरीचा पंचनामा करण्यात व्यस्त होते. कोण्या एका गडावरच्या माणसाने सदर परिस्थिती पाहून तिथल्या डोंगराच्या माथ्यावरील पोलीस आऊट पोस्टला वर्दी दिली होती. आणि पोलिसांनी लागलीच येऊन पाहणी सुरू केली होती.

प्राप्त घटना सदर ठिकाणी तशी पहिलीच. तशात हा...

**'देव ज्योतिबाचा गड! वाडी रत्नागिरी!'**

आणि तिथं असा खून!

म्हणूनच पोलीसांनी लागलीच पायांना चाकं लावली होती. इथं येऊन परिस्थिती पाहताच मग त्यांच्याकडून वाडी रत्नागिरी ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत

येते त्या कोडोलीच्या मुख्य पोलीस ठाण्याला रिपोर्ट केलं होतं. तिथल्या प्रभारीला देखील हा धक्काच होता. त्यामुळे त्यानेही गती घेत घटनास्थळी पोहोच मारली होती. आणि आता घटनेची रीतसर पाहणी व पंचनामा चालू झाला होता...

'पोलीस कॉशन लाईन' गुन्हा घडलेल्या त्या फोर व्हीलरच्या चारी बाजूंनी लावली होती. कोल्हापूर पोलिसांचे बॅरिकेट्स लागले होते. लोकांना घटनास्थळापासून दूर ठेवण्यासाठीचा हा प्रपंच.

दोन पोलीस व्हॅन्स, दोन-चार जिप्स तिथपासून दूर उभ्या होत्या. 'त्या' चारचाकीचा व त्या चारचाकीतील तरुणीच्या मृतदेहाचा पंचनामा सुरू होता. घटनास्थळाची हलवाहलवी करण्यापूर्वी काय काय नेमकं कसं होतं, व त्याच्याशी छेडछाड झाली नाही हे लक्षात यावं यास्तव रेकॉर्ड्ससाठी फोटोज काढले जात होते.

ड्रायव्हिंग सीटकडील गाडीचा दरवाजा उघडाच होता. गाडीच्या विंडशिल्डला एक-दीड सेंटीमीटरचं होल पडलं होतं. पॅसेंजर सीटवरील त्या मुलीचं डोकं गोळीने छेदलं गेलं होतं. रक्त नाकाच्या दोन्ही बाजूंनी येत तिच्या हनुवटी पासून खाली ओघळून वाळलेलं होतं.

तिचे रेशमी कपडे रक्ताने भिजून सुखले होते. काचेचे तुकडे बारीक पण थोडेसेच तिच्या मांडीवर पडले होते. तिचा डावा हात देखील गोळीने भेदून त्याला छिद्र पडलं होतं. ते विदारक दृश्य पाहून 'कोडोली पोलीस स्टेशन'चा इंचार्ज असलेला सब-इन्स्पेक्टर किरण माने बाजूला सरकला. त्याच्या मागे ज्योतिबा पोलीस चौकी इंचार्ज नरेश पाटील होता. त्यांच्यासाठी असं खून प्रकरण नेहमीचं

नसलं, तरी पोलीस म्हणून आशा गोष्टी सवयीच्या असल्याने त्यांच्यावर या विदारक देखाव्याचा काही फरक पडला नव्हता.

पंचनामा करणाऱ्यां व्यतिरिक्त चार-सहा कॉन्स्टेबल्सही त्यांना मदत म्हणून तिथं हजर होतेच.

**"गाडीत काही सापडतंय का बघा जरा." किरण नरेशला सूचना करत म्हणाला.**

नरेश मग स्वतःच गाडी तपासू लागला... काहीवेळाच्या तपासाअंती नरेशला गाडीत त्या मुलीच्या सीट खाली एक मोबाईल सापडला. तो गाडीतील मोबाईल घेऊन नरेश पाटील सब-इन्स्पेक्टर किरणकडे आला.

**"सर, हा मोबाईल सापडलाय गाडीत." नरेश बोलला.**

सब-इन्स्पेक्टर किरणने तो मोबाईल घेतला आणि खिशातून किल्ली काढून तिचा स्टायलस प्रमाणे वापर करून मोबाईल ओपन होतो का ते त्याने पाहिलं. त्याला मोबाईल लॉक आढळला.

**"पासवर्डाय." किरण बोलला आणि त्याने नरेशकडे पाहिलं,**

**"बातमी कळवलेला माणूस कुठाय." किरणने नरेशला विचारलं.**

**"आहे सर. थांबवून घेतलाय त्याला." नरेश बोलला.**

**"इकडं बोलवा." किरणने फर्मावलं.**

थोडं दूर एक गावकरी  एकटाच उभा होता. त्याच्याकडे नरेश आला.

**"सायबांनी बोलावलंय." नरेश त्याला म्हणाला.**

आणि तो पुन्हा सब-इन्स्पेक्टरकडे चालला. त्याच्या मागून गावकरी पावलावर पाऊल टाकत आला. तो बराच चिंतेतच होता. भलाई म्हणून पोलिसांना कळवून आपण भलत्यात उचापतीत अडकलो हा भाव त्याच्या मुखावर स्पष्ट होता.

दोघे सब-इन्स्पेक्टर किरणकडे चालले होते. तोच सब-इन्स्पेक्टर किरण गाडीकडे आलेला होता. त्याने त्या मुलीच्या मृत चेहऱ्यासमोर मोबाईल धरला.

इतक्यात नरेश व तो जगदीश नांवाचा गावकरी त्याच्यापाशी पोहोचले. मोबाईलच्या फेस रेकग्नेशन फिचरमुळे मोबाईलचे लॉक खुले झाले. सब-इन्स्पेक्टर किरण ती मुलगी मेलेल्या गाडीला टेकून पायावर पायाची घडी टाकून रेलला आणि त्या गावकऱ्याकडे न पाहता मोबाईल बघत त्याच्याशी संवाद करू लागला...

**"नांव काय तुमचं?" किरणने त्यास विचारलं.**

**"जगदीश कांबळे, साहेब." तो गावकरी उत्तरला.**

**"तुम्हाला कसं कळलं या बद्दल? म्हणजे तुम्ही इथं का आलता?" किरणने त्याला आपल्या खाक्यात विचारले.**

वास्तविक त्याचा तसा मानस नव्हताच. पण पोलिसी सवयीने आलेला तो अंगवळणी अविर्भाव होता. परंतु त्याचे हे स्वाभाविक वर्तन जगदीशला आरोपीच्या पिंजऱ्यात आपल्याला उभे केल्याचे मनोमन त्यास भासवून गेले. आणि जगदीश चांगलाच चरकला.

**"जरा आडोशाला आलतो, तवा दिसलं बगा." बिचकतच जगदीश म्हणाला.**

किरणला प्रथम काही समजलंच नाही. त्याने संदिग्ध नजरेने पहिल्यांदा जगदीशकडे बघितलं आणि...

**"आडोशाला?" त्याने जगदीशला विचारलं.**

**"हा." जगदीश एकदम सहज साळसूद उच्चारला. जणू याचा अर्थ सर्वज्ञात आहे.**

आणि त्याचा तो भोळा चेहरा पाहून मग कुठे सब-इन्स्पेक्टर किरणला समज आली आणि तो खुदकला. मग पुन्हा मोबाईलमध्ये नजर गाडून तो मोबाईल स्क्रोल करू लागला.

बस!

अचानक चेहऱ्यावरचा रंग उडला किरणच्या. गुन्हा घडलेल्या कारला टेकलेला तो त्याच्याही नकळत ताठ उभा झाला. त्याचे मुखमंडल चिंता व अविश्वास याने भरून गेले.

त्याचा फिका पडलेला चेहरा नरेश पासून लपला नाही.

**"काय झालं सर?" नरेशने भाळी आठ्या पाडत विचारलं.**

त्याच्या कंठनादाने भानावर येऊन किरणने नरेशकडे पाहिलं.

**"सांगतो." धक्कावलेला तो नरेशला म्हणाला आणि त्याने जगदीशकडे पाहिलं,**

**"तुम्ही एवढ्यात मी सांगेपर्यंत गाव सोडू नका."**

नरेशच्या या आदेशाने जगदीश जोराचा भिलाच. 'आता या खुनाचा आपल्यावरच आरोप येतोय की काय?' ही त्याला जबर भीती वाटून गेली.

**"पन सायेब, मी काय केलंय...?" तो घाबरून उच्चारता झाला.**

त्याच्या प्रश्नाला उत्तर द्यायला सवड मात्र नव्हती किरणला. त्याने सपशेल जगदीशकडे दुर्लक्ष केलं आणि नरेशला काही सूचना घाईतच त्याने केल्या,

**"यांचं स्टेटमेंट घ्या. आणि पंचनाम्या सोबतच महत्त्वाच्या ठराविक नोंदी पण घ्या. प्रकरण मोठं आहे. पंचनामा झाल्यावर सुद्धा कुठलीच गोष्ट हलवू नका! मी आलोच!"**

स्वतःचा मोबाईल खिशातून काढून फोन लावतच किरण तिथून वेगवान पळाला.

नरेश असमंजस असा तिथंच उभारला होता, तर जगदीश रडवेला होऊन जाणाऱ्या किरणला बघत हतबुद्ध थांबला होता. 'कशात अडकलो?' असे त्याच्या चेहऱ्यावर चिंतीत वैतागी भाव झकळत होते ते कोणा येऱ्यालाही स्पष्ट जाणवले असते...

**पण... असं नेमकं काय समजलं होतं सब-इन्स्पेक्टर किरण मानेला, की तो इतका बेभान झाला...???**

# २. राक्षसाचे आगमन...

कोल्हापूरचे पोलीस मुख्यालय. कसबा बावडा येथ स्थित ही वास्तू बाहेरून पाहिली की नेहमी तशी शांतच दिसते. परंतु जिल्हा पोलिस यंत्रणेचे काम पाहणारी ही इमारत आतून नेहमीच कामात व्यग्र असते.

त्या दिवशीही नेहमी प्रमाणे हेडकोर्टर्सचं ओढाताणीचं कामकाज चालू होतं. ऑफिसर्स, कॉन्स्टेबल्स, काही गाड्या यांची ये-जा सुरू होती. कुणाच्या हाती फाईल्स होत्या, तर कुणाच्या हाती काही गुन्हेगार व आरोपी...

आतमध्ये 'सुप्रीटेंडेंट ऑफ पोलीस' - निरंजन घोलप!'

निरंजन घोलप, वय पंचेचाळीस-पन्नासच्या दरम्यान, बारीक केस काळे-पांढरे असे ग्रे शेड झालेले, नीटनेटक्या युनिफॉर्ममध्ये आपल्या डेस्क जवळील खुर्चीवर बसलेले होते.

लँडलाईनवर त्यांचा कोणाशी वार्तालाप चालू होता. निवांत असलेली त्यांची मुद्रा पलिकडून आलेल्या बातमीने अचानक गंभीर आणि भयप्रद झाली.

ते धक्क्याने ताडकन उठून उभा राहिले.

सब-इन्स्पेक्टर किरण मानेने परिस्थितीची गंभीरता ध्यानी घेऊन थेट पोलीस अधीक्षक असलेल्या निरंजन यांच्याशीच संपर्क साधला होता...

**"काय? आमदार साहेबांची मुलगी?!" ते फोनमध्ये अविश्वासाने ओरडले,**

**"मी... मी कळवतो त्यांना. मी पण लगेच येतोय तिकडे. क्राईम ब्रँच आणि फॉरेन्सिकवाले येतील, तोपर्यंत काही हलवू नका. आणि एग्जॅक्ट लोकेशन कन्ट्रोल रूमला शेअर करा." ते पलिकडे असलेल्या किरणला पुढे सूचना देत गडबडीने म्हणाले.**

निर्देश देऊन होताच त्यांनी घाईतच फोन आदळला. कळण्याच्या पलिकडील प्रकरण असल्याने व त्याहीपेक्षा 'हे प्रकरण आपल्याला जड जाणारेय!' या विचाराने त्यांनी डोक्यावरून जोरजोरात हात फिरवला. आणि मग काही ठरवून त्यांनी हाताखालच्या कॉन्स्टेबलला जोराची हाई दिली!

**"पवार!"**

पवार आडनांवाचा तो कॉन्स्टेबल पळत आत आला. एसपी घोलप यांना सॅल्युट करून तो अदबीने उभारला.

**"येस सर?" तो आज्ञाधारक बोलला.**

तो येताच निरंजन यांनी आपली टोपी व काठी घेऊन त्वरेच बाहेर पळ काढला. जाताजाता त्यांनी काही सूचना पवारला केल्या होत्या,

**"क्राईम ब्रँच, फॉरेन्सिक, फिंगरप्रिंट डिपार्टमेंट्सना जोतिबा डोंगरावर जायला सांगा. कन्ट्रोल रूमला पत्ता येईल. मला पण लोकेशन शेअर करा. मी निघतोय."**

आणि त्यांनी आपली केबीन घाईतच त्यागली होती. पवारने मग तिथलाच फोन उचलून फोन लावला...

◆◆◆

काही वेळातच 'मा. आमदार महादेवराव मोहिते' अशी पाटी दर्शवणाऱ्या वाड्या समोर निरंजन उभे होते. तो वाडा साधा नक्कीच नव्हता. राजवाडाच तो. त्या जुन्या परंतु सूंदर व सुबक अशा राजवाडा पद्धतीच्या भल्या मोठ्या घराच्या बंद दारासमोर एसपी निरंजन टोपी काखेत दाबून खडे होते. त्यांनी बेल वाजवली. आतून बेलचा आवाज घुमलेला अंधुक अस्पष्ट त्यांनाही ऐकू आला. निरंजन काही काळ तसेच उभारले. मग एक वयस्क नोकराने येऊन दार उघडले.

**"साहेब आहेत?" निरंजन यांनी त्वरित त्यास पृच्छा केली.**

**"हा. हायत. पन आता तेंची तेंच्या हाफिसात जायची येळ झाल्या." तो सुप्रीटेंडेंट असलेल्या निरंजन यांनाच कटवून लावण्याचा हेतूस्तव बोलला.**

त्या बिचाऱ्याला कोणाही पेक्षा त्याचा मालकच मोठा. शिवाय काय घडलंय या बद्दल तरी त्याला कुठची कल्पना...? म्हणून तो बापुडा आपल्या मालकाचा सकासकाळचा वेळ वाचवण्याच्या नादात प्रयत्नरत होता.

**"दोन मिनिटं. जरा बाहेर बोलवा. महत्त्वाचं आहे." निरंजन आर्जवी त्यास बोलले.**

मग काही गंभीर असल्याचं ध्यानात घेऊन निरंजनवर तरस खात निरंजनला दारात तसाच ठेवून तो वयस्कर नोकर आत गेला.

निरंजन यांना जरा वाटच बघावी लागली. पण त्याला उपाय नव्हता.

वेळ दवडल्यावर खादी कपड्यातला मध्यमवयीन इसम बाहेर आला. हेच 'आमदार महादेव मोहिते!' कोटची बटणं आवळत ते सस्मित बाहेर निरंजन यांच्यासमोर येऊन स्थिरावले.

**"बोला एसपी साहेब! सक्काळी सक्काळी इकडं कुटं?" मुखावरील स्मित तसंच ठेवून महादेव यांनी विचारलं.**

आणि त्यांनी एसपी यांकडे वर पाहिलं. निरंजन यांचा चेहरा निर्विकार, उदासीने भरलेला. ते तसे नजरेस पडले आणि महादेवरावांचे हावभाव संथ झाले. चेहऱ्यावर आठ्या उमटल्या. ते अतीव संदिग्ध बनले.

**"हे काय एसपी साहेब, आपली टूपी खाली... काई दुःखाची बातम्याय...?" महादेव यांनी काळजीने विचारलं.**

**"आपली मुलगी अदिती कुठंय सर...?" थंड स्वराने निरंजन यांनी गंभीर व संकोचत महादेव यांना प्रश्न केला.**

कळलेली माहिती खरी आहे का निरंजन यांना तपासून बघायचं होतं. त्यांच्या प्रश्नाने मात्र महादेव क्षणात घाबरले. नेहरू कोटाचे बटन कसणाऱ्या हातातील त्राण जाऊन ते झटक्याने खाली झाले. मूर्तीमंत भीतीने त्यांच्या मुद्रेचा ताबा घेतला. निरंजन तसेच निश्चल त्यांच्याकडे पाहत उभे... महादेव यांच्या मौनाने काय ते त्यांना पक्के समजले होते... महादेवरावांना आपल्या मुलीवर गुदरलेल्या काळाबद्दल सुतराम कल्पना नव्हती...

◆◆◆

आतापर्यंत त्या ज्योतिबा डोंगरावरील जंगलच्या परे (पल्याड) असणाऱ्या पठारावर हेडकॉर्टर्स वरून फॉरेन्सिक आणि इतर डिपार्टमेंट्सवाले पोहोचून आपापल्या कामाला तत्परतेने लागले होते.

फिंगरप्रिंट डिपार्टमेंट फिंगरप्रिंट्सचे ट्रेसेस ऊन्ह घडलेल्या गाडीतून कलेक्ट करत होते. फॉरेन्सिक डिपार्टमेंट इतर पुरावे गोळा करण्यात व्यस्त होते.

एव्हीडेन्स कलेक्ट करणाऱ्या फॉरेन्सिकच्या कर्मचाऱ्याला गाडीत ड्रायव्हिंग सीटवर बारीक केस आढळून आला. तो त्याच्याकडून चिमट्याने उचलून एव्हीडेन्सच्या पॉलिथिनमध्ये ठेवून घेतला गेला.

फिंगरप्रिंट्स डिपार्टमेंटच्या ऑफिसर्सकडून फिंगरप्रिंट कलेक्ट केले जात होते. ते करण्यासाठी लागणारी 'टायटेनियम डायऑक्साईड' ही नॅनोपावडर उंटाच्या केसाने बनलेल्या मुलायम ब्रशने ठसे उमटलेल्या पृष्ठभागावर डस्टिंग करून मिळेल तितके फिंगरप्रिंट्स  वेगवेगळया जेलटेपच्या तुकड्यांनी उचलून त्यांच्याकडील पृष्ठावर घेतले गेले व ते, ते ठशांचे नमुने अलग अलग सांभाळून ठेऊन घेतले गेले.

या 'टायटेनियम डायऑक्साईड'मध्ये हाताचे ठसे उमटलेला पृष्ठभाग ओलसर करण्यासाठी विशिष्ट वेटिंग एजंट मिश्रित केलेले असते,  त्यामुळे ठसे गोळा करण्यास सुलभता होते.

तिकडे गोळी चालवताना खूनी उभारलेल्या जागेपासून थोडं दूर पडलेलं रिकामं कार्ट्रेज चिमट्याने उचलून 'लोकल क्राईम ब्रँच'चा सुमित हा ऑफिसर पॉलिथिनमध्ये घेत होता.

तसेच खूनी उभारलेल्या जागेवरील व क्राईम स्पॉटवर मिळतील ते फुटप्रिंट्स सुद्धा फॉरेन्सिककडून  लक्षपूर्वक कलेक्ट केले गेले.

हे फुटप्रिंट्स कास्ट करण्यासाठी फॉरेन्सिक डिपार्टमेंटचे ऑफिसर्स त्या उपलब्ध फुटप्रिंट्सवर 'हार्डनिंग स्प्रे' झाडून फूट इंप्रेशन्स भोवती फेन्स (स्टीलची फ्रेम) टाकून ती मातीत रुतवत होते व त्या फेन्समध्ये 'डेंटल स्टोन' (दातात भरण्यासाठी वापरले जाणारे सिमेंट) आणि पाणी मिसळून ते पातळ मिश्रण पायांच्या ठशांवर ओतत होते. वीस मिनिटे ते अर्धातास वाट पाहिल्यावर त्यांना त्या वाळलेल्या सिमेंट्सच्या पार्श्वभागांवर मातीतील बुटांचे ठसे उपलब्ध झाले, जे डिस्टर्ब होऊ नयेत म्हणून माती वगैरे काही न झाडता व्यवस्थित ठेवून घेतले गेले होते.

त्या एरियाचे इंचार्ज म्हणून किरण व नरेश तिथं काही कॉन्स्टेबल्स सोबत हजर होतेच.

एसपी निरंजनची कार तिथं आली. मागून महादेव यांची कार होतीच. गाड्या थांबल्या. परंतु गाडी स्थिर होण्याआधीच महादेव गाडीतून उतरून बेभानपणे अदितीच्या कारकडे धावू लागले...

निरंजन आपल्या कार मधून उरतच होते, तर त्यांना त्यांच्या कारच्या विंडशिल्ड् मधून महादेव क्राईम स्पॉटकडे बेभान धावताना दिसले. एसपी निरंजन मग घाईनेच उतरले आणि महादेव यांच्या मागे वीजगतीने गेले. तोपर्यंत एक-दोन क्राईम ब्रँच ऑफिसर्सनी महादेवना अडवून धरलेलं होतं. एसपी निरंजन देखील त्यांना सावरायला धावले.

**"सावरा स्वतःला सर. तिथे जाऊन तुम्ही क्राईम सिन कंटेमिनेट कराल. प्लिज..." एसपी महादेवना भानावर आणण्यासाठी ओरडले.**

त्यांनी महादेव यांस मागे घेतले महादेवना अचानकच स्फुंदून रडू कोसळलं. जागेवरूनच त्यांना मेलेल्या आपल्या लाडकीचा विभत्स झालेला छिन्नविच्छिन्न, भग्न चेहरा दिसत होता. ते विदारक दृश्य पाहून ते विषण्ण झाले. बिचारे हमसून हमसून रडू लागले.

निरंजन सहानुभूतीपर त्यांच्याकडे पाहत उभारले होते. करू तर काय शकत होते ते? किरण देखील एव्हाना पुढे झालेला होता. तोही दुःखी चेहऱ्याने महादेवना पाहत होता.

थोड्यावेळाने स्वतःला सावरत महादेवनी एसपींकडे बघितलं. त्यांच्या डोळयांत कमालीचा निश्चय आलेला होता. सुडाची आग उतरली होती त्यांच्या डोळयांमध्ये. मनात उफाळलेला राग तोंडावर स्पष्ट दिसत होता त्यांच्या.

**"मला खूनी लवकरात लवकर माझ्या समोर पाह्यजे!" महादेव निरंजनना ठणकावत बोलले.**

निरंजन समजावण्याचा प्रयत्नांत त्यांना कसोशीने म्हणाले,

**"काळजी करू नका सर. आम्ही पूर्ण प्रयत्न करू. मी जातीने लक्ष घालतोय." ते विश्वास देत बोलले होते.**

**"मला महिने आणि वर्ष लागाय नकोयत! तुमच्याकडं कोनी हाय, ज्यो खुन्याला लवकरात लवकर माझ्या समोर उभा करू शकंल?" महादेव बरसले.**

निरंजन यांनी खाली मान घातली. उत्तर देणं मात्र टाळलं त्यांनी. महादेव मोहिते जी मागणी करत होते, ती पुरी करणं शक्यच नव्हतं! तपासाला थोडा वेळ तरी मिळायला हवाच ना. परंतु हे त्यांना कोण समजावणार? आणि तेही या परिस्थितीत... म्हणून निरंजन यांनी मौन साधलं होतं.

**"मी तुम्हाला काही तरी विचारतोय!" महादेव संतापून ओरडले.**

आणि... एसपी निरंजननी चमकून वर महादेव यांच्याकडे बघितलं. विजेचा प्रहार व्हावा तशी एक कल्पना त्यांच्या मस्तकात चमकली होती.

त्यांना पर्याय मिळाला होता!

**"एक्चुली एक आहे. कोल्हापूरचाच आहे, पण सध्या मुंबईला असतो. जेव्हा तो डिपार्टमेंटमध्ये होता, ही वॉज एन एस डिटेक्टिव्ह." त्यांनी सुचवलं.**

**"बोलवा त्याला!" क्षणांचाही विलंब न लावता महादेव यांनी अक्षरशः फर्मान सोडलं.**

पण यात एक मेख होती... त्या अडचणीची जाणीव महादेव यांना करून देणे आद्य गरजेचे होते. तसे निरंजन त्यांना संकोचतच ती करून देऊ लागले...

**"पण सर; आत्ता तो एक नॉर्मल सिव्हीलीयन आहे. वर्षाभरापूर्वी पर्यंत तो मुंबई क्राईम ब्रॅंचमध्ये होता. पण... एक प्रकरणात त्याला डिसमिस करण्यात आलंय..." निरंजन यांनी सद्य:स्थितीची व अडचणीची जाणीव करून देण्या हेतू महादेव यांना कल्पना दिली.**

महादेवना या आतल्या किचकट गुंतागुंतीच्या गोष्टींशी काही देणंघेणं नव्हतं. जर तो माणूस गुन्हेगार त्यांच्यासमोर उभा करणार असेल, तर तो त्यांना हवाच होता... अगदी काहीही करून!

**"बाकीचं मला काय देनंघेनं नाय. तुमाला वाटतं त्यो खुन्याला लवकर पकडू शकतो?" त्यांनी निरंजन कडून खात्रीसाठी डोळे बारीक करत विचारलं.**

विचारी एसपींची मान होकारात हलली.

**"मग बोलवा त्याला. ऑथरिटी आणि स्टेट होम मिनिस्ट्री बरबर मी बोलतो. गरज आसली, तर केंद्राच्या गृहखात्याशी पन बोलतो. पन तेला बोलवा! मला खूनी हवाय! आणि ते पन आठ-दहा दिवसांच्या आत!" महादेवनी महद् जबाबदारी निरंजन यांच्या अंगावर दिली.**

**"होय सर." निरंजन आश्वस्त करत गंभीर उद्गारले.**

**"माझी मुलगी मला कवा मिळंल?" महादेवनी मग कळीचा प्रश्न केला.**

त्याला निरंजन यांचेकडून ठेवणीतलं पोलिसी उत्तर मिळालं,

**"प्रोसिजरला वेळ लागेल. मी कळवेन तुम्हाला..."**

तसा हा कामाचा भाग; पण महादेवना हे उत्तर म्हणजे अडसर वाटली आणि ते जास्तीच संतापले.

तरी ते करू काय शकत होते? चिडलेले महादेव झटकन तिथून निघाले आणि आपल्या गाडीत जाऊन बसले. गाडी मात्र हलली नाही. सर्व सोपस्कार

होऊन मुलगी हस्ती मिळेपर्यंत ही जागा व पोलिसांची पाठ सोडायची नाही असा कदाचित महादेव यांचा मानस असावा.

निरंजन यांनी मग खिशातून मोबाईल काढून आपल्या हुकुमी इक्क्याला फोन लावला...

पलिकडून फोन उचलला गेल्यावर ते मोजकेच व सूचक बोलले... ते असं...

**"कुठं आहेस?" पलिकडून उत्तर येत असल्याने अवकाश, मग पुन्हा ते बोलले,**

**"ओके. कोल्हापूरला ये. आणि हो, हेलिकॉप्टरने ये. तासाभरात पोहोचशील. डोन्ट वरी. एक्स्पेन्सेज कव्हर केले जातील. माधव शिंदे म्हणून ऑफिसर तुला घ्यायला येतील कदमवाडी हेलिपॅडवर. लवकर निघ."**

कॉल कट करून निरंजन त्या मृत मुलीला आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या कार्याला निरीक्षित करत उभा राहिले. त्यांच्या चेहऱ्यावर भली मोठी चिंता धडकी मारत होती...

◆◆◆

कदमवाडी हेलिपॅडवर त्या महत्त्वाच्या माणसाची वाट पाहत सुप्रीटेंडेंट निरंजन यांच्या आज्ञेनुसार त्यांचा एक अधिकारी माधव शिंदे हा हजर होता. त्यास अधिकची वाट पाहावी लागली नाही.

आकाशात त्यास द्रुतगामी यान आलेले दिसले. ते हेलिपॅडकडे वळले व उतरू लागले, तसे त्याच्या वायूझोताने आसपासची झाडे झुडपे फडफडू लागली. त्या अधिकारीची कपडे देखील अस्तव्यस्त होत होती. डोक्यावर केशसंभार नसल्याने त्याच्या विस्कटण्याचा सवाल नव्हता.

धुळीचा लोट उडवत ते हवाई यान जमिनीवर स्थिरावले. त्याच बरोबर त्या हेलिकॉप्टरकडे पाहणारा, हेलिपॅड पासून दूर कार सोबत उभा असलेला माधव पुढे झाला. कारण त्यातून 'तो' माणूस उतरत होता, ज्याची तो इतका वेळ कड लावून वाट पाहत होता...

आणि 'तो' मानव हेलिकॉप्टर मधून उतरून चालत येत असलेला माधव शिंदेच्या नजरेत भरत होता. डोळ्यांना भारीतला काळा गॉगल लावलेल्या त्याच्या एका हातात मांजराचे पिल्लू असलेला पिंजरा होता. त्या इसमाला समोर माधव दिसला. याचा फोटो त्या व्यक्तीला एसपींकडून नावासकट पाठवला गेला होता. ओळख पटावी हा त्यामागचा हेतू. तेच त्यांनी माधव सोबतही केलं होतं. त्या माणसाचा फोटो माधवला त्याच्या नांवासोबत एसपींनी सेंड केला होता. त्यामुळे माधवला याला ओळखणं क्लिष्ट गेलं नाही.

स्वतःची रोलर लगेज बॅग खेचत तो माधवच्या दिशेने चालत होता. माधवने मग त्याला कारकडे नेतं केलं आणि त्याच्यासाठी तो दार उघडू लागला, तोच...

**"मी स्वतः चालवेन. थॅंक्यू." तो माधवला म्हणाला.**

**"बरं. जोतिबा डोंगरावर क्राईम सिन आहे. मी एसपी सरांना कळवतो तुम्ही आलायत म्हणून." माधवने त्यास माहितीचा पुरवठा केला आणि तो बाजू झाला.**

त्या हेलिकॉप्टरने आलेल्या माणसाने गाडीचा ताबा घेतला. मांजराचा पिंजरा बाजूच्या सीटवर स्थावर करून त्याने गाडी हाकायला सुरवात केली...

◆◆◆

हा चालक घाटातून वरच्या दिशेला गाडी चालवत होता. कोल्हापूरमध्ये हयात गेलेला हा इसम; याला ज्योतिबाची वाट निर्देशित करण्यासाठी कोणाची तशी आवश्यकता नव्हती.

त्याचा हात पॅसेंजर सीटकडे गेला. पॅसेंजर सीटवर पेट केज होतं, त्यात ते मांजरीचं पिल्लू... त्याने आपल्या त्या मांजरीच्या हनुवटीला लाडे कुरवाळलं. बॅकग्राउंडला मधूर संगीत चालू होतं, जे त्याने गाडीतच लावले होतं.

भर दुपारी तळपत्या उन्हात, घाटातला रस्ता आणि गाडीत वाजणारं नव्वदच्या दशकातलं संगीत हे संयोजन काही औरच असतं. त्याचा आस्वाद घेत तो घाटातला रस्ता गाडीने चढत होता.

त्याच्या ओठांत त्याने लंबगोल कँडी सिगारेट दाबली होती. डोळ्यांना काळा गॉगल लावलेल्या त्याने पांढरा प्योर् कॉटन शर्ट परिधान केला होता. त्यावर अंगात फिकट बदामी ओव्हरकोट होता. गळ्यात काळी कंठलंगोट व खाली काळी

फॉर्मल पॅन्ट असा त्याचा पेहराव होता. केस बारीक, भांग पाडण्यापूरते असून त्याची हेअरस्टाईल स्टायलिश अशी गोलाकार मागे सारलेली होती.

त्याने पुढे बघितलं. घाट आज तसा रिकामाच होता. देवाचा 'सिजन' नसावा बहुदा. त्याचा मोबाईल रिंग झाला. कानातील हँड्सफ्रीने त्याने कॉल रिसिव्ह केला.

**"तुला लाईव्ह लोकेशन सेंड केलंय बघ." तिकडून निरंजन बोलले आणि मोजकं बोलून कॉल कटही झाला.**

विक्रांतच्या मोबाईलची मेसेज टोन वाजली. त्याने मोबाईल काढून त्यावर आलेले लोकेशन एकवार नजरेखाली घातलं. आणि कारवर शेअर करून घेतलं. पुढील स्क्रिनवर लोकेशन दिसू लागताच. त्याने गाडीचा वेग वाढवला...

■■■

तो त्या ठिकाणी काही क्षणातच पोहोचता झाला. जमाव जमलेला त्याने पाहिला. पोलीस कॉन्स्टेबल्स, आऊट पोस्ट इंचार्ज व एरिया इंचार्ज सब-इन्स्पेक्टर त्यांना कंट्रोल करण्याचं काम करत होते.

फॉरेन्सिक टीम आपलं काम आवरून आपल्या व्हॅन पाशी विसावली होती. तिकडं त्यांचं त्यांचं काही काम चालू होतं. क्राईम ब्रँच ऑफिसर्स आपल्या कार्सपाशी उभे होते.

सदर प्रकरण मार्गी लागेस्तोवर कुणाला उसंत मिळणार नव्हती.

त्यांच्याच सोबत निरंजन देखील होते. इतकं मोठं आणि त्यातही भीषण प्रकरण, त्यांना जातीने थांबणं आवश्यकच होतं.

आपापले कार्यभार आटोपून सर्वचजण निरंजन यांनी पाचारण केलेल्या त्या महत्त्वपूर्ण व्यक्तीच्या प्रतीक्षेत ताटकळत होते.

महादेव यांची कार तिथंच उभी होती. तेही 'त्या' माणसाच्या वाटेकडे डोळे लावून होते.

आणि 'त्याची' गाडी त्या सगळ्यांच्या एकदमच नजरेत भरली.

हा कोण याची कुणाला ओळख नसली, तरी आता आपली सुटका होईल या विचाराने सर्वच चैतन्यमय झाले; तर बघ्यांचा जो जमाव होता, त्यांच्यात 'नवीन कोण आलं?' हे जाणून घेण्यास कुतूहल पसरलं.

कोणाशी ओळखही नसलेला, तो कोण हे कोणाला तोंड ओळखीने देखील माहीत नसलेला, परंतु तरी सर्वांसाठी उत्सवमूर्ती बनून राहिलेला 'तो' माणूस गाडी चालवत क्राईम स्पॉटच्या थोडं दूरवर आला. बघ्यांची गर्दी जमलेली होतीच. 'त्याने' गाडी स्थिरावली. मांजराला पिंजऱ्यातून काढून उजव्या हाती घेत 'तो' गाडीतून उतरला.

**नेमका कोण होता 'हा'... ज्याच्यावर पोलीस अधीक्षक निरंजन घोलप यांची आख्खी भिस्त टिकून होती...???**

# ३. आरंभ... प्रारंभ...

एसपी निरंजन धावत त्या इसमाकडे आले. ते एकटेच तर त्याला ओळखत होते. त्याच्यासोबत हस्तांदोलनासाठी निरंजन यांचा स्वाभाविक आधी उजवा हात पुढे आला, पण त्या इसमाच्या हाती मांजर बघून मग त्यांनी डावा हात पुढे केला. त्या इसमाने त्याच्या डाव्या हाताने त्यांच्याशी हातमिळवणी केली. त्याच्या चेहऱ्यावर मात्र काहीच भाव नव्हते. आपल्या ओळखीच्या माणसाला कित्येक दिवसांनी भेटावे तेव्हा एक प्रफुल्ल स्मित जसं आपसूक फुलतं तसं याच्या मंडलावर काही घडलं नाही. निर्विकार होता तो.

**"थँक्स. आलास. मग? सध्या काय चालू आहे?" निरंजन हसत बोलले. बोलता बोलताच त्यांनी संक्षेप चौकशी केली.**

**"एका फायनान्स कंपनीत रिकव्हरी एजंट म्हणून काम करतोय." तो इसम मख्ख बोलला.**

**"गुड. चांगलंय... काही तरी करतोयस." निरंजन अजूनही सस्मित होते.**

**"आपल्या सारख्या सिनियर्सची मेहरबानी आहे." तो कुचकट बोलला.**

म्हणजे निरंजन यांना दुखावण्याची त्याची मनीषा खासच नव्हती. त्याचा स्वभावच जरा रुक्ष होता. मख्ख चेहऱ्याने त्याने निरंजन यांची चेष्टा केली होती.

निरंजन यांना त्याच्या स्वभावाची जाणीव होती. शिवाय त्याच्यासोबत पूर्वी जे घडलं होतं, त्याचं डिसमिसल; तेव्हापासून तो जरा अधिकच तुसडा झाला होता याची निरंजन यांना कल्पना होती.

त्याला या मनःस्थितीतून बाहेर काढण्याचा निरंजन यांचा कदाचित हेतू होता. आणि हा त्याचं आवडीचं काम पुनःश्च करू लागल्यावरच हे शक्य आहे असं त्यांना मनोमन वाटत होतं. म्हणूनच त्यांनी याला या केसमध्ये बोर्डवर घ्यायचं प्रयोजन आखलं होतं. आणि त्यांचे खडे व्यवस्थित निशाण्यावर लागत चालले होते... याचं द्योतक; या माणसाचं इतक्या शॉर्ट नोटिसवरही इथं येणं!

**"आहे का आता! जे झालं, त्यात माझा काय संबंध?" त्याच्या टिप्पणीने वाईट न वाटून घेता तो मस्करीत बोलतोय हे समजून घेऊन निरंजन यांनीही कुस्करीत शेरा मारला.**

पण ते ऐकायला तो राकट इसम तिथं थांबलेला नव्हता. कारण बोलता बोलताच त्याची करडी नजर तिथं जमलेल्या लोकांवर गेली होती. एक व्यक्ती एका दुसऱ्या व्यक्तीचे शिताफीने पाकीट मारत असताना त्याच्या तीक्ष्ण दृष्टीत भरले होते.

तो चोर पाकीट आपल्या पॅन्टच्या खिशात सरकवत हळू हळू तेथून काढता पाय घेत होता. कोणी पाहू नये याची दक्षता तो बिनचूक घेत होता निसटताना, तरी तो या 'गरुडनेत्री'च्या तीक्ष्ण नजरेतून सुटला नव्हता.

या इसमाची गरुडदृष्टी त्याच्यावर साधली गेलीये हे त्याच्या गावीही नव्हतं. 'तो' इसम विनाविलंबच तिकडे धावला आणि चोराच्या समोर वाऱ्याच्या वेगाने हजर झाला.

चोर गोंधळला, अधिक तर घाबरलाच. मागे मागे सरकू लागला. दुसऱ्या बाजूने पळता येते का याची 'नाकाम कोशिश'ही त्याने केली. ती नाकाम केली ती याच धाकट इसमाने. त्याने मागून चोराची कॉलर पकडून त्याला हवेतच गोल फिरवलं आणि ज्योतिबा डोंगराची धूळ त्याला चारली.

चोर हवेत दर्शनी गोल फिरून दानकन् धरणीवर खाली आदळला होता. हे करणाऱ्या त्या इसमाचा चेहरा याहीवेळी निर्विकारच होता.

महादेव आपल्या कारमध्येच बसून होते. ते बाहेरील प्रकार पाहत होते. घडलेलं सगळं त्यांच्या डोळ्यांत भरलं होतं. तो निधडा, निर्भीड इसम आणि त्याच्या पायांत पडलेला तो चोर त्यांना सहज स्पष्ट दिसत होते. काहीतरी विचार त्यांच्या मनात त्याचक्षणी घोळत होता. त्यांच्या प्रिय मुलीचा खून करणाऱ्या खुन्याचा माग बहुदा अपेक्षित वेळेच्याही आधी खासच लागेल अशी निश्चिती त्यांच्या मंडलावर झळकत होती. आणि याच निश्चितीने पूर्वी दुःखाने काळवंडलेला त्यांचा चेहरा थोडा उजळला होता.

तिकडे बाहेर तप्त मातीत चोर वेदनेने तडफडू लागला होता. त्या माणसाने त्या चोराच्या मागील खिशातून पाकीट हिसकावून घेतलं. इतका वेळ नेमकं काय झालं हे समजायला वेळ लागल्याने ही घटना मेंदूत प्रोसेस झाल्यावर निरंजन यांच्या पायाला गती येऊन ते पळत तिथं आले.

त्या इसमाच्या अशा वागण्याचे कारण माहीत नसल्याने आधीच निलंबित झालेला हा; अशा वर्तणूकीने लागलीच या केस बाहेर फेकला जाईल या विचाराने निरंजन भयंकर चिंतेत!

**"आल्या आल्या झालास चालू?" ते त्या इसमावर तावलेच.**

त्या इसमाने त्यांच्याकडे समूळ दूर्लक्ष केले. चोराकडून घेतलेलं पाकीट उघडून त्यातील आयकार्ड त्याने पाहिलं व तो गर्दीकडे वळाला.

**"सोहम जगदाळे!" गर्दीला उद्देशून तो इसम ओरडला.**

गर्दी त्याच्याकडेच बघत होती. जमावातील एक अन् एक माणूस त्या धाडसी माणसावर डोळे गाडून होता. त्यातील चोरी झालेला 'सोहम' अचानक गोंधळून आपले खिसे चाचपू लागला. आपले पाकीट कुठल्याच खिशात नाही हे पाहून तो पळत पुढे आला.

**"साहेब माझंय." तो भयभीत आश्चर्याच्या संमिश्र भावाने बोलला.**

इसमाने सोहमला जवळ येण्याची तसदीच दिली नाही. त्याने त्याच्याकडे पाकीट फेकलं,

**"दुसऱ्यांच्या फाटक्यात एवढा पण पाय घालू नका, की स्वतःच अडकून पडाल." आणि हा समजुतीचा मोलपूर्ण सल्ला दिला.**

सोहमने त्याचंच असलेलं पाकीट झेललं व मग काही तो तिथं थांबला नाही. 'त्या' इसमाने मग चोराला उठवलं.

ज्योतिबा चौकीचे इंचार्ज नरेश पाटील व कोडोली पोलीस ठाण्याचे इंचार्ज किरण माने हे आगे आले होते एव्हाना. इसमाने चोराला त्यांच्याकडे ढकललं. त्या चोराचा पूर्ण ताबा त्याने पोलिसांना दिला. चोराला नेण्यात आलं. निरंजन मग चिडून कॉन्स्टेबल्सना ओरडू लागले...

**"हा जमाव इथून मोकळा करा पहिला!" वैतागून आणि त्याहून संतापून त्यांच्या आवाजात सहज आलेली धार झळकत होती.**

तिथले झाडून कॉन्स्टेबल्स व पोलीस या कामी लागले. जमावतले काहीजण तर प्रसाद नको म्हणून निरंजनची ऑर्डर ऐकताच आपणहून निघाले. आणि गर्दी काही पळात नाहीशी झाली.

**"चला. क्राईम सिन बघू." पांगणाऱ्या गर्दीत कोणी मागे राहू नये यावर लक्ष ठेवून उभ्या असलेल्या निरंजन यांना तो महत्त्वपूर्ण इसम बोलला.**

बोलता बोलता त्याने कँडी सिगरेट पाकिटातूनच दातात दाबली. ते पाहून आधीच चिडलेले निरंजन तडकले व त्याच्या दातातली कँडी हिसकावून त्यांनी फेकून दिली. ते त्या कँडीला सिगरेट समजले होते... त्या इसमाने चिडून पाहिल्यासारखे निरंजन यांकडे बघितले. निरंजन कँडी सिगारेटकडे पाहत होते. ती सिगरेट नसल्याचे निरंजनला आत्तापर्यंत उमगले होते.

वैतागलेले, चिडलेले निरंजन तो इसम सिगरेट पितोय वाटून चांगलेच संतापले होते.

त्या कँडीला डोळेभर पाहिल्यावर आता मात्र आपली चूक लक्षात येऊन निरंजन खजील हसले व त्या माणसाकडे त्यांनी आपली माफीची नजर वळवली. मघाशी विक्राळ चिडलेले निरंजन आता क्षणाच्या विलंबात ओशाळले होते. रागावलेली त्याची मुद्रा क्षणात जामच विनोदी वाटत होती.

तो इसम होपलेस्ली निरंजनकडे पाहत उभा होता.

**"सॉरी. मला वाटलं सिगरेट आहे..." लाजलेले निरंजन क्षमेच्या सुरात ओशाळवाणे बोलले.**

त्यांनी फेकलेली कँडी सिगारेट उचलून पुन्हा इसमाच्या समोर धरली. ते खजीलपणे हसतच होते. तो माणूस त्याच्याकडे पाहत तसाच उभा. मघाशी तडफदारपणा दाखवणारे सुप्रीटेंडेंट आता फारच केविलवाणे दिसत होते. पुन्हा चूक लक्षात येऊन निरंजन यांनी मातीने भरलेली ती कँडी सिगारेट पुनः टाकून दिली.

**"एसपी असून कचरा करताय?" एकदम लंबट चेहरा ठेवून तो इसम त्यांना टोला लगावत बोलला.**

निरंजन परत खजील हसले.

**"हो. सॉरी." आणि त्यांनी कॉन्स्टेबलला हाक दिली,**

**"शिंदे! ती कँडी उचला आणि व्यवस्थित डिस्पोज करा!" त्यांनी शिंदेंना हुकूम सोडला**

तो इसम होपलेस्ली त्यांच्याकडे बघतच होता. निरंजनना अगदीच लाजल्यागत झालं.

**"चल ना क्राईम सिन बघू." निरंजननी विषय बदलत मग मूळ मुद्दा गाठला.**

आणि त्यांनी त्या इसमाशी नजर चोरून त्याला अदितीच्या मृतदेहाकडे निर्देशित केलं. निरंजन पुढे जाताना देखील तो इसम त्यांच्याकडे थोडं रागावूनच बघत होता. मग त्याने दुसरी कँडी सिगारेट दातात दाबली व पाकीट खिशात सारून तो निरंजन यांच्या मागे गेला. चालता चालता...

**"केस काय आहे?" त्याने निरंजनना विचारणा केली.**

**"आमदार महादेव मोहिते यांच्या मुलीचा खून झालाय." निरंजन यांनी माहिती पुरवली.**

समोरच्या मृतावस्थेतल्या अदितीकडे बघत असता,

**"नांव?" कँडी चावत तिच्याकडेच प्रस्थान करत त्या इसमाने प्रश्न विचारला.**

**"अदिती." इसमाने विचारलं तितकं निरंजन यांनी पुरवलं.**

**"बॉडी अजून इथंच?" इसमाचा स्वाभाविक प्रश्न.**

**"तू येणार म्हणून. म्हंटलं तू प्रत्यक्षच सिनारियो बघितलास, तर तुलाही बरं पडेल." निरंजन यांनी प्रयोजन वर्तवलं.**

दोघे गाडीकडे आले. एवढं घडून ते मांजरीचं लहान पिल्लू अजून त्याच्या हाती होतंच, तेही शांत.

बाजूच्या ऑफिसर प्रमोदकडे त्या माणसाने हात केला. प्रमोदने गोंधळून एसपीकडे पाहिलं. एसपींनी त्याला आश्वस्त मान डोलवली.

मग प्रमोदने ग्लव्ह्जची एक पेअर त्या माणसाच्या हातात ठेवली. तो माणूस ते हातात चढवत पुढे सरकला. त्याने विंडशिल्ड् वरील एक-दीड सेंटीमीटरचं छिद्र आधी निरक्षित केलं व मग अदितीची बॉडी तो निरखून पाहू लागला.

खिशातून पेन काढून त्याने अदितीचा रक्ताळलेला चेहरा इकडे तिकडे करण्याचा प्रयत्न केला, पण तिची बॉडी स्टीफ झालेली म्हणजे आखडलेली होती. तिचे तसूभरही तोंड हलले नव्हते. चेहऱ्यावर भीतीचे भाव तसेच होते अदितीच्या.

गाडीभर नजर फिरवताना त्या माणसाला अदितीच्या गाडीत ड्रायव्हिंग सीटपाशी खाली सिगरेटची राख दिसली.

मग त्या इसमाने अदितीच्या दोन्ही डोळयांखालच्या पापण्या ओढून पाहणी केली. त्याने तिच्या दोन्ही हातांची बोटे, ओठ व दात निरखून पाहिले. दोन्ही हाताच्या बोटांचा व तोंडाचा वासही त्याने घेतला. मग तो अदितीच्या माथ्यावर लागलेल्या गोळीची जखम निरखत भावरहित सहज उद्गारला,

**"पॉईंट थ्रीटू!"**

त्या माणसाचा बिनचूक तर्क पाहून लोकांच्यात सहसा न मिसळणारा फॉरेन्सिक डिपार्टमेंटचा इंचार्ज सुकृत राठोड, इम्प्रेस होत त्याच्या मागे येऊन उभारला होता.

**"एग्झेक्ट्ली! तुमचं ओब्जर्वेशन खूपच परफेक्ट आहे." तो उत्साही बोलला.**

'ह◌ा कोण एवढा उत्साही?' म्हणून तो इसम वैतागी चेहऱ्याने मागे वळला. एक सडपातळ देहयष्टीचा तरुण त्याच्या समोर त्याला उभा आढळला.

**"आपण?" त्याने त्या किरकोळ तरुणाला विचारलं.**

त्या किरकोळ देहाच्या माणसाला काही बोलावंच लागलं नाही. त्याच्यावतीने निरंजननी त्या इसमाच्या प्रश्नाला उत्तर दिलं,

**"सुकृत राठोड. फॉरेन्सिक डिपार्टमेंट सांभाळतो. याच्या बॉडीवर जाऊ नको. हुशार आहे पोरगं." निरंजन ओळख करून दिल्यागत बोलले.**

आनंदी चेहऱ्याच्या सुकृतने शेकहॅन्डसाठी हात पुढे केला. इसमाने भावरहित चेहरा ठेवून त्याच्या हाती हात दिला.

**"नाईस टू मिट यु." सुकृत हसतमुख होता.**

इसम बळेच खोटं हसला. सुकृतचा अतिउत्साहीपणा, जिंदादीलपणा त्याला अजिबात आवडला नव्हता. सुकृतचं ध्यान मग इसमाच्या मांजरावर गेलं. त्या मांजराला तो कुरवाळत उभारला व मग स्वतःकडेच घेत त्याच्याशी खेळत बाजू झाला. त्या इसमाला हे सगळं अजबच होतं.

**"येडंय काय हे? क्राईम सिन एग्झामीन करतंय आणि मांजराला कसलं हाताळतंय?" तो वेडगळ तोंडाने उद्गारला.**

**"तू तरी वेगळं काय करतोयस?" निरंजन यांनी त्याला कोपरखळी मारली.**

हा टॉन्ट त्या इसमाला लागला. त्याने एसपींकडे थोडं गुश्शात पाहिलं. त्याला काही अधिकची प्रतिक्रिया देण्याची संधी न देता निरंजन पुढे म्हणाले,

**"तू त्याची काळजी सोड. खूप लोक त्याच्या हाताखाली राबतात."**

तोच तो 'प्रमोद' नांवाचा ऑफिसर तिथं आला. बहुदा त्या इसमाने गोळीचा लावलेला तर्क त्याने ऐकला असावा.

**"काय मी एम्प्टी शेल बघू शकतो?" इसमाने प्रमोदला विचारणा केली.**

रिकामे कार्ट्रेज उचललेला हा प्रमोद, ती कार्ट्रेज असणारी पॉलिथिन त्याच्या हाती होतीच. ती त्याने इसमासमोर धरली. इसमाने ती हाती घेतली.

तो इसम पॉलिथिन मधूनच शेल पारखून बघत होता.

**"रिव्हॉल्वर युज केलीये." त्या गोळीला नजरभर पाहून त्या इसमाने कोणत्या प्रकारची बंदूक खुन्याने वापरली होती याचा तंतोतंत अचूक तर्क केला.**

आणि त्याने पॉलिथिन प्रमोदला परत केली. प्रमोदच्या मनात खोलवर रुतलेला प्रश्न त्याने पॉलिथिन घेत या अनोळख्या परंतु हुशार इसमाला विचारला,

**"पण मुलीच्या हाताला गोळी कशी लागली ते समजत नाहीये. ब्लॅंक कार्ट्रेज एकच सापडलं आहे. म्हणजे गोळी एकच चालवली गेलीये. मग हात कसा जखमी झाला...?" तो बुद्धिमान माणूस आपली शंका निरसू शकेल अशी प्रमोदला खात्री होती.**

त्याला उत्तर त्या इसमाकडून दिलं गेलं देखील... परंतु जरा वेगळ्या पद्धतीने...

प्रमोदचा प्रश्न ऐकताच त्या इसमाने आपली रिव्हॉल्व्हर तडक होलस्टरमधून खेचली होती व ती प्रमोदवर झटक्यात इतबारे रोखली होती. प्रमोदने हत्यार ताणले गेल्यावर मरणाच्या भीतीने कोणत्याही मानवाची बचावाची स्वाभाविक प्रतिक्रिया देत घाबरून आपले हात तोंडासमोर धरले.

तिथल्या सर्वांचेच श्वास रोखले गेले होते.

आणि काही निमिष अवकाशाने...

**"सी?! दॅट्स हाऊ!" तो इसम अगदी सहज व काहीच विशेष नाही असा तद्दन अविर्भाव ठेवून बोलला.**

निरंजन यांचाही प्राण कंठाशी आलेला होता. ऑफिसर प्रमोद यानेही मग अजून रिव्हॉल्व्हरचा आवाज कसा नाही या विचाराने दोन्ही हातांनी आपले शरीर चाचपतच आपण जिवंत आहे व काही झाले नाही हे तपासून खात्री केली.

आपण सुरक्षित आहोत याची पुष्टी झाल्यावर सावधपणे प्रमोदने हात खाली घेतले. भीतीने बंद केलेले डोळे त्याने उघडले, तर तो इसम रिव्हॉल्वरच्या बॅरेलला ट्रिगरवरचे बोट समांतर ठेवून तीचे बॅरेल खाली जमिनीकडे धरून उभा होता असे प्रमोदला दिसले. प्रमोद सेफ होता. त्याच्यावर गोळी चालवण्याचा 'त्या' इसमाचा काही इरादा नाही हे त्याला त्या इसमाने ट्रिगर बोट न ठेवण्याने व तिची नळी खाली केल्याने सूचित केले होते.

निरंजन यांचा लटकलेला जीव मोकळा झाला. ते भयानक चिडले,

**"व्हॉट नॉनसेन्स इज धिस?" निरंजन ओरडले.**

**"डोन्ट वरी सर. सेफ्टी लॉक ऑन आहे. मी फक्त यांच्या प्रश्नाला उत्तर देत होतो." तो इसम सहज स्वस्त बोलला.**

निरंजन यांचा पारा अजून चढला.

**"हे असं?" ते त्या इसमावर क्रुद्ध फुटले.**

**"शब्दांपेक्षा कृती अधिक बोलकी असते." तो इसम रिव्हॉल्वर होलस्टर बंद करत निर्विकार मुखाने बोलला.**

बोलताना रिव्हॉल्व्हर परत ठेवल्याने तो होलस्टर लॉक करत होता. त्याच्या कृतीने दडपणात आलेला ऑफिसर प्रमोद काही न बोलता आपल्या कामी निघून गेला.

निरंजन यांचा पारा काही अजून खाली झाला नव्हता. ते त्या माणसावर चांगलेच बरसले,

**"आमदार साहेबांच्या आग्रहाने तुला इथं बोलवलं आहे म्हणून काहीही खपवून घेणार नाही!"**

**"रेकमेंड तुम्हीच केलं असणार?" निरंजन यांच्यावरच दोष ठेवावा तसा तो त्यांना बोलला.**

मस्करीत त्यांची बाजू लंगडी करून तो चालू लागला,

**"चला आमदार साहेबांना भेटू." चालता चालता तो म्हणाला.**

निरंजन वैतागून व तापून त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिले. 'कुठल्या भुताला आपण बोलवलंय?' असा स्वतः बद्दल त्रागा त्यांच्या चेहऱ्यावर. मग निमिषांतराने सगळं बाजू सारून तेही त्या इसमामागून गेले.

निरंजन यांनी पुढे होऊन त्या बेधडक इसमाला महादेव यांच्या गाडीकडे लीड केलं.

दोघे आले, तरी महादेव मात्र काही गाडीतून उतरले नाहीत. इसम खिडकीतून आत त्यांच्याकडे काही वेळ पाहत राहिला, पण महादेव यांच्याकडून काहीच प्रतिक्रिया येत नाही बघून तो दार उघडून मागे महादेवपाशी थेट बसलाच.

निरंजनना काही क्षण समजलंच नाही, की काय झालं. विक्रांत आगाऊपणा करतोय असं त्यांना वाटलं, पण महादेव आणि हा धाकट इसम दोघे अडमुठे आहेत हे लक्षात घेऊन तेही नाईलाजास्तव पुढील पॅसेंजर सीटवर चालकाशेजारी बसले.

गाडीत बसताच निरंजन यांनी महादेव यांची त्या इसमाशी ओळख करून दिली,

**"मी बोललो होतो ते हेच. विक्रांत देशमाने."**

**हो! त्या बेधडक, तडफदार, निधड्या इसमाचे नांव;**

**'विक्रांत देशमाने!'**

**विक्रांत! म्हणजे योध्दा! हा अगदी तसाच होता. कोणत्याही किचकट व डोईजड होणाऱ्या विदारक, बिकट परिस्थितीशी जीवावर उदार होऊन झुंजणारा. जुझारू, जंगजू योद्धा!**

महादेव तरीही काही बोलले नाहीत. त्यांनी ड्रायव्हरकडे करड्या नजरेने पाहिलं. हे ड्रायव्हरला रिअरव्ह्यू मिररमध्ये दिसलं. तो इशारा समजला व गाडीतून उतरून त्याने दार बंद केलं.

मग गाडीत काही वेळच्या शांततेने...

महादेव मोहिते यांनी आपल्या भारदस्त व खोल गंभीर आवाजाने शांतता भंग केली,

**"एसपी साहेब म्हनालं, तुमी माज्या मुलीचा खूनी लवकर शोदून काडाल..."**

**"माझ्याकडे जादूची कांडी नाहीये मिस्टर!" विक्रांत थंड चेहरा ठेवून मधेच तिखट खोचक बोलला.**

महादेव यांना हे लागलं. त्यांचा स्वाभिमानच दुखावला होता विक्रांतने. महादेव यांनी आपली करडी नजर निरंजनवर फेकली. निरंजन जरा घाबरलेच. त्यांना काय बोलावे ते सुचेना.

निलंबनानंतर विक्रांत जरा जास्तच रुक्ष झाल्याचं त्यांच्या ध्यानी आलं. आणि यामुळे तो कोणाची चाड ठेवेना झालाय हेही त्यांना उमजलं. याला बोलवला खरा, पण आता याच्यामुळेच आपलीच मान कापली जातीय का असे काहीसे भाव निरंजन यांच्या मनात उफळी मारू लागले.

आमदार महादेव मोहिते यांना काय तोंड द्यावे या विवंचनेत असताना, त्यांना बोलण्याचा त्रास तसा घ्यावाच लागला नाही. विक्रांतने सारी परिस्थिती हाती घेतली होती आणि तो त्यावर नि:संकोच आरूढ झाला होता!

**"रिगर् मॉर्टीसची प्रक्रिया होऊन बराच वेळ झालाय. खून नक्कीच रात्री केव्हा झाला असेल. रात्रभर तुमची मुलगी घरी नाही आणि तुम्हाला माहीतही नाही?" विक्रांत आपल्या स्वभावानुसार स्ट्रेट फॉरवर्ड प्रश्न विचारत महादेवला बोलला.**

**"ती... ती आमच्या बरोबर ऱ्हात न्हवती." महादेव नजर चोरत फणकाऱ्याने उत्तरले.**

**"मग?" महादेव ती वार्ता टाळू पाहतायत हे लक्षात येऊन देखील सत्य जाणून घेण्याच्या निश्चयाने विक्रांतचा त्यांना आडवाचा प्रश्न.**

महादेव काही बोलले नाहीत. शून्यात नजर गढवून ते गप्प बसून राहिले. त्यांच्या डोळयांत रक्त उतरत चाललं होतं...

**"तुमच्यात काही वाद होते?" त्यांना शांत राहू द्यायचे नाही असे ठरवल्यागत विक्रांतचा आणखीन एक प्रश्न.**

मग मात्र महादेव तडकले.

**"तोंड आवरा!" ते विक्रांतवर फुटले.**

विक्रांतवर याचा काहीच चांगला अगर वाईट परिणाम झाला नाही. तो मूळचाच निबर काळजाचा होता.

**"सॉरी. पण तुमच्याकडून को-ऑपरेशन होणारच नसेल, तर मी काही करू शकत नाही." तो आपल्या नॉर्मल कोरड्या आवाजात बोलला.**

आणि विक्रांत गाडीतून उतरला. महादेव यांना हा तसा त्यांचा मोठा अपमानच वाटला आणि ते विक्राळ भडकले. महादेवनी चिडून निरंजन यांकडे बघितलं. निरंजन यांचे भीतीने आता पाणी होणेच काय ते बाकी होते. कसं तरी बळ एकवटून महादेव यांना समजवण्यासाठी ते बोलले,

**"तुम्ही काही काळजी करू नका साहेब. हा इन्वेस्टीगेशन करेल. मी वचन देतो तुम्हाला."**

परंतु महादेव काही समाधानी झाले नव्हते,

**"याच्याच्यानं जमणार नसंल, तर माणूस बदला." त्यांनी फर्मान सुनावलं.**

निरंजन मात्र विक्रांतला या केसमध्ये इन्वॉल्व्ह करून घेण्याच्या आपल्या निर्णयावर महादेव यांना घाबरलेले असून दटून राहिले.

**"नाही साहेब. हाच परफेक्ट आहे. मी समजावतो त्याला. तुम्ही निश्चिंत व्हा. प्रोसिजरमध्ये बसवण्यासाठी फक्त याला फोर्समध्ये घ्यावं लागेल..." ते कन्विन्सिंग्ली महादेव यांना बोलले,**

**"आणि तसं केलं, तर हा माझ्या शब्दाच्या बाहेर जाऊन वेडंवाकडं काही बोलणार आणि वागणार पण नाही..." त्यांनी आपलं म्हणणं महादेवला मनवून त्यांच्या पचनी घालण्यासाठी एक गुगली फेकली.**

काही पळांच्या विचारांनंतर महादेव यांनी खाली रुतलेली आपली नजर निरंजन यांच्यावर फिरली.

**"तुम्ही जबाबदारी घेताय, तर मी बोलिन गृहमंत्र्यांशी!" ते एवढंच म्हणाले.**

**"धन्यवाद साहेब... धन्यवाद." निरंजन अगदी कृतज्ञतेने म्हणाले.**

आणि मग आभार मानत निरंजन देखील महादेव यांच्या गाडीतून उतरले.

निरंजन उतरल्याचे पाहून ड्रायव्हर गाडीत बसला. काहीवेळाने गाडी स्टार्ट झाली. निरंजन दोन पाऊल मागे सरकले. तशी गाडी त्यांना वळसा घालून वेगात निघून गेली. तसे चिडलेले निरंजन विक्रांतकडे वळले.

विक्रांत निरंजन व महादेव यांची जास्त पर्वा न करता फॉरेन्सिक टीमकडे गेला. निरंजन पायांना वेग देत विक्रांत मागे येऊन त्याच्या पावलांशी पाऊल जुळवून चालू लागले...

**"तुला काही अक्कल?" संताप व्यक्त करत निरंजन यांनी विक्रांतला विचारलं.**

**"खूप आहे. म्हणून तर बोलवून घेतलंत ना?" विक्रांतने त्यांना तिरकस उत्तर दिलं.**

**"तुला बोलवून चूक केली असं वाटू देऊ नको." निरंजन धमकावत दरडावले.**

पण त्यांच्या रागातून उद्धृत झालेल्या शब्दांना सत्याचं स्वरूप कधी येणार नव्हतं हे विक्रांत देखील जाणून होता.

यांची ओळख म्हणजे कधीकाळी विक्रांतने निरंजन यांच्या हाताखाली काम केलं होतं. आणि तेव्हापासून विक्रांतच्या बुद्धिमत्तेने आणि कर्मठतेने निरंजन यांच्या मनात विक्रांत बद्दल आपुलकीचं स्थान निर्माण केलं होतं. म्हणूनच निरंजन आत्ता विक्रांतचा निगरगट्टपणा आणि तुसडा स्वभाव दुर्लक्षित करत होते, खपवूनच घेत होते म्हणा ना...

विक्रांत हा निरंजन यांच्यासाठी अत्यंत जिवलग होता. आणि ते कधीच त्याला एकटं सोडणार नव्हते. म्हणून तर पोलीस खात्यापासून दूर झालेल्या आणि म्हणूनकॅब स्वतःपासून व माणसांपासूनही दूर गेलेल्या विक्रांतला पुन्हा माणसांत आणण्यासाठी आणि तसा तो त्याचं आवडीचं काम करतानाच येऊ शकतो हे माहीत असल्याने त्यांनी त्याला या कामी लावलं होतं.

महद् प्रयासाने जमवून आणलेलं मुसळ, विक्रांतला पुन्हा अंधाऱ्या खाईत ढकलून निरंजन वाया थोडीच जाऊ देणार होते...

बोलतच ते दोघे फॉरेन्सिक टीमकडे आले. क्राईम ब्रँचचे अधिकारी तिथंच असल्याने एकत्र संवाद साधावा म्हणून त्याने तिकडे रुख केला होता. सुकृत विक्रांतच्या मांजरासोबत तिथंच होता. विक्रांत त्याच्याकडून मांजर घेत लोकल क्राईम ब्रँचच्या ऑफिसर्सना विचारता झाला,

**"एव्हीडेन्स कलेक्ट केले?"**

**"ऑलमोस्ट एव्हरी सिंगल वन." लोकल क्राईम ब्रँचचा आणखी एक ऑफिसर असलेला सुमित संतुष्टीने म्हणाला.**

**"ओके." विक्रांत उद्गारला आणि त्याने निरंजनकडे मान वळवली,**

**"सर, बॉडी अटॉप्सीसाठी पाठवा." त्याने सर्वांना मोकळे करण्यासाठी सूचित केलं.**

निरंजन यांची संमतीदर्शक मान हलली.

**"आणि, सगळ्यात आधी बॉडी कुणी बघतली?" विक्रांतने विचारलं.**

**"डोंगरावरचा गाववाला आहे." निरंजननी माहिती दिली आणि ओरडून किरणला म्हणाले,**

**"माने! त्या आयविटनेसला पाठवा."**

आणि त्यांनी सुकृतकडे मोर्चा वळवला,

**"बॉडी घेऊन जा. ही कार पाठवण्याची व्यवस्था करतो." निरंजन सूचना करत सुकृतला म्हणाले.**

**"हो." सुकृत आज्ञाधारक उद्गारला.**

सुकृतने विक्रांतच्या हातात असलेल्या मांजराला निर्वाणीं पुन्हा प्रेमाने कुरवाळलं आणि आपल्या दोन असिस्टंट्ना स्ट्रेचर घेण्याचे खणावून अदितीच्या गाडीकडे गेला. त्याचे असिस्टंट्स व्हॅन मधून स्ट्रेचर घेऊन त्याच्या मागून चालते झाले. आणि त्यांना क्रॉस करून अदितीची बॉडी प्रथम पाहणारा गाववाला जगदीश किरण सोबत विक्रांत व निरंजन यांच्याकडे आला.

**"नमस्कार सायेब." जगदीश बिचकत दुबकत बोलला.**

**"नांव काय आपलं?" विक्रांतनं त्यास विचारलं.**

**"जगदीश शंकर कांबळे." जगदीश उत्तरला.**

**"तुम्ही इकडे का आला होता कळेल?" विक्रांतने त्याला विचारलं.**

**"बाथरूमला आलेलो सायेब." जगदीशने कचरत, संकोचत उत्तर दिलं.**

**"इथं? उघड्यावर?" विक्रांतने भुवई उडवली.**

**"आता इकडं एव्हड्या आत कोन येतंय सायेब. म्हनून आलतो." तो नजर चुकवत अपराधी बोलला.**

**"तरी परिसर घाण होतोच ना." विक्रांतने त्याला डोस पाजला.**

**"जाऊ द्या ना सायेब. पुडल्या वेळी लक्ष दिन." जगदीश कळवळा.**

**"बरं. बोला." विक्रांत मग तो विषय सोडून मुद्यावर आला.**

जगदीशला हायसं वाटलं. तो मग मोकळेपणाने वारं शिरल्यागत झपाट्याने उत्तर देऊ लागला, 'जितक्या जलदी सांगू तितक्या जलदी निघू' असा त्याचा कयास म्हणून तो घाई करत वदला,

**"सायेब, म्हनजे बगा. तिकडं खोल झाडीत असताना मला ती गाडी दिसली. कायाय बगावं म्हनून आलो, तर हे! मग लगेच इतल्या चौकीत कळंवलं. आनि मग चौकीवाल्यांनी कडोलीच्या मेन स्टेशनला. इन्स्पेक्टर सायबांना ही मुलगी कुनाची कळल्यावर एसपी ऑफिसला त्यांनी कळवलं. तवा पास्नं मी इतंच हाय बगा. काम तर राहिलंच आजचं, पन आता घरी तरी जाऊ द्या सायेब." अखेरचं वाक्य बोलताना तो कळवळा होता.**

**"जाल. थांबा!" विक्रांत जगदीशची घरी जाण्याची इच्छा टाळत बोलला.**

जगदीशचा चेहरा खाडकन पडला. विक्रांत तोंडात एक कँडी सिगारेट धरत पुढे बोलू झाला,

**"तुम्ही एग्जॅक्ट्ली कुठून गाडी बघितलीत ते दाखवाल?"**

**"चला की सायेब." जगदीश पडल्या तोंडाने परंतु तरतरीने बोलला.**

यांना पटापट मदत केली आणि यांचं काम केलं, तर आपण लवकरात लवकर घरी जाऊ अशी त्याची भाबडी आशा पुनः जागृत झाली होती.

तो 'लघु विधी' साठी ज्या ठिकाणी उभारला होता, त्या ठिकाणाकडे चालू लागला.. आणि त्याच्या मागून विक्रांतही पावले मोजू लागला.

घनगर्द झाडीत, जगदीश लघुशंकेला उभा राहिलेल्या ठिकाणी येऊन थांबला. अगदी तसेच तोंड करून जसा तो पूर्वी सकाळचा कधी उभा होता.

त्याच्या मागून विक्रांत येऊन तोही जगदीशच्या बाजूला गाडीपासून विरुद्ध दिशेला तोंड करून जगदीश सारखा तसाच उभा राहिला.

जगदीश बोलू लागला,

**"हे बगा. मी इतं हुतो आणि मला इतनं ती गाडी दिसली."**

बोलत बोलत तो मागे वळला व उत्स्फूर्त उत्तेजित बोलला,

**"आता पन दिस्त्या बगा."**

विक्रांत मागे वळला. झाडांतून पलिकडे फॉरेन्सिक टीम अदितीचा मृतदेह स्ट्रेचरवरून व्हॅनकडे नेताना त्याला दिसली. बॉडी कडक झाल्याने त्या स्ट्रेचरचा आकार कारच्या सीट सारखा केला होता, जेणेकरून बॉडी व्यवस्थित त्यावर प्लेस होईल. अदितीला स्ट्रेचरला बांधण्यात आले होते. त्या सर्वांच्या मागे अदिती ज्या गाडीत मेली ती लाल गाडी दिसत होती.

आणि मग विक्रांतनं आपलं सगळं शरीर त्या दिशेने वळवून खाली जमिनीकडे निरखून पाहिलं. गाडीकडे पहात असताना त्याचं लक्ष कशाने तरी वेधून घेतलं होतं.

**"तुमची गाडी कसली आहे?" विक्रांतने त्याला दिसलेल्या खुणांकडे निरीक्षणे पाहत जगदीशला विचारलं.**

**"दोनचाकी हाय?" जगदीश बोलला.**

**"तुम्ही गाडी घेऊन इथं आला होता?" विक्रांतने जास्तीचा प्रश्न केला.**

**"नाई. गाडी रस्ताव लाऊन चालत आत आलतो. माजी गाडी आजुन बी रस्तावरचाय." जगदीशने आपली बाजू साफ केली.**

हे ऐकताच विक्रांतने जगदीशला झटक्याने बाजूला ओढलं व त्याच्या पोटाला हात लावून त्याला मागेच थांबण्यास सुचवलं.

मातीत त्याला टायर मार्क्स व फुटप्रिंट्स स्पॉट झाले होते. तो आता खाली बसून नीट निरखून ते पाहत होता.

मग विक्रांतने संथ उठून इकडे तिकडे काही सापडते का ते बघितलं. तर तेव्हा त्याला तिथं एक टू-व्हीलर लायसन्स सापडलं. माती-पाचोळ्याखाली अर्धवट दिसेल असं ते पडलेलं होतं.

ते पाहून विक्रांत ओरडला,

**"सर! राठोडना घेऊन जरा इकडं या!"**

जंगलातून प्रवास करत त्याचा आवाज पठारावर उभ्या निरंजन यांच्या कानी पडला आणि ते धाव घेत उंच उंच घनदाट झाडांत धावले. जाताना त्यांनी सुकृतला सोबत येण्याचा इशारा केला होता. तरी तत्पूर्वीच विक्रांतचा आवाज ऐकल्याने सुकृतने आपल्या पायांना जंगली गर्द झाडांच्या दिशेने गती दिली होतीच.

झाडीत पुरावे नजरेखाली घालणाऱ्या विक्रांतने खाली बसून आपला पेन खिशातून काढला व तो पाचोळा बाजूस करून ते कार्ड पाहू व त्यावरील नांव वाचण्याचा प्रयत्न करू लागला.

**कार्डवर नांव - 'तुषार श्रीकांत नवले!'**

इतक्यात निरंजन व त्यांच्या मागून सुकृत तिथं पळत आले. विक्रांत तडख त्यांना जागीच थांबवण्याच्या हेतूने बोलला,

**"सावकाश! टूव्हीलरचे टायर मार्क्स आणि फुटप्रिंट्स मिटतील."**

आणि त्या दोघांनीही जागीच थबकून खाली बघितलं. निरंजन व सुकृत पायांसमोर असलेल्या टायर मार्क्सच्या अगदी अलिकडेच थांबले होते.

मग निरंजन सुकृतचा हात पकडून आपला व त्याचाही पाय कोणत्याही पुराव्यावर पडणार नाही अशी काळजी घेत विक्रांतकडे आले.

**"काय बघतोयस?" निरंजन यांनी विक्रांतला विचारलं.**

**"लायसेन्स आहे." निरंजन यांना उत्तर देऊन तो सुकृतला बोलला,**

**"राठोड, जरा कलेक्ट करा."**

**"हो."**

म्हणत पुढे होऊन सुकृतने गल्व्ह्जच्या हाताने ते लायसन्स उचलले व खिशातून 'एव्हीडेन्स' लिहिलेली पॉलिथिन काढून त्यात काळजीपूर्वक ठेवून घेतले आणि पॉलिथिन सील करून जवळ ठेवली.

**"आणि हे टायर मार्क्स आणि फुटप्रिंट्स पण कलेक्ट करा." विक्रांतने अधिकची सूचना केली.**

**"नक्कीच." सुकृत उद्गारला.**

**"जा. तुमचे फुटप्रिंट्स पण द्या." विक्रांत जगदीशकडे मान करून त्याला म्हणाला.**

'आपण यात अडकतो की काय?' म्हणून आधीच अर्धमेला जगदीश अजूनच घाबरला.

**"मी... मी का?" तो चाचपत कसासा बोलला.**

विक्रांत मग उठला आणि त्याने जगदीशकडे आपलं मुख वळवलं,

**"यात अडकायचंय का?" विक्रांतने संपूर्ण शरीर त्याच्याकडे वळवून त्याला थेट प्रश्न केला, तो रुक्ष चेहरा ठेवूनच.**

आणि त्याच्या या चेहऱ्याला जगदीश अजूनच भ्याला,

**"नाई नाई!" तो जवळजवळ धास्तीने किंचाळलाच.**

**"त्यासाठीच! तुमचे ठसे घेतले नाहीत, तर तुम्ही गुन्हेगार नाही याचा पुरावा आमच्याकडे कसा असेल? जा. आणि खालचे ठसे सांभाळा." विक्रांत त्यास समजावत त्याच्या नेहमीच्या रुक्ष स्वरात बोलला.**

परंतु त्याचा बोलण्याचा टोनच असा होता, की निवांत होण्याऐवजी जगदीश जास्तच भ्यायला.

'आलीया भोगासी...' मनोमन म्हणत जगदीशची नाईलाजाने मान डोलली.

**"फिंगरप्रिंट्स पण घ्या त्यांचे." विक्रांतने सुकृत राठोडला सूचना केली. आणि,**

**"क्राईम सिनवरचे फुटप्रिंट्स घेतले?" विक्रांतने जाणाऱ्या सुकृतला थांबवत विचारलं.**

**"हो. जेवढे अवलेबल होते, सगळे घेतले आहेत." सुकृत होकारात म्हणाला.**

**"गुड. इथल्या फुटप्रिंट्सशी कुठले जुळतात, ते बघा. त्या लायसेन्सवर पण काही फिंगरप्रिंट्स मिळतात का बघा आणि त्या प्रोफाईल कॉपीज एसपी साहेबांच्याकडे आणि फिंगरप्रिंट डिपार्टमेंटला सुपूर्द करा." विक्रांतने सुकृतला कामाचं स्वरूप आखून दिलं.**

**"येस." सुकृतने ते सहमत केलं.**

इतक्यात काही लक्षात येऊन,

**"हो आणि, फोटो पण घ्या यांचा." जगदीशबद्दल शेवटी विक्रांतने सुकृतला वाढीव सूचना दिली.**

**"ओके सर." सुकृत सहज बोलला आणि जाऊ लागला.**

**तोच;**

**"आणखी एक!" विक्रांत सुकृतला उद्देशून बोलला.**

सुकृत थांबून त्याच्याकडे वळला.

**"कॉल मी विक्रांत!"**

**"येस." समजूतीचं हसून सुकृत सहमत झाला.**

सुकृत जगदीशला मोकळ्या जागेत, जिथं गुन्हा घडला होता, तिथं स्थित फॉरेन्सिक व्हॅनकडे घेऊन गेला.

मग विक्रांत व निरंजन देखील तेथून बाहेर पडू लागले... चालत असता...

**"काय वाटतंय?" निरंजनने गंभीर भावाने विक्रांतला विचारलं.**

**"जेवढं समोर आलंय, त्यावरून तरी प्री-प्लॅन्ड् मर्डर दिसतोय! ती मुलगी पॅसेंजर सीटवर आहे. म्हणजे नक्कीच कोणीतरी तिला इथं ड्राइव्ह करून आणलंय. झटापटीच्या काही खुणा नाहीत. वेदर् इट वॉज मेल ऑर फिमेल, बट नक्कीच ती ओळखीच्या व्यक्तीसोबत आली होती. गोळी हाताच्या आरपार जाऊन डोक्यात लागली आहे, म्हणजे तिच्यावर फायर झालं, तेव्हा ती पूर्ण शुद्धीत होती. भीतीपोटीच स्वाभाविक पवित्रा म्हणून बचावासाठीच तिचा हात आडवा आला होता. त्यामुळं तिला सेडटिव्ह् किंवा विष वगैरे देऊन इथं आणलंय असं वाटत नाही."**

दोघे बोलतच पुन्हा मोकळ्या पठारावर आले. रणरणतं ऊन पिवळट-काळ्या-तांबड्या मातीतून परावर्तित होऊन डोळ्यांत बोचत होतं. विक्रांतने गॉगल घातल्याने त्याला काही फरक पडत नव्हता, पण निरंजन यांचे डोळे मात्र उन्हापासून स्वरक्षणार्थ बारीक झाले होते.

**"बरं ही गाडी कोणाची?" आदितीचा देह मृत झालेल्या चारचाकीकडे पाहून भुवया उडवत विक्रांतने विचारलं,**

**"नक्कीच क्रिमिनलची नसणार. चोरीची? का याच मुलीची?" विक्रांतने पुढे प्रश्न केला.**

**"तुझा तर्क बरोबर आहे. गाडी अदितीचीच आहे." निरंजन यांनी त्याला सांगितलं.**

**"ज्या अर्थी ती आपली गाडी कोणाला चालवायला देते आणि स्वतः बाजूला बसते, ती व्यक्ती नक्कीच तिच्यासाठी स्पेशल असेल!" विक्रांत सूचक बोलला.**

आणि त्याने आपला विचार निरंजन यांच्या डोक्यात प्रसारित करण्यासाठीच जणू त्यांच्याकडे डोळे सूचक फिरवले.

निरंजन थांबले. काही तर्क त्यांच्या डोक्यात घोळत होता. म्हणून मग विक्रांत पण थांबला.

**"लायसेन्स होल्डरला पकडणं काही अवघड नाही. काय वाटतं? खूनी तोच असेल?" निरंजन यांनी अंदाजे प्रश्न केला.**

**"एखादी गोष्ट सहज मिळाली, की जरा सावध व्हावं. आधी माहिती येऊ दे. बघू." विक्रांतने त्याचा तर्क साक्ष केला.**

**"बरं. प्रेस रिलीज करूया? एव्हाना बातमी पसरलीच असेल." निरंजन तणावात बोलले.**

**"एज यु विश. पण त्याआधी तुमच्या आमदारांची परमिशन मिळते का बघा." विक्रांत खोचक बोलला.**

आमदार महादेव अडचण ठरणार हे विक्रांत पक्के ओळखत होता. त्यांच्याशी काही मिनिटांच्या मुलाखतीतच विक्रांतने महादेव यांना पूर्णतः जोखलं होतं.

निरंजन विचारात गुंतले होते. कशाचाच प्रभाव न पडणाऱ्या विक्रांतने आधीची संपल्याने इतक्यात एक कँडी सिगरेट तोंडात धरली होती आणि तो तिथून निघालाही होता.

**हा विक्रांत; ज्याच्यावर सुप्रीटेंडेंट निरंजन घोलप यांनी विश्वास दर्शवला होता, काय तो या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यास यशस्वी होईल...??? हो, तर कोणाशी जुळवून न घेणारा, सरळ तोंडी न बोलणारा हा विक्रांत ते नेमके कसे साध्य करेल...???**

# ४. मोर्चेल बांधणी...

दुसऱ्या दिवसाची दुपारची वेळ उलटून गेली होती. विक्रांत निरंजन यांच्या समोर त्यांच्या दालनात बसला होता.

"मग? काल राहिलास कुठं?" निरंजन यांनी विक्रांतला विचारलं.

विक्रांत आपल्या कोल्हापूरातील घरी जाणार नाही याची निरंजन यांस कल्पना होती. ती वास्तू विक्रांत इथून गेल्यावर सुमसान, विरान पडली होती. विक्रांतच्या काही कटू आठवणी बंदिस्त होत्या त्यात. त्यांना विक्रांत छेडणार नाही याची जाणीव देखील निरंजन यांना होती.

"हेडकॉर्टर्सच वापरलं." विक्रांत बोलला.

"एक पुलीस कॉर्टर् उपलब्ध करतो तुझ्यासाठी." निरंजन हसत बोलले,

"तरी काल तुला बोललो होतो, माझ्या रेसिडेन्सीला ये. नाही म्हणालास. बोल येतोस तिथंच?" त्यांनी ऑफर केली.

"आपली फॅमिली आहे. अवघडतो मी माणसांच्यात. कॉर्टर् वुड बी बेटर् फॉर् मी." विक्रांत खुलं बोलला. निरंजन एकटेच काय ते त्याच्यासाठी जवळचे होते म्हणूनच कदाचित.

निरंजननी विनाविलंब मग एक एन्वेलोप विक्रांत समोर ठेवला.

**"हे काय?" विक्रांत आठ्या पाडून विचारत होता.**

एन्वेलोपकडे डोळ्यांनीच निर्देशत निरंजन विक्रांतला सुस्मित म्हणाले,

**"तुला कोल्हापूर लोकल क्राईम ब्रँचचा इंचार्ज केलंय. त्याचंच हे अपॉइंटमेंट लेटर!"**

**"काय?" विक्रांतला जबर धक्का बसला. पण यात आनंद तो कसला नव्हता. असेलच तर तो तिटकारा असावा...**

**"तुला माहीत आहे, एक सिव्हीलीयन म्हणून तू काम करू शकत नाहीस. तो पोलिसांच्या कामात हस्तक्षेप होईल. आमदारांनी स्टेट होम मिनिस्ट्रीकडं तुला पुन्हा रिक्रुट करण्याची विनंती केली होती." निरंजन यांनी विक्रांतसाठी पडद्यामागे असणारी कहाणी विदित केली.**

**"पण हे..." विक्रांत ऑफर नाकारण्याच्या सुरात होता.**

त्याला योद्धा म्हणून वर्णीत करत असताना तो असा जबाबदारी बाबत मागे का हटतोय असा प्रश्न कोणासही पडावा, परंतु तो गुन्हेगारी विरुद्ध लढण्यास घाबरत नव्हता. नाहीतर तो आलाच का असता? निरंजन बुद्धिबळ अगर सारीपाट खेळायला, तर खासच नाही बोलावणार आपल्याला हे त्याला उमगून होतंच. त्यांना कसल्याशा केसमध्ये मदत हवी असणार म्हणूनच त्यांनी तातडीने आपल्याला बोलावले हे त्याला समजायला किंचितसा वेळ देखील लागला नसणार. त्यांना मदत करायलाच तर तो इथं आला होता. सारांश असा की, लढाण्यासाठी तो कधीच कचरणारा नव्हता.

**बट द पोलीस फोर्स...?! ही वॉज फेड अप विथ इट ऑल! हि हॅड हॅड इनफ ऑफ ऑल थिस ऑलरेडी!!!**

आता ह्या सगळ्याची त्याला शिसारीच आली होती.

**तोच...**

**"तू बाकीची चिंता करू नको." म्हणत निरंजन यांनी त्याला टोकलं होतं.**

आणि त्याला नकार देण्यापासून रोखलं होतं. एवढंच करून न थांबता निरंजन यांनी विक्रांत समोर 'ग्लॉक 17' पिस्टल ठेवली.

**'ए सर्व्हिस पिस्टल!'**

**"आणि इथले आत्ताचे इंचार्ज?" त्या बंदुकीकडे न बघता विक्रांतने निरंजन यांना निर्विकार चेहऱ्याने प्रश्न केला.**

विक्रांतची आधीच्या अधिकाऱ्यासंबंधी असलेली चिंता निरंजन यांना उमगली. ती दूर करण्यासाठी ते त्याला आश्वस्त करत म्हणाले,

**"त्यांची चांगल्या ठिकाणी बदली केली आहे."**

विक्रांत तिरस्कृत हुंकारला,

**"हं! आपली कामं काढून घेण्यासाठी राजकारणी काहीही करतील; नाही?!" विक्रांत घुटमळल्यागत उपरोधिक तिरकस बोलला.**

त्याच्या उपहासात तिरस्कारच मोठा होता. निरंजन त्याला जरा मग गंभीरच बोलले,

**"मी तुला सांगितलंय, तू त्याची चिंता करू नको! तू आता फक्त या केसकडे लक्ष दे! तिसऱ्या फ्लोअरवर आपलं क्राईम ब्रँच डिपार्टमेंट् आहे."**

विक्रांतने वर त्यांच्याकडे बघितलं.

**"एक डाऊट आहे." तो बोलला.**

निरंजन यांनी मान हलवूनच विचारण्याची परवानगी दिली.

**"व्हॉट इफ; मी अदिती मोहितेचा खूनी शोधून काढू शकलो नाही..." विक्रांतने घणघाव करावा तसा खनकन प्रश्न केला.**

निरंजन या प्रश्नावर गप्पच राहिले.

**"मला माझं उत्तर मिळालं." विक्रांत उठत बोलला.**

तो केबिनच्या मुख्य दरवाज्याकडे जात असतानाच निरंजन यांची खाली जाणारी विचारी नजर टेबलवर गेली. समोरील एन्वेलोप व पिस्टल विक्रांतने तशीच तिथं सोडली होती!

◆◆◆

किंतु विक्रांतने हेडकॉर्टर्स सोडले नव्हते. लिफ्टचे बटन दाबून ती उघडल्यावर तो लिफ्टमध्ये शिरला.

विक्रांतने लिफ्ट बंद करण्यास बटन दाबले, तर तोच दार बंद होत असताना एक सूंदर तरुणी जिने नीटनेटकं आवरलं होतं, नवीन साडी नेसली होतं, थोडा शृंगारही करून तिने आपल्या सौंदर्यात किंचित भर टाकली होती अशी ती खांद्यावरचा पदर सावरत गडबडीने पळत लिफ्टकडे येताना त्याला दिसली.

**"वेट. वेट!" ती घाईगडबडीत लिफ्टच्या दिशेने येत विक्रांतला बोलली.**

विक्रांत कोण हे अजून तिच्या गावी नव्हतं.

विक्रांतने बटन दाबून लिफ्ट थांबवली. मग कुठे त्या तरुणीची धावपळ कमी झाली व ती स्थिर होऊन परंतु तरी थोडी घाईतच लिफ्टकडे येऊ लागली.

अशातही ती साडी सावरतच होती. विक्रांत तिच्याकडे बघतच होता. पण त्याच्या चेहऱ्यावर काहीच भाव नव्हते. तिची साडीत होणारी गडबड ही, खरंच विनोद होता.

तो मक्ख भाव घेऊन फक्त तिची गडबड पाहत होता. ती घाईने लिफ्टमध्ये शिरली व तिसऱ्या फ्लोअरचे बटन दाबू लागली. विक्रांत समजूतीचं ओठांतच हसला.

**"थँक्स हं!" ती म्हणाली खरी, पण तिचं त्याच्याकडे काहीच लक्ष नव्हतं. ती आपल्याच गोंधळात होती.**

विक्रांतने हुंकारून फक्त मान हलवली. डोळ्यांवर नेहमीचा गॉगल तसाच होता. आणि तोंडात ओठांना ती कँडी सिगरेट लटकत होती ती तशीच.

ती तरुणी मग स्वतःचा पदर खांद्यावर नीट करण्यात व पायांत येणारी साडी व्यवस्थित करण्यात व्यस्त झाली. तिचा भयंकर संताप होत होता. त्रागा करत ती स्वतःशीच बडबड करू लागली,

**"काय काम काढलंय एवढं गडबडीचं काय माहित? मैत्रिणीचं लग्न सोडून तसंच यावं लागलं. कोण दीड शहाणा आता डोक्यावर येऊन बसलाय कोण जाणे. सुप्रीटेंडेंटनी सांगितलं नसतं, तर आलेही नसते. कधी नव्हे ती सुट्टी मिळाली होती, ती पण कामात जाणार..."**

तिच्या बोलण्यात राग आणि दुःख एकाचवेळी झळकत होतं.

विक्रांत तिच्याकडे फक्त पाहत होता. तो काहीच बोलला नाही.

अचानक तिच्या लक्षात आलं, की लिफ्टमध्ये आपण एकटे नाही आहोत. तिने विक्रांतकडे पाहिलं.

तिची मान व नजर त्याकडे फिरताच विक्रांत पुढे पाहू लागला. आपला मनसंवाद याने ऐकला हे उमजून खजील होत तिने पुढे पाहिले.

मग त्या विजेवर चालणाऱ्या उद्वहनमध्ये निरव शांतता...

आणि मग काहीवेळाने उद्वहन(लिफ्ट)चा 'टिंग' असा आवाज झाला. ते तिसऱ्या फ्लोअरवर पोहोचलेले होते. दरवाजा उघडला.

तरुणी घाईत आधी बाहेर पडली व घाईतच पायांत येणारी साडी सावरत चालू लागली. विक्रांत ती जाईपर्यंत बघत उभारला होता. ती एका कक्षात नाहीशी झाल्यावर मगच तो लिफ्टच्या बाहेर पडला.

लोकल क्राईम ब्रँच (एल. सी. बी.)चे हे कोल्हापूर पोलीस हेडकॉर्टर्स मधील दालन. एलसीबीचे ऑफिसर्स तिथं उपस्थित होते. क्राईम सिनवर जे होते ते हेच सर्व. तरुणी आत आली आणि सुमित म्हणवणाऱ्या कर्मचाऱ्याने मस्करीत टिप्पणी झाडली,

**"मला माहित नव्हतं, आपला ड्रेस कोड चेंज झालाय. आजपासून ट्रेडिशनल कॉस्च्युम करून यायचेत का?"**

मैत्रिणीच्या लग्नाचा कार्यक्रम सोडून तातडीने यावं लागलेली, साडी सावरत येणारी ती आधीच वैतागलेली होती. सुमितने केलेली चेष्टा तिला सहनच झाली नाही. ती अजूनच चिडली.

**"शट अप!" उखडून तिने सुमितवर आग पाखडली.**

तिच्या या त्राग्याने सुमितला अजूनच असुरी आंनद मिळाला.

ती तरुणी एका अंकिता या लेडी ऑफिसरच्या बाजूला येऊन उभारली. ही डिपार्टमेंट् मधली हिची खास व जवळची मैत्रीण, जिच्याशी ती मनमोकळे बोलू शके.

**"नाही पण तुझी सुट्टी होती ना आज? तुझ्या मैत्रिणीचं लग्न होतं..." अंकिताने तिला विचारलं.**

**"होतं ना! पण एसपी सरांचा फोन आला, महत्त्वाची केस आहे आणि लवकर या! मग काय? मैत्रिणीच्या लग्नाच्या हॉलमधून तशीच इकडं आले. आता मैत्रीण आयुष्यभर बोलून दाखवणार आहे मला. आणि त्यात ही साडी! जीव खल्लाय नुसता!" ती भडकत ओरडलीच.**

अंकिताला आता हसू आवरलं नाही. आपली जवळची मैत्रीण पण आपली खिल्ली उडवतीये हे पाहून ती कळकळीने अंकिताला बोलली,

**"गप ना यार!"**

आणि लगेच तिने अविर्भाव बदलला,

**"आणि काय? निखिल सरांची बदली केली म्हणे? कोण आलंय कोण त्यांच्या जागी?" तिने पृच्छा केली.**

अगदी त्याच वेळी विक्रांत आत आला.

**"मीच आहे तो, दीड शहाणा! तुमचा नवीन हेड ऑफ डिपार्टमेंट्; विक्रांत देशमाने!"**

त्या तरुणीच्या तोंडाचा अगदी 'आ' वासला. विक्रांतचा जबर आवाज ऐकून निवांत असलेले सगळेच चपापून ताठ झाले.

खुर्च्यांवर बसलेले प्रमोद, सुमित उठून सावधान उभारले. सर्वांनी एकत्र विक्रांतला सल्युट केलं. ती तरुणी एकटी स्तब्धच.

विक्रांत तरुणीकडे मख्ख बघत बोलला,

**"माफ करा, माझ्यामुळे तुम्हाला इथं येण्याचा त्रास झाला."**

लाजेने पाणी झालेली तरुणी खजील होत इकडे तिकडे पाहू लागली. विक्रांतशी तिला नजर चोरायची होती.

**"वेलकम सर. मी इन्स्पेक्टर सुमित राघव." विक्रांत आणि त्या तरुणीत काय चालुय हे काहीच गावी नसलेला सुमित स्वतःला सीन्सीयर करून बोलला.**

हा सुमित, एरव्ही चेष्टा मस्करीच्या भरात असला, तरी कामच्यावेळी तो डेड सिरीयस असायचा. विक्रांत येताच परकाया प्रवेश व्हावा तसा त्याचा स्थायी भाव बदलून तो गंभीर झाला होता.

कोल्हापूर लोकल क्राईम ब्रँचचा मोस्ट इफिशियन्ट इन्स्पेक्टर म्हणजे सुमित राघव. मस्तीखोर. मस्करी करणारा स्वभाव, पण कामाच्या वेळी अत्यंत गंभीर. आपल्या कलींग्सची टर खेचण्यात याला भारी मजा येत. कारण सर्व कलींग्सना हा

आपला फॅमिली मेंबरच माने. आणि त्यामुळे त्यांना त्रास देण्यात याला कोण आनंद मिळायचा. पण त्याची ही प्रवृत्ती असुरी खासच नव्हती. क्राईम ब्रँच मधील आपल्या सर्व साथीदारांबद्दल त्याला आदर व काळजी होती. विक्रांतवर तर त्याला विशेष आपलेपणा क्राईम सिनवरील त्याची कर्तबगारी पाहिल्यापासून जडलेला होता.

**"गुड मॉर्निंग. मी इन्स्पेक्टर प्रमोद राऊत." प्रमोदनेही आपली ओळख करून दिली.**

विक्रांतची ओळख प्रमोदला ज्योतिबा गडावरच पक्की झाली होती.

हा प्रमोद, फिंगरप्रिंट डिपार्टमेंटचा हेड. आपल्या कामात अत्यंत दक्ष आणि बुद्धिमान. स्पष्टवक्ता. स्ट्रेट फॉरवर्ड स्वभाव. कामाप्रती अतिशय दक्ष. बोटांचे ठसे संकलित करणे आणि त्यांची देखरेख करणे, गुन्हेगारी दृश्यांना भेट देणे आणि तिथले फिंगरप्रिंट्स घेणे हे याचे काम. प्रमोद अटक केलेल्या आरोपींच्या फिंगरप्रिंट्सचा डेटा डेटाबेसद्वारे शोधत असे आणि तपास अधिकाऱ्यांना एकसारखे बोटांचे ठसे पुरवत असे.

**"मी जोसेफ अर्कंज. मी कन्ट्रोल रूम बघतो." आणखी एकाने 'स्व'ची ओळख दिली.**

जोसेफ हा गोवन कॅथॉलिक. ग्रीक शब्द 'आर्खांजलिओस' पासून तयार 'आर्केंजल' या मूळ इंग्लिश आडनांवाचा '**अर्कंज**' हा कोकणी अपभ्रंश. ख्रिस्ती मान्यतेनुसार देवदूतांच्या पदानुक्रमात 'आर्केंजल्स' हे खालून दुसऱ्या क्रमाचे देवदूत मानले जातात.

असे  हे अर्कंज आडनांव धारण केलेला जोसेफ हा संपूर्ण जिल्ह्यातील पोलीस विभागाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पाहत होता. सर्व पोलीस ठाण्यांना एकसंघ जोडणे, जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांशी सतत संपर्कात राहणे. हे जोसेफचे काम. क्षेत्रीय कर्मचारी आणि सर्व स्तरावरील नियंत्रण अधिकारी यांच्यात संवादक म्हणून देखील जोसेफ भूमिका बजावत होता. नियंत्रण कक्ष कायदा आणि सुव्यवस्थेची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचं महत्त्वाचं काम त्याचं होतं.

**"गुड मॉर्निंग सर, अंकिता हांडे." आपला परिचय देत अंकिता बोलली.**

अंकिता ही मनमोकळी आणि आपल्या कामात चोख व हुशार.

अंकिता ही मोडस ओप्रेंडी डिपार्टमेंट् सांभाळत असून गुन्ह्यांची आणि गुन्हेगारांची सर्व माहिती जतन करणे आणि एखाद्या घडलेल्या गुन्ह्यामागे संभाव्यता काय आहे याची माहिती तपास अधिकाऱ्यांना देणे असे जबाबदारीचे काम तिच्याकडे होते.

ही गुन्ह्यांच्या मोडस ऑपरेंडीची माहिती संकलित करत असे आणि ज्ञात गुन्हेगार रजिस्टर, इतिहास पत्रक रजिस्टर, दोषी व्यक्ती यांच्या नोंदी ठेवत असे. या माहितीसह अंकिता गुन्ह्यांमध्ये सहभागी असण्याची शक्यता असलेल्या गुन्हेगारांच्या संदर्भात सूचना देऊन तपास यंत्रणेला मोलाची मदत करत असे.

**"मी सना अकेल. पॅथलॉजिस्ट." आणखी एक महिला अधिकारीने परिचय दिला.**

आपल्या आडनांवाच्या अर्थाप्रमाणेच सना ही सेंसिबल, हुशार व ज्ञानी होती.

सना फॉरेन्सिक पॅथलॉजिस्ट असून संशयित मृत्यू असतील, तर अशा मृतदेहांचे शवविच्छेदन करून मृत्यूचे खरे कारण काय आहे या बद्दलची माहिती संबंधित तपास यंत्रणा व त्यांतील अधिकाऱ्यांना पुरवण्याचे मुख्य काम सना हिचे. मृत व्यक्तीच्या वैद्यकीय इतिहासाचे आणि गुन्ह्याच्या दृश्यांचे पुरावे आणि साक्षीदारांच्या प्रशस्तिपत्रांचे विश्लेषण करणे, मृत्यू कोणत्या इजा किंवा रोगांमुळे झाला आहे का हे मूल्यांकन करण्यासाठी शवविच्छेदन करून पुरावे गोळा करण्याचे काम सना पहायची.

त्याचसोबत मेडीकल एग्झामिनर म्हणून ही काम पाहत असल्याने सना हीच गुन्हेगारांच्या डीएनए प्रोफाईलिंगचे म्हणजे गुन्हेगारांच्या डीएनएची माहिती जतन करण्याचे काम बघत असे.

विक्रांत सोबत लिफ्ट मधून सदर फ्लोअरवर आलेली ती तरुणी मात्र काही बोलली नाही. ती अजून तशीच सुन्न. लिफ्टमध्ये आपण जे बडबडलो त्याची तिला आतून फार शरम वाटत होती.

विक्रांत करड्या नजरेने तिला बघत होता. विक्रांत तिला उद्देशून...

**"आणि या?"**

ती तरुण मुलगी मठ्ठच. ती नजर चोरून पण बावचळलीच.

वरिष्ठ असून त्याच्या प्रश्नाला उत्तर न देता तिचं गप्प राहणं विक्रांतला उद्धट वाटू नये म्हणून मग अंकिताच बोलली,

**"रेवा. रेवा कौशिक." तिने त्या तरुणींचं नांव सांगितलं.**

**"काल या नव्हत्या स्पॉटवर." सर्व माहीत असून त्याने मुद्दाम खोचक वाटावा असा प्रश्न केला.**

**"हो म्हणजे. दोन दिवस तिने सुट्टी घेतली होती." अंकिताच बोलली.**

**"आणि तरी कामावर यायला लागलं आहे. नाही?!" विक्रांत कुत्सितपणे रेवाला तिरकस बघत खोचक बोलला.**

त्याने आपली पूर्ण नजर रेवावर फिरवली. रेवा गडबडली.

**"नाही म्हणजे..." ती चपापली.**

विक्रांतने तिला टोकलं,

**"एक्सप्लिनेशनची गरज नाही. पण एक सुचवतो; तुम्हाला रागवायचंच असेल, तर माझ्यावर नको, त्या व्यक्तीवर रागवा जिने आमदारांच्या पोरीला मारलं." त्याने तिला टोमणा मारला.**

रेवा अजूनही आपल्या स्वतःच्या डिफेन्ससाठी काही बोलायला तोंड उघडणार, तोच विक्रांतने तिला हात उंचावून थांबवलं. ती गप्पच झाली.

आणि त्याने कामावर लक्ष केंद्रित व्हावं म्हणून तिकडे सर्वांचं लक्ष वळवायला ज्यासाठी सर्व जमलेत तो विषय छेडला,

**"काही लीड्स? का मज्जाच चालू आहे?" यातही तो कुचकट बोललाच.**

**"काम चालू आहे सर. आपण येणार म्हणून एसपी सरांच्या सांगण्यावरून इथं जमलोय." प्रमोदने सर्वांच्या वतीने बचाव केला.**

आणि ते खरंच होतं. सर्वांनी आपापली कर्तव्ये इमानेइतबारे पार पाडली होती.

**"सापडलेल्या लायसेन्स बद्दल काही माहिती? कार्डची स्थानिक पोलिसात अगर आरटीओमध्ये हरवल्याची नोंद किंवा ड्युप्लिकेट बनवून घेतलंय असं काही?" विक्रांतचे विचारणे.**

**"नाही सर." सुमितचे सांगणे.**

**"आणि त्या कार्डचे फिंगरप्रिंट् रिपोर्ट्स पण अजून यायचे आहेत." प्रमोद बोलला,**

**"म्हणजे तसं हे माझं काम आहे. पण एसपी साहेबांनी फॉरेन्सिककडं सोपवल्यानं माझ्याकडं अजून काही रिपोर्ट्स नाहीत त्याबाबत."**

तोच सुकृत काही रिपोर्ट्सचा गठ्ठा घेऊन आत आला.

**"आणि ते घेऊन सुकृत राठोड हजर झाला आहे." तो हसतमुख जिंदादील ओरडला.**

त्याला बघूनच त्रस्त भाव विक्रांतच्या चेहऱ्यावर उमटले.

सुकृत हा फॉरेन्सिक एक्स्पर्ट होता. कोल्हापूर पोलीसांचे फॉरेन्सिक डिपार्टमेंट् हा सांभाळयचा. एखाद्या गुन्ह्याच्या ठिकाणी गोळा केलेल्या पुराव्यांचे भौतिक व रासायनिक विश्लेषण करणे व पोलिसांना तपासात मदत करणे हे याचे

प्रामुख्याचे काम. तसेच गुन्ह्याच्या ठिकाणी तपास करून पोलिसांना मदतही करत असे.

सडपातळ शरीरयष्टी, परंतु फॉरेन्सिक सायन्सचा उत्तम जाणकार. बेहद्द हुशार. जिंदादील आणि हसतमुख. याचे असे असणे मात्र शांत व गंभीर अशा विक्रांतला नेहमी डोक्यात तिडीक आणणारे ठरायचे. पण म्हणून विक्रांत याचा तिरस्कार करत नसे. त्याच्या हुशारीला विक्रांतची नेहमीच प्रशंसा लाभे. आणि याची हुशारी पाहूनच विक्रांत याचा आदरही करे. सुकृतच्या मनातही पहिल्या भेटीपासून विक्रांतबद्दल अपार आपलेपणा होता. विक्रांतच्या बुद्धिमत्तेवर सुकृत बेहद्द खुश असायचा.

**"फिंगरप्रिंट्स सापडले आहेत, पण ते गाडीत सापडलेल्या कोणत्याच फिंगरप्रिंट्स सोबत जुळत नाहीत." सुकृत महत्त्वाची वाटणारी लीडच हाणून पाडत बोलला. बोलताना तो हसतमुखच होता.**

'शोधाच्या मार्गात रोडा टाकून हा हसतो काय?' असं विक्रांतला वाटून गेलं.

**"फिंगरप्रिंट् डिपार्टमेंट् कोण बघतं?" विक्रांतने सुकृतकडे दुर्लक्ष करत इतरांना विचारलं.**

**"मीच सर. फिंगरप्रिंट् डिपार्टमेंटचा इंचार्ज आहे मी." प्रमोद बोलला.**

**"के. राठोड यांच्याकडून डेटा घ्या. आणि आपल्याकडच्या कुठल्या डेटाशी ते आयडेंटिकल होतात का ते बघा." विक्रांतने त्याला सूचना केली.**

**"येस सर." प्रमोद ताठ होत खणखणीत उद्गारला.**

**"काही डीएनए ट्रेसेस?" विक्रांतचा पुढचा सवाल.**

**"आहेत. गाडीत ड्रायव्हिंग सीटवर केस सापडला होता." सुकृतचं त्यावर उत्तर.**

**"आपल्याकडील कोणत्या रजिस्टर्ड डीएनए प्रोफाइलशी मॅच झालं?" विक्रांतने विचारलं.**

यावर सनाने उत्तर दिलं,

**"मेडिकल एग्झामिनर म्हणून मीच डीएनए प्रोफाईलिंगच कामही बघते सर. मी चेक केलं, पण कुठल्याच रजिस्टर्ड् क्रिमिनल डीएनए प्रोफाईलशी तुषार नवले यांची नवीन डीएनए प्रोफाईल मॅच झालं नाही."**

**"इनिशियल एटॉप्सी झाली असेल?" विक्रांतने सनाला विचारलं.**

**"होय सर." सना म्हणाली.**

**"काही विषप्रयोग वगैरे नव्हताच." विक्रांत त्याचा तर्क पुनः उद्धृत करत बोलला.**

**"अगदी. शिवाय दुसऱ्या कुठल्या जखमा देखील नाहीत. लागलेल्या गोळीनेच जीव गेलाय. पण आणखी एक सर, त्या मृत महिलेच्या हृदयावर प्रचंड दाब तयार झाला होता." सनाने पुस्ती जोडली.**

**"हार्ट अटॅक?" विक्रांतच्या कपाळावर आठ्या उमटल्या.**

**"हो सर." सना गंभीर होकारली.**

**"तिला हार्टचा त्रास होता?" सुमित गोंधळला.**

**"नाही." सनाने स्पष्ट केलं.**

**"मग?" सनाच्या उत्तराने सुमितचा गोंधळ जास्तीच वाढला.**

विक्रांतने त्याची शंका निरसली,

**"अचानक अनपेक्षितपणे हल्ला झाल्याने भीतीने तसं होऊ शकतं. असो, बॉडीवर काही फिंगरप्रिंट्स?" त्याने पुढे विचारलं.**

**"आहेत. त्याचे सॅम्पल्स फॉरेन्सिकला आणि फिंगरप्रिंट डिपार्टमेंटला जमा केले आहेत." सनाने तिची कार्यतत्परता स्पष्ट केली.**

विक्रांत प्रमोदकडे वळला,

**"त्या प्रिंट्स पण कुणाशी जुळत नाहीत." विक्रांतने काही न विचारता त्याचा रोख समजून प्रमोदने तत्परतेने उत्तर दिलं.**

तोच सना अगदी गंभीर ड्रमॅटीक बोलली,

**"वन मोअर थिंग् सर,"**

तिचा अविर्भाव ध्यानी घेऊन सर्वांनी कान टवकारून सनाकडे बघितलं. ती काय सांगते याकडे अवघ्यांचे लक्ष!

**"अदिती मोहिते या दोन महिन्यांच्या गरोदर होत्या!"**

तिचं म्हणणं ऐकायला म्हणून सगळे गप्प झाल्याने जी निरव शांतता झाली होती, तीत सनाचे हे बोल स्फोटक बनून उभारले.

सगळेच धक्कावले! विक्रांतने अविश्वासाने सनाकडे बघितलं. त्याचा मुकप्रश्न लक्षात घेऊन सना कन्फर्मेशन देत बोलली,

**"येस सर!"**

**"सना मॅम म्हणतात ते खरंय." सुकृतनेही दुजोरा दिला.**

विक्रांत त्यातून सावरत बोलला,

**"अदितीचा मोबाईल सापडलाय ना? तर तिचे कॉल रेकॉर्ड्स कलेक्ट करा. तिच्या रिलेशनमध्ये जे कोणी असतील त्यांची सगळ्यांची चौकशी करा. तिचं कोणाशी अफेअर वगैरे होते का याची लीड घ्या. त्या लायसेन्स होल्डर तुषार नवलेचा आणि अदिती हिचा काही संबंध होता का ते पण तपासा." त्याने पटापट आदेश सोडले.**

मग पुन्हा विक्रांतने सुकृतकडे मोर्चा बांधला,

**"फुटप्रिंट्सचं काय?" त्याने विचारलं.**

**"नऊ नंबरचा शू आहे." सुकृतने माहिती दिली.**

**"म्हणजे खूनी पाच फूट आठ अगर नऊ इंच वगैरे असेल." त्याने तर्क केला.**

आणि लगेच त्याने सर्वांवर एकसलग नजर फेकली,

**"बरं, मोडस ओपरेंडीचे कोण आहे?" विक्रांतचा लगेच कर्मचाऱ्यांना प्रश्न.**

**"मी आहे सर." अंकिता हिरीहीरीने बोलली.**

**"काय वाटतं?" विक्रांतने अंकिताला तिला काही लिंक्स मिळाल्यात का पहावं म्हणून विचारलं.**

पूर्वी तंतोतंत असे गुन्हे घडलेत असं झालं, तर काम खूप सोपं होणार होतं.

**"गेल्या दोन वर्षात पॉईंट थ्रीटू रिव्हॉल्वरने शहरात खून होण्याची ही तिसरी वेळ आहे सर." अंकिताने माहिती पुरवली.**

जी पुन्हा स्फोटक होती. यावेळी मात्र विक्रांतवर त्याचा काही परिणाम झाला. तो तसाच निर्विकार.

**"व्हिक्टीम्स?" विक्रांतने विचारलं.**

**"त्याही तरुण मुलीच होत्या. रमा कुशवाह आणि निलोफर महात." अंकिता बोलली.**

**"त्यावेळी व्हिक्टीम्समध्ये आणि कल्प्रिटमध्ये काही झटापट झाल्याची नोंद आहे?" विक्रांतचा सनाला प्रश्न.**

**"नो." सनाचे उत्तर.**

**"आणि पूर्वी दोन्ही वेळेला खूनी सापडलेला नाही!" विक्रांत भुवई उडवून बोलला.**

हे स्वाभाविकच होतं, कारण प्रथमच गुन्हेगार सापडला असता, तर मग दुसरा आणि तिसरा खून असा झालाच नसता. तरी हे पुन्हा तर्कच. त्याला बळ देण्यासाठी तसे पुरावे हवेत!

**"राईट सर." अंकिता विक्रांतच्या तर्काला दुजोरा देत बोलली.**

**"म्हणजे सिरीयल किलिंगची शक्यता नाकारता येत नाही." विक्रांतने परत तर्क केला.**

**"खूनी सायकोपॅथच असावा." सुमित विचार करत बोलला.**

**"अदिती मोहिते आणि मागील दोन मुलींच्यात काही लिंक?" विक्रांतला काही लीड्स मिळतात का पहायचे होते.**

**"चेक केलंय सर. तिघीही एकमेकांना ओळखत नव्हत्या." अंकिता बोलली.**

**"पण त्या तिघी खुनीला ओळखत होत्या हे नक्की!" विक्रांत ठाम बोलला.**

**"बट हाऊ?" प्रमोद आश्चर्याने स्वत:शीच उद्गारला.**

म्हणजे ज्या मार्गाने तर्क होत होता त्याला पटत होते, पण मृत सर्व महिला खूनीला ओळखत होत्या हे त्याच्यासाठी अचंब्याचं होतं. त्या अचंब्यातूनच त्याचे हे उद्गार आले होते.

**"पूर्वी जे सिमिलर खून झालेत, तेव्हा काही फिंगरप्रिंट्स सापडले असतीलच?" विचारी विक्रांतने प्रमोदला पुसलं.**

**"होय." प्रमोद झटकन उत्तरला.**

**"एक काम करा, त्या दोन्ही केस मधील फिंगरप्रिंट्स आणि या केसमध्ये कलेक्ट झालेले फिंगरप्रिंट्स मॅच होतात का बघा." त्याने प्रमोदला फर्मान सोडलं.**

**"नक्कीच सर." प्रमोदने ते शिरसावंद्य मानलं.**

**"आणि त्यावेळी काही डीएनए ट्रेसेस मिळाले असतील, तर तेही आत्ता उपलब्ध झालेल्या डीएनएशी जुळवून बघा! तिन्ही केसेस रिलेटेड आहेत का हे स्पष्ट होईल आणि तपासाला दिशा मिळेल. असे काही नसेल,**

**तर पूर्वीच्या केसेसचा विचार करण्यात अर्थ नाही. वेळच वाया जाईल." विक्रांत तडक सनाला बोलला.**

**"हो सर!" सना विक्रांतचा आदेश मानत म्हणाली.**

**"राईट. जर तिन्ही प्रिंट्स मॅच झाल्या, तर शोध घ्यायला एक दिशा मिळेल आणि खूनी एकच आहे की वेगवेगळे आहेत तेही कळेल." अंकिता एक्साईट होत बोलली.**

**"तुषार नवलेच्या सर्च वॉरन्टसाठी मॅजिस्ट्रेटकडे एप्लाय करा. लेट्स सी, व्हॉट ही हॅज टू ऑफर अस!" आणि तो जोसेफकडे वळला,**

**"मिस्टर जोसेफ, सगळ्या चौकींना आणि पोलीस स्टेशन्सना कळवा, कुठल्याही एरियात कोणीही संदिग्ध वाटलं, तरी लक्ष ठेवा म्हणावं. आरटीओ ऑफिसर्सना देखील लक्ष द्यायला सांगा. बस स्टॉप्स, रेल्वे स्टेशन्स, एयरपोर्ट, टोल्स सगळीकडे लक्ष ठेवा. संबधितांना तशा सूचना द्या. पेट्रोलिंगला सुद्धा लक्ष ठेवायला सांगा. वेळ झाला आहेच या गोष्टींना. बट लेट्स ट्राय." विक्रांतने जोसेफला सूचना केल्या.**

विक्रांतचं तपास कार्य एकामागून एक फैरी झाडल्यासारखं चाललं होतं. तूर्त गोळा झालेली माहिती इतकीच असल्याने आता तीवर कृती करणे गरजेचे होते. म्हणूनच विक्रांत अटेंशनमध्ये आला. सर्वांनी सावधान होत त्याला सल्युट ठोकला. विक्रांत जाऊ लागला, पण मग काहीतरी आठवून तो थांबला.

**"आणि हो! ज्यांना काही काम करायचं नाही, त्यांनी गेलं, तर चालेल." रेवाकडे बघून तो तुसडं बोलला.**

हे ऐकून रेवा जरा चिडलीच. विक्रांत जाण्यास वळला, तसा सुमित बोलला,

**"आम्ही सोबत येतो सर." त्याच्या बोलण्यात काळजी सहज झळकत होती.**

**"आय वर्क अलोन." विक्रांत ठणकावल्यागत बोलला.**

पूर्वी घडलेल्या एका घटनेने जी त्याच्या निलंबनालाही जबाबदार होती, तसे पुन्हा घडू नये म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्याच्या सदऱ्यात सरकलेला विक्रांत स्वतःच फिल्डवर व त्यातही फ्रंटवर राहून तो स्वतःच कार्य मार्गी लावणार होता असं त्यानं निश्चयी केलं होतं.

त्याच निश्चयात त्याने लोकल क्राईम ब्रँचचं डिपार्टमेंट् स्थित असलेला तो ब्लॉक सोडला.

◆◆◆

विक्रांत दालन सोडून बाहेर आला, तोच समोरून निरंजन त्यास आडवे आले. त्यांच्या हाती एन्वेलोप व ग्लॉक होती.

**"आपण बाहेर?" विक्रांतने त्यांना विचारलं.**

**"तुमची चर्चा चालू होती म्हणून बाहेरच थांबलो." निरंजन निर्मळ हसून बोलले.**

**"तुम्ही सुप्रीटेंडेंट आहात." विक्रांत त्यांना म्हणाला.**

**"मला तरीही हस्तक्षेप करायचा नाही. तू निभावून नेशील. मला खात्री आहे." निरंजन त्याला नितळ हसत विश्वासू बोलले आणि म्हणाले,**

**"मी आलो कारण, अरे तू हे माझ्या केबिन मध्येच ठेवून आलास."**

विक्रांत पुढे चालत निरंजन यांना क्रॉस करून गेला व अचानक काही बोलायची उत्कटता वाटून तो मागे न बघताच निश्चयी बोलला,

**"तुम्हाला माहित आहे मी ते का ठेवलंय."**

निरंजन त्याच्याकडे वळले,

**"पण..."**

पाठमोरा विक्रांत समजवण्यासाठी निरंजन यांच्याकडे फिरला,

**"डोन्ट वरी सर. असंही माझी अपॉइंटमेंट झाली आहेच. आणि मी जॉब स्वीकारलाही आहे. पण ही केस जर मी मार्गी लावू शकलो नाही, तर मला पुन्हा जॉबलेस केलं जाईल हे मला ठाऊक आहे. जोपर्यंत ही केस मी यशस्वी रित्या निकाली काढत नाही, तोपर्यंत मी त्यांना हात लावणार नाही." विक्रांत निश्चयी बोलला,**

**"मला आत्मविश्वास नाही म्हणून नाही, तर माझा स्वाभिमान म्हणून!" तो आपला ठाम निश्चय वदला.**

तो खूनी शोधून काढेलच याची त्याला पूर्ण खात्री होती हे वेगळे सांगणे न लगे!!!

**"पण तुझी सेफ्टी?" निरंजन विक्रांत प्रती आपली काळजी व्यक्त करत आर्जवी बोलले.**

मग त्यांची चिंता कमी व्हावी म्हणून विक्रांतने आपली **'आय.ओ. एफ.' निर्मित 'पॉईंट टूटू' कॅलिबर 'निडर'** रिव्हॉल्वर काढली, पण बोट ट्रिगरवर न घेता बॅरेलला समांतर ठेवत,

**"आय हॅव माय ओन!" तो आत्मविश्वासाने बोलला.**

विक्रांत जाण्यास वळला व रिव्हॉल्वर पुन्हा होलस्टरमध्ये लॉक करत तो चालू लागला.

सुमित एव्हाना बाहेर आला होता. एसपी आणि विक्रांतचा संवाद त्याने ऐकला होता. विक्रांत जाताच काळजीने तो एसपींकडे आला.

**"ते एकटेच गेलेत. सोबत येतो म्हणालो, तर नाही म्हणाले." सुमित काळजीने सांगता झाला.**

**"ही हॅज हिज ओन इशूज." निरंजन फक्त एवढंच म्हणाले. अधिकची माहिती देणे त्यांनी टाळले.**

**"म्हणजे सर?" सुमितची काळजी उलट वाढली होती.**

निरंजन अजूनही गंभीर मुद्रेने विक्रांत गेलेल्या दिशेनेच पाहत होते,

**"सांगेन कधी तरी." ते एवढेच बोलले आणि त्यांनी सुमितकडे बघितलं,**

**"तुम्ही तुमची कामं करा." त्यांनी समजुतीने सूचना केली.**

■■■

विक्रांत गाडी सुरू करणार इतक्यात रेवा दरवाजा उघडून त्याच्या शेजारी बसली. तिच्या हाती एक एन्वेलोप होतं. विक्रांत भुवई उंचावून इरिटेशनने तिच्याकडे पाहतच राहिला.

**"माय डे इज ऑलरेडी रूइन्ड्!" रेवा रागीष्टच होती.**

**"मग काय आता माझा दिवस रूइन्ड् करायचा विचार आहे?" विक्रांत तिला कुचकट बोलला.**

रेवाने रागीट भावाने त्याच्याकडे बघितलं. 'हा असेल आपला वरिष्ठ परंतु आपल्याला असा कसं बोलू शकतो?' याचा तिला जरा रागच आला होता.

विक्रांतवर तिच्या रागाचा प्रभाव पडला नाही. तो स्वतःला त्यांचा वरिष्ठ आणि त्यांना आपल्या हाताखालचे कर्मचारी असं काही मानतच नव्हता.

तिच्या रागाकडे दुर्लक्ष करून विक्रांत मग पुढे पाहून गाडी चालवू लागला...

गाडी हेडकॉर्टर्सच्या मेनगेट मधून बाहेर पडली...

गाडीत विक्रांत शेजारी बसलेल्या रेवाचं लक्ष त्यांच्या मधील मांजराकडे गेलं होतं. हे इवलंसं गोंडस मांजरीचं पिल्लू पाहून तिचा राग आणि त्रागा एव्हाना कुठल्या कुठे उडून गेला होता. ती त्या मांजराला प्रेमाने कुरवाळू लागली.

**"हाऊ क्युट!" ती मांजरीला कुरवाळत तणावरहित आनंदी बोलली.**

विक्रांतने कपाळावर आठ्या पाडत तिच्याकडे बघितलं,

**"अं?" तो विचित्र मुद्रा करत उद्गारला. त्याचा काही औरच गैरसमज झाला होता कदाचित...**

**"मी या मांजराबद्दल बोलतीये." ती खटक्याने तडख बोलली.**

**"वॉरन्ट?" विक्रांतने मग विषय बदलला.**

आपली फजिती झालीये हे त्याला समजून गेलं. खजीलतेचे क्षण वाटी येऊ नयेत म्हणून त्याचा हा प्रपंच. नाही तर रेवा दुसरं कसलं एन्वेलोप घेऊन येणार होती...?

रेवाने मांजरीला प्रेमाने कुरवाळतच हातातील एन्वेलोप विक्रांत समोर धरलं. विक्रांत ते न घेता तो पुढे बघू लागला. वॉरन्ट प्राप्त झालं, इतकं त्याच्यासाठी पर्याप्त होतं. ते उघडून पाहण्याची त्याला आवश्यकता वाटली नाही. तिने मग ते डॅशबोर्डवर ठेवलं. विक्रांतच्या तोंडात अजूनही कँडी सिगारेट होती.

लिफ्टमध्ये भेटल्यापासून ते आत्तापर्यंत हा उद्धट एकतर डोळ्यांना काळा गॉगल लावून तर आहेच, पण सिगरेट सुद्धा तोंडात धरून आहे हे रेवाला अजिबात आवडलं नव्हतं. तसा शेरा तिने आपल्या अंदाजात विक्रांतला मारला देखील...

रेवा मांजराला कुरवाळत बोलली,

**"तुला माहितीये किटी; किमान मुलींसमोर सिगरेट ओढू नये इतकी कर्टसी नसते काही लोकांना."**

**"कँडी आहे." विक्रांत आपली बाजू स्पष्ट करत भावरहित म्हणाला.**

त्याने ओव्हरकोटच्या आतील खिशातून ते कँडीचं पाकीट काढलं व पाकिटाला हेल देऊन एक कँडी वर काढली.

**"वॉन्ट वन?" त्याने कँडी पाकिटातूनच रेवाला ऑफर केली.**

हात लावून त्याला ती डागळायची नव्हती. तशी कँडी दुसऱ्याला कशी देणार? ते सर्वसामान्य दाक्षिण्याला साजेसं नाही. शिवाय ही त्यावरूनही आणि काहीतरी बोलायची...

रेवाने त्या कँडीकडे दृष्टी टाकली आणि मग पुन्हा मांजराकडे बघून मांजराला कुरवाळू लागली. ती सिगरेट नसून कँडीच आहे का व विक्रांत त्याबद्दल खरं बोलतोय का याची तिला खात्री करायची होती, ती तिने केली होती.

**"नको?" विक्रांतने खात्रीसाठी विचारलं.**

**"अंहं." ती मांजराच्या पिलांशी खेळत पिल्लावरच लक्ष ठेऊन नकारली.**

**"ओके. पण पुन्हा असं म्हणू नका, की मला कँडी ऑफर करण्याची सुद्धा कर्टसी नाही." विक्रांतने तोंड बनवले.**

आणि हेल देऊन कँडी परत कागदी बॉक्समध्ये सारत बॉक्स कोटच्या खिशात त्याने ठेवून दिला.

त्याचा टॉन्ट तिला लक्षात आला. तिने रागीट नजर विक्रांतवर फेकली.

**असो, तर आता प्रश्न असा होता, की दोघे ज्या मोहिमववर चालले होते, काय ते योग्य मार्गावर होते...???**

# ५. अभियुक्त आरोपी...

एका घराबाहेर विक्रांत आणि रेवा गाडीतून उतरून आले व बंद दाराशी थांबले. बाहेरच विक्रांतला दगडी पायऱ्यांवर बुटांची एक पेअर दिसली. त्याने त्यातील एक जोड उचलून पाहिला. बुटाच्या आकारावरून त्याला अंदाज आलेला अपेक्षित नंबर...

**"नऊ!" विक्रांत रेवाकडे बघत म्हणाला.**

त्या मुद्रित अंकाकडे पाहत असलेली रेवा संदिग्ध नजरेने त्याच्याकडे पाहत होती.

**"म्हणजे..." डोक्यात काही चमकून ती हलकेच पुटपुटली. तिचे डोळे मोठे झाले होते.**

विक्रांतने तिला वाक्य पुरं करू दिलं नाही. त्याने हात करून तिला थांबवलं.

घराची बेल वाजली. बावीस-तेवीस वर्षांच्या तुषारने येऊन दार उघडलं. उंचीला साधारण पाच फूट नऊ इंच. बाहेरचे पदत्राण याचेच.

याच्याच मुलाखतीसाठी विक्रांत आणि त्याच्यासोबत रेवा इथंवर आले होते. दारात, हातात सर्च वॉरन्टचे एन्वेलोप घेतलेला विक्रांत आणि त्याच्या मागे एक पायरी खाली रेवा उभी या तुषार नामक इसमाला दिसले.

**"तुमचं लायसेन्स हरवलं का?" विक्रांतने त्याला विचारलं.**

**"होय. पण तुम्हाला कसं..." तो संदिग्ध उत्तरला.**

विक्रांतने त्याला टोकलं,

**"आधी सांगा, तुम्ही लायसेन्स हरवल्याची तक्रार का नाही केली? डुप्लिकेट लायसेन्स देखील बनवून घेतले नाही. का? समजू शकेल?" विक्रांतने कठोर विचारलं.**

**"ते एक्सपायर हुनारच हुतं. म्हंटलं नवीनसाटीच अप्लाय करू. पन तुमी कोन?" तुषार शंकीत आठ्या कपाळावर घेऊन विचारत होता.**

हे कोण आणि प्रश्न का विचारत आहेत हे त्यास इकडे पूर्णतः अनभिज्ञ होतं.

**"विक्रांत देशमाने. क्राईम ब्रँच! आम्हाला तुमच्या घरची झडती घ्यायची आहे."**

विक्रांतने वॉरन्टचा एन्वेलोप वर केला,

**"हा सर्च वॉरन्ट!" तो कठोर बोलला.**

वॉरन्ट तुषारच्या हाती टेकवून विक्रांत आत प्रवेशला. तुषार पडल्यासारखा मागे झाला. तो क्षणात भयंकर घाबरला होता. मघापातोर कसलेच भाव मोहऱ्यावर नसलेला तुषार सेकंदाच्या हजारव्या हिश्श्यात त्याची चर्या बदलून भयप्रद झाला होता तो.

**"काय प्रकार कायाय? काय झालंय सर?" भीतीपोटी तो झटझट बोलला.**

स्वतःचा बचाव करणं गरजेचं असल्याने काही निमिषात त्याच्यात आपसूक त्राण भरले गेले होते.

**"आमदार महादेव मोहिते यांच्या मुलीचा खून झाला आहे." विक्रांत निर्विकार पण थेट बोलला.**

**तुषारसाठी हा शॉक होता!**

**"काय?" तो अविश्वासाने ओरडलाच!**

पण मग स्वतःला सावरत आपला तिच्याशी काही संबंध नाही असे भासवण्यासाठी त्याला बसलेला धक्का लपवत त्याने स्वतःला सावरत रिलॅक्स केलं...

**"पन पन माजा काय संबंद?" तो 'स्व' बचावासाठी बोलला.**

**"तेच शोधायचंय!" विक्रांत घरात इकडे तिकडे नजर टाकत म्हणाला.**

मग त्याने मागे रेवाकडे सूचक पाहिलं,

**"मिस रेवा. सर्च दि एरिया!" त्याने रेवाला हुकूम सोडला.**

अजून बाहेरच उभी रेवा आत आली आणि विक्रांतने सांगितलेले काम पार पडायला ती आतल्या खोलीत गेली.

**"शाल वि टॉक?" विक्रांत तुषारला म्हणाला.**

पुढे येऊन तुषारच्या परवानगीशिवाय विक्रांत लेदरच्या सेटीवर बसला. इथे तुषारची चौकशी करायला आल्याने त्याच्याकडेच अप्पर हॅन्ड होता. म्हणूनच त्याचं हे वागणं मॅनरलेस वाटलं, तरी तुषार काही बोलू शकत नव्हता. तुषार देखील हळूच येऊन त्याच्या बाजूच्या सोफ्यावर संथ बसला. त्याचा चेहरा चिंता व भिती

या संमिश्र भावनांनी झाकोळला गेला होता. खिन्नताही काहीशी पसरली होती त्याच्या चर्येवर...

**"मी खरं सांगतोय सर, माजा या खूनाशी काई संबंद नाई." तो कळकळीने व्यक्त झाला.**

त्याच्या काकुळतीचा विक्रांतवर बाकी काही फरक पडला नाही.

**"ते कळलेच." विक्रांत चप्पट तोंडाने रुक्ष म्हणाला,**

**"तुम्ही म्हणालात, तुम्ही नवीन लायसेन्ससाठी एप्लाय करणार आहात. पण त्यासाठी जुन्या कार्डची कॉपी लागेलच की. मग?" विक्रांतने सहज विचारायचं अशापद्धतीने प्रश्न केला, पण तो खरेतर तुषारचे तिथेच इंटेरोगेशन करत होता.**

**"माज्याकडं झेरॉक्साय." तुषार झटकन बोलला. तो अजूनही डिफेन्स मोडमध्येच होता.**

इथून पुढे तो तसाच राहणार होता...

**"ओके. मला सांगा, काल मध्यरात्री तुम्ही कुठं होता?" विक्रांतचा शांत प्रश्न.**

**"मी... ऑफिसातच हुतो." तुषारने आपली बाजू नितळ केली.**

**"काय करता तुम्ही?" विक्रांतची पृच्छा.**

**"मी सिंघल मल्टिमेडिया कंपनीत कामालाय आहे. एका प्रोजेक्टची डेडलाईन जवळ आल्या म्हनून ओव्हर टाईम चालूआय.**

**सगळ्याच इम्प्लॉईजची. तुमी खात्री करू शकता." तुषार बाजू स्पष्ट करत अधिक बोलला.**

रेवाने शोधाशोध तुषारच्या झोपण्याच्या खोलीपासूनच सुरू केली होती. सर्च करत असता तिने गादी विस्कटून पाहिली होती.

काहीही ठेवायचं म्हंटलं, तर आधी ते गादीखालीच ठेवायचं असा एक सर्वसामान्य भारतीय मानवी स्वाभाविक धर्मच झालाय. तिथे काही घावेल या विचाराने तिने गादी उलटीपालटी करून, तिथं काही न मिळाल्याने मग बेडचे कप्पे विस्कटून रेवाने पाहिलं होतं. तिथंही काहीच न सापडल्याने मग तिने सोबतच्या टेबलचा ड्रॉव्हर उघडला... **आणि आत...**

**'.32' रिव्हॉल्वर!**

संदिग्ध भाव रेवाच्या चेहऱ्यावर पसरले. रेवाने ती हॅन्डगन उचलली आणि परत बाहेर आली. तिच्या पायांना विलक्षण गती आली होती.

विक्रांत व तुषार बसलेल्या लिव्हिंगरूम मध्ये रेवा घाईत आली.

**"सर!" तिच्या बोलावण्यात काहीतरी महत्त्वाचं गवसल्याची तीव्र भावना होती.**

विक्रांत व तुषारने एकाचवेळी तिच्याकडे माना वळवल्या... तिच्या हाती 'ती' रिव्हॉल्वर होती. नाही म्हणायला सहज ध्यानात येईल इतकी भीती तुषारच्या मोहऱ्याचा ताबा घेत क्षणार्धात पसरली. विक्रांतने तुषारकडे बघितलं.

**"याबद्दल काय स्पष्टीकरण द्याल?" विक्रांतने शांतपणे सूचक भुवया उडवत विचारलं.**

**"म... माजीचाय..." तुषार चाचपत बोलला.**

**"तुमचं काम तर असं नाही, की तुम्हाला याची गरज पडावी. मग?" सत्यच अपेक्षित आहे अशा स्वरात विक्रांतने थंडपणे विचारलं.**

**"आवडाय सर. आनि सौरक्षन काय प्रत्येकाला लागतंच की." तुषारने बचाव केला.**

**"याचं लायसेन्स? का तेही हरवलंय?" विक्रांतने खोचक टोला लगावला.**

**"नाई. हाय." तुषार घाईत बोलला.**

**"या घेऊन या." विक्रांतने त्याला अज्ञाच केली.**

तुषार विनाविलंब गडबडीने आत गेला.

काही वेळाने लायसन्स घेऊन आला तेही घाईतच. त्याने ते विक्रांत समोर धरलं. विक्रांतने ते घेतलं व निरखून पाहिलं आणि रेवाकडे सुपूर्द केले. रेवानेही ते लायसन्स नीट पाहून घेतलं.

**"तुमची टू-व्हीलर कुठाय?" विक्रांतने तुषारला विचारलं. त्याला शंकेला जागा ठेवायची नव्हती तिळमात्र...**

**"हाय भायर!" तुषार कससं बोलला.**

**"तुम्ही इथंच थांबा." विक्रांत तुषारला आदेशत म्हणाला व त्याने रेवाला निर्देश दिले,**

**"मिस रेवा, कम विथ मी."**

विक्रांत व त्याच्या मागून रेवा बाहेर गेले.

तुषारची टू-व्हीलर गेटच्या आत उभी होती. विक्रांत व रेवा तिथे आले. बुटावर नजर पडल्याने आणि ते पाहत असतानाच दार उघडलं गेल्याने ही गाडी अजून त्यांच्या नजरेत भरली नव्हती, ती आता ठळक दिसत होती.

**"पण सर त्याला असंच सोडून..." रेवा चिंता व्यक्त करत बोलली.**

विक्रांतने तिला थांबण्यास हात केला. ती गप्प झाली, पण बरीच अस्वस्थ होती ती. विक्रांतने खिशातून मोबाईल काढला व फोन लावला.

पलिकडून एसपी निरंजन घोलप यांच्याकडून कॉल रिसिव्ह होताच विक्रांत बोलू लागला,

**"सर, आपल्याला झाडीत सापडलेल्या बाईकच्या टायर मार्क्सचा फोटो मला सेंड करायला सांगा."**

पलिकडील संमतीसाठी तो थोडं थांबला आणि ती मिळताच आभार व्यक्त करता झाला,

**"थँक्स."**

विक्रांतने फोन कट केला व नेट चालू करून तो खाली बसला. विक्रांत टू-व्हीलरची टायर निरखून पाहू लागला. टायरला माती लागली होती. ती नीट पाहत असतानाच विक्रांतचा मोबाईल वाजला. तो आलेला फोटो विक्रांतने बघितला. आणि फोनची स्क्रिन रेवाकडे वळवली. रेवाने वाकून फोटोवर नीट दृष्टिक्षेप टाकला.

**"सेम मार्क्स...?!" रेवा विस्मयाश्चर्याने उद्गारली.**

विक्रांतची होकारात मान हलली आणि त्याने उभारून मोबाईल खिशात सारला.

**"मग आपण इथं का थांबलोय? त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला तर..." रेवाने चिंतीत जलदी केली.**

ती जितकी उद्विग्न होती, विक्रांत तेवढाच शांत होता,

**"मला तेच बघायचंय, की तो काय करतो." तो संथ म्हणाला.**

**"आणि तो गेलाच तर?" रेवाची मोठी काळजी.**

विक्रांत तिच्याकडे बघून निर्भेळ हसला,

**"पुन्हा पकडू!" तो स्थायी शांत भाव ठेवून म्हणाला.**

**"घराला मागचा दरवाजा असेल का?" रेवाचा विचार.**

ती अजूनही काळजीमुक्त झाली नव्हती. विक्रांतने निष्काळजी खांदे उडवले,

**"हु नोज." तो अजूनही निर्मळ हसतच होता.**

थोड्यावेळ जाऊ दिला त्याने, आणि मग...

**"चला." तो सस्मित हसूनच रेवाला बोलला.**

आणि दोघे तसदीने आत गेले.

विक्रांत आणि रेवा पुन्हा घरात आले. रेवा जलद होती, तर विक्रांत निवांत.

ते पाहतात, तर तुषार जागीच उभा होता. रेवाने प्रश्नार्थक नजरेने विक्रांतकडे दृष्टिक्षेप केला.

एकतर याने आपण सापडू नये याची योग्य ती काळजी घेतली आहे, अगर स्वतःच्या सुटकेची निक्षून परखड तजवीज केली आहे. म्हणूनच हा तुषार इतका निवांत आहे का? असा भोळा चेहरा करून इथं हा असा सामोरी उभा...? पुरावे विरोधात असताना असा हा स्वतःला निर्दोष दाखवत आहे. भोळा, अन्यायाने पिचलेला केविलवाणा चेहरा घेऊन खडा आहे...? पळण्याचा प्रयत्न नाही, की बचावाचा पवित्रा नाही... आक्रमकता नाही, की आक्रस्ताळेपणा नाही... थिजलेपण मात्र त्याच्या अंगी आलं आहे...

नक्कीच हा खूपच धूर्त, शातिर, कावेबाज असणार! म्हणूनच त्याला हे जमतंय. याने काही तयारी केली असेल का स्वतःच्या रक्षणासाठी...? स्वतःच्या सुटकेसाठी...?

नक्की काय डाव आहे याचा? अनेको अनंत सवाल घेऊन रेवा स्तब्ध होती.

विक्रांतच्या मस्तकात किंतु काही नव्हतं. रिकामा होता तो. तो पुढे झाला.

**"तुम्हाला आमच्या सोबत यावं लागेल." विक्रांत त्याला एकदम संयमित चेहरा ठेवून म्हणाला.**

तुषार घाबरला... चरकला...

**"माजी काई चूक नाइ इन्स्पेक्टर! मला का? आनि... आनि तुमच्याकडं अटक वॉरन्ट हाय काय मला अटक करायला?" तो बचाव करत अगदी रडवेला ओरडला.**

**"क्रिमिनल प्रोसिजर कोड सेक्शन फोर्टी वन नुसार संशयावरून आम्ही तुम्हाला वॉरन्ट शिवाय अटक करू शकतो. पण तूर्तास फक्त चौकशीसाठी नेतोय. त्यामुळे तुमच्या अटक वॉरन्टची आवश्यकता नाही. चला." विक्रांतने त्याला कायदा पढवला व तो रेवाला सूचना देत म्हणाला,**

**"आणि तुम्ही, यांची जेवढी पादत्राणं असतील, सगळी घेऊन या."**

**"मी?" रेवा अविश्वासाने ओरडलीच.**

**"काम करायचं होतं ना?" विक्रांत तिला तिरकस बोलला.**

रेवा स्वभावाप्रमाणे पुन्हा चिडली. याच्याशी कसं डील करावं हे रेवाला समजतच नव्हतं.

**"तुमचा हेड ऑफ डिपार्टमेंट म्हणून माझी ही ऑर्डर आहे! आणि हेडकॉर्टर्सला फोन करून यांची गाडी नेण्याची व्यवस्था पण करायला सांगा. आणखी काही मिळतंय का बघा. मी घेऊन जातोय यांना." विक्रांतने तिच्या नाराजीकडे साफ दुर्लक्ष केलं होतं.**

आणि विक्रांत रेवाला एकटीलाच ठेवून तुषारला सोबत घेऊन त्याच्या घरून निघून गेला. ती रागीष्ट फक्त पाहत राहिली त्याच्याकडे. तिचा सिनियर तो. ती करू काय शकणार होती?

ही रेवा कामचुकार होती असं नाही. तसं असतं, तर ती सुट्टी असून सुद्धा इमर्जन्सी पाहून कामाला आलीच नसती. ती अत्यंत कर्तव्यदक्ष होती. बरीच परखड होती इतकंच. त्यामुळे ती चिडचिडी आणि फटकळ वाटायची लोकांना, पण तिची

दुसऱ्यांच्या समोर तयार होणारी ही इमेज निव्वळ चुकीची व भ्रमाची होती. आज फक्त मैत्रिणीचं लग्न सोडून यावं लागल्याने तिची चिडचिड होत होती. तशात आलेला नवीन बॉस हा असा तिरसट, पदोपदी टाचणी टोचणी देऊन अपमान करणारा... हे काम एकटीचं नाही हे माहीत असून तिच्यावर मुद्दाम हे काम सोपवून विक्रांत गेला होता याची तिला चीड आली होती.

विक्रांत देखील तिला त्रास द्यायचा म्हणून हे वागत होता असं नाही. त्याला निव्वळ रेवाला हे समजावून द्यायचं होतं, की कर्तव्य पार पाडत असताना वैयक्तिक राग, लोभ, स्वार्थ सगळं बाजूस सारावं लागतं. आपली सुट्टी बुडाली म्हणून तणतण करणं याचा सिव्हिल सर्व्हिसवाल्यांना अधिकार सुद्धा नाही. त्यांना तर अजिबात नाही, ज्यांनी जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी उचलली आहे, तसं वचन घेतलं आहे...

लोकसेवेचं व्रत जर आपण हाती घेतलं आहे, तर मरेपर्यंत माघार घेणे नाही. आणि ते करत असताना अंगी व मनी चैतन्य हवं. काम आहे म्हणून आणि करायचंय म्हणून करायचं असं वागणं हे घेतलेल्या लोकसेवेच्या वचनाशी आणि आपल्या कामाशीही ती प्रतारणा ठरते. विक्रांत या सर्वांची तिला जाणीव करून देत होता, त्याची पद्धत मात्र थोडी... नाही... थोडी नाही! जास्तच वेगळी होती...

**त्याची समजवण्याची पद्धत जरा जाच देणारी होती... पण त्याचा इरादा जाच करण्याचा नव्हता! मात्र हे रेवाला कधी उमजेल का...???**

# ६. घर्षण... संघर्षण...

विक्रांतची गाडी पोलीस हेडकॉर्टर्सला लागली. तो गाडीतून उतरला. एसपी निरंजन बाहेरच होते. सुमितही तेथे त्यांच्यासोबत उभारला होता. कशावर तरी त्यांची चर्चा चालू होती, तोच विक्रांत आल्यावर बोलणं थांबवून ते त्याच्याकडे पाहत उभारले होते. गाडीतील तुषारला हेडकॉर्टर्समध्ये घेण्यास विक्रांतने सुमितला इशारे सांगितलं. त्याप्रमाणे सुमित तुषारला गाडीतून काढून आत घेऊन गेला.

विक्रांत निरंजन यांच्याकडे आला. तोंडातील कँडी सिगारेट संपल्याने त्याने आणखी एक तोंडात दाबली.

**"आरोपी सापडला तर?" निरंजन निःश्वासत बोलला.**

**"मी अजूनही डाऊटफुल आहे." विक्रांत शंका व्यक्त करत विचारी बोलला.**

बऱ्याच गोष्टी त्याला खटकत होत्या. तूर्तास तो कोणाला याबद्दल वाच्यता करणार नव्हता. सध्यातरी काही विशिष्ट पॉईंट आऊट करणार नव्हता.

**"एट लिस्ट काहीतरी प्रगती तरी आहे. आता प्रेस रिलीज करायला काही हरकत नाही." निरंजन 'स्व'दिलासापर बोलले,**

**"मी आमदार मोहितेंकडे जायचं म्हणतोय. येतोयस?" त्यांनी विक्रांतला विचारलं.**

**"हा... मला पण त्यांच्याशी बोलायचंय." विक्रांत लगोलग निघायच्या तयारीतच होता.**

**"हा. पण मूर्खासारखं तिथं काही बोलू नको." निरंजन यांनी त्याला दरडावलं.**

**"त्याची गॅरंटी मी नाही देऊ शकत." विक्रांत स्वभावानुसार तिरकस तिखट बोलला.**

वैताग निरंजन यांच्या मोहऱ्यावर पाण्यात गुलालासारखा तीव्रतेने पसरला. इरिटेटेड एक्सप्रेशनने ते विक्रांतला मागे टाकून आपल्या गाडीकडे चालले.

◆◆◆

संध्याकाळ. विक्रांतची गाडी महादेव मोहिते यांच्या घराबाहेर येऊन स्थिरावली. निरंजन यांची गाडी विक्रांत चालवत आलेला होता. निरंजन बाजूला बसले होते. निरंजन आणि विक्रांत गाडीतून उतरले व महादेव यांच्या घराकडे चालू लागले.

निरंजन व विक्रांत येऊन भल्यामोठ्या लाकडी बंद दाराबाहेर उभारले. निरंजन यांनी बेल वाजवली. काही पळातच त्या वृद्ध नोकराने येऊन दार उघडलं.

दारात पोलीस पाहून टचकन त्या नोकराच्या नेत्रात पाणी उभारलं. एव्हाना त्यालाही घरची दुःखद बातमी कळाली असावी हे उघड होतं...

**"साहेब?" निरंजन यांनी विचारलं.**

**"हायत." ओल्या डोळ्यांनी नोकर बोलला.**

**"एसपी भेटायला आलेत म्हणून सांगा." निरंजन त्याच्या भावविवेगाचा स्वतःवर प्रभाव पडून न घेता पण तरीही सौम्य आवाज ठेवून बोलले.**

खांद्यावरच्या उपरण्याला डोळ्यांतील टिपूस पुसत नोकर मान डोलावून लगोलग आत गेला. दोघे बाहेरच उभारले.

मग काही वेळाने नोकर आला ते परवानगी घेऊनच.

**"आत बुल्युवलंय." नोकर घाईने वर्दी देत बोलला.**

तो आला तसा त्वरे आत गेला. त्याच्या मागून दोघे घरात प्रवेशले.

चिंतीत व दुःखी असलेले महादेव खिन्नसे खाली मान घालून बसले होते. नोकरामागून निरंजन व विक्रांत तेथे लिव्हिंगरूम मध्ये आले.

**"चहापाण्याचं बघा." महादेव यांनी नोकरास करड्या आवाजात हुकूम सोडला.**

**"त्याची गरज नाही." विक्रांतने ऑफर थेट उडवली,**

**"आम्ही चहाला नाही, कामाचं बोलायला आलोय. केस मार्गी लागली, की निवांत चहा घेऊन!" तो स्पष्टच बोलला.**

विक्रांतचा हा उन्माद वाटून महादेव चिडल्यासारखे झाले. त्यांनी फणकाऱ्याने भुवया उडवून नोकरास निघण्याची खूण केली. नोकर त्यांना सोडून आपल्या कामी गेला.

**"बसा." महादेव जरा क्रुद्धच बोलले.**

निरंजन बसत बारीक दिलासा देणारा आवाज ठेवून त्यांना म्हणाले,

**"साहेब, एका आरोपीला इन्स्पेक्टर विक्रांत यांनी पकडलंय."**

दरम्यान विक्रांत देखील निरंजन यांच्या शेजारी बसला होता. आतापर्यंत क्रोधीत नजर शून्यात गाडून बसलेल्या महादेव यांनी त्यांच्याकडे नजर फिरवली.

**"तुमाला खात्र्याय त्योच माज्या मुलीचा खूनीयाय?" करडी नजर ठेवून घोर आवाजात महादेव यांनी विचारलं.**

**"अजून शहानिशा करायची आहे. ती होईलच, पण मला सांगा, तुम्हाला माहित आहे, तुमच्या मुलीचं अफेअर होतं?" विक्रांत निर्विकार बोलला.**

महादेव प्रमाणाबाहेर चिडले... की त्यांचं अंग रागाने कापू लागलं...

**"काय बोलताय समजतंय?" त्यांनी विक्रांतवर जळती नजर फेकत त्याच्यावर क्रोधाग्नी बरसवली.**

निरंजन देखील घाबरून विक्रांतकडे बघू लागले. 'येतानाच ताकीद देऊन हा असं काय बोलतोय...?' असे भाव त्यांच्या मुखावर स्पष्ट!

'महादेव मोहिते या विक्रांतसोबत आपली पण वाट लावेल!' ही मनी भीती धधडू लागलेली ती वेगळीच.

निरंजन धास्तीत होते. विक्रांतवर परंतु काहीच परिमाण पडला नाही. तो करड्या आवाजात गरजला,

**"तुम्ही असं वागून आणि बोलून माझ्या प्रश्नांना टाळू शकत नाही!"**

महादेव तीव्र जळजळीत नजरेने विक्रांतला पाहू लागले. त्यांच्या नजरेतून खरंचीच आग बरसत असती, तर त्यांनी एव्हाना विक्रांतला त्यात जाळून टाकलं असतं.

विक्रांतला काबूत करायलाच हवं असं विचार करून निरंजन यांनी मग मधे उडी घेतली. ते गडगडले,

**"विक्रांत...!"**

विक्रांत काही निरंजन यांच्या थांबवण्याने थांबणारा नव्हता. एकदा का एका गोष्टीची पाठ त्याने घेतली, की तो ती मार्गी लावल्याखेरीज कुणाला आवरणार नव्हता. सत्याच्या शोधाची कास एकदा का त्याने धरली, की सत्याच्या मार्गात कोणीही आला, तरी तो कुणाला जुमानत नसे.

**"नाही सर! हे काहीच सहकार्य करत नाहीत आणि आपल्याकडून अपेक्षा करतात आपण गुन्हेगार शोधून काढावा. असं कसं चालेल?" विक्रांतने ठणकावलं.**

त्याने महादेव यांकडे पाहिलं व त्यांना हमखास नकोसा वाटेल असा अप्रिय प्रश्न केला,

**"तर, मिस्टर मोहिते; तुम्हाला माहित आहे? तुमची मुलगी प्रेग्नेंट होती?" त्याने चाड व भिड न ठेवता थेट सवाल केला.**

महादेवचा सबुरीचा बांध तुटला. त्यांनी ताडकन उठून विक्रांतची कॉलर धरली. विक्रांतला ओढूनच त्यांनी उठवलं. निरंजन पण भीतीने तडक उभारले.

**"माज्या खांदानावर जर का चिखलफेक किली, तर सोडनार नाय मी तुमाला!" महादेव गरजले.**

त्यांच्या या अनपेक्षित बेहिशेबी वागण्याने निरंजन अजूनच घाबरले.

**"सर, सोडा सर." ते आर्जव करत अजिजीने म्हणाले.**

विक्रांतने निरंजनना हाताने थांबवलं व शांत व धीरगंभीरपणे महादेव यांच्या डोळ्यांत तीव्र डोळे घालून तो बोलला...

**"एका ऑन ड्युटी पोलीस ऑफिसरवर हात टाकणं, त्याला जीविताची धमकी देणं हा गुन्हा आहे हे तुम्हाला माहित असेलच?! त्यासाठी शिक्षा काय आहे सांगू?**

**"विसरू नका. तुम्ही लोकप्रतिनिधी असला, तरी मीही एक लोकसेवक आहे. आणि कायदा हा सगळ्यांना समान आहे. इथं कोणी मोठा नाही!" तो कठोर बोलला.**

तरी महादेव यांनी दात खाऊन विक्रांतच्या कॉलरवरील आपल्या मुठी अजूनच आवळल्या. विक्रांत सरळ सरळ त्यांना आव्हान देत होता. आणि तेच महादेव यांना डोक्यात जाणारं, तिडीक आणणारं होतं.

**"काय तुम्हीच तर तुमच्या मुलीला ठार केलं नाही अब्रूला घाबरून?" विक्रांत न डगमगता आक्रीत विचारत होता... त्याचे डोळे आरोप करण्यासाठी बारीक तीक्ष्ण झाले.**

महादेव भान हरपेल इतके कोपले. त्यांनी विक्रांतची कॉलर अजूनच जोरात आवळली.

**"इन्स्पेक्टर!" महादेव अफाट आवेशाने ओरडले.**

विक्रांतवर त्याचा काहीच प्रभाव पडला नाही. तोही त्याच तीव्रतेने महादेव यांच्या डोळ्यांत पाहत स्थिर होता.

**"लिव्ह!" विक्रांत कठोर स्वरात महादेवना हुकुमी आवाजात ठणकावत बोलला.**

आणि नजर करडी करत अजूनच तीक्ष्ण नजरेने महादेव यांच्या रागीट डोळ्यांत तो बघू लागला.

एका क्षणीक बिंदूवर महादेव यांनी त्याची कॉलर झटकून त्याला सोडून दिले. कायद्यापुढील आपली अगतिकता ते पूर्णतः जाणून होते.

हा तीव्र गहन प्रकार चालू असताना त्याचवेळी त्यांची बायको रमा तिथं आली.

रडून ती हालहाल झाल्यागत अर्धमेली दिसत होती. दीनवाणी दिसत होती ती माऊली. अत्यंत कृश् अशी तिची यष्टी झाली होती. आताही ती हमसतच त्या सर्वांसमक्ष आली होती.

**"तू कशाला आलीस भायर?" महादेव तडकून त्यांच्या सुविद्य पत्नीवर कडाडले.**

**"पुलीस आल्यात म्हनून कळलं..." रमाबाई रडवेलं कससं बोलल्या.**

**"ह्या धोंड्याला काय अक्कल नाय!" महादेव यांनी चिडून वैतागत आपल्या त्या वृद्ध नोकराला बोल लावत कोसलं.**

रमा यांना आपल्या पतीचा राग चांगलाच जाणवला, तरी गप्प न राहता त्यांनी याचना करण्यासाठी निरंजन व विक्रांत समोर हात जोडले. आपला रोखलेला हुंदका अनावर होत त्या हमसून अगतिक बोलल्या,

**"काय पन करून माज्या आदुचा खूनी शुदून काडा. मी पाया पडते तुमच्या..." आपसूक त्यांचे हात जोडले गेले होते.**

डोळे उष्ण आसवं अपार गाळत होते. रमा यांच्या या कृत्याने महादेव प्रमाणहीन चिडले.

**"त्यांचं काम ते करतीलच. तू उगाच शोबा करून आब्रू काडू नगो!" ज्वालामुखी फुटावा तसे ते शाब्दिक फुटले.**

विक्रांत महादेव यांच्या त्राग्याला काडीमात्र किंमत न देता उठून रमा यांच्याकडे आला. त्याला रमा यांना याचनामूर्ती उभ्या पाहवत व त्याहून सहन होत नव्हतं. रमामाईंनी जोडलेले हात आपुलकीने त्याने आपल्या हाती घेतले. त्याच्या डोळयांत तेव्हा अपार करुणा होती त्यावेळी. अश्रूंनी न कळत त्याचेही डोळे ओलावले होते...

**"आई; रडू नका..." तो त्या मातेला प्रेम व आपुलकीने सांत्वनापर बोलला.**

विक्रांतच्या या मृदलतेने त्या आईला धीर आला. तिच्या जळणाऱ्या हृदयाला गारवा मिळाला होता.

**"शिक्षा कराल नव्हं त्या राक्षसाला?" त्या अधिकारवाणीत बोलल्या. तरी डोळ्यांतून आसू अजूनही हटले नव्हते.**

**"आई, शिक्षा करणं आमचं काम नाही. आम्ही फक्त आरोपी पकडणार. त्याला शिक्षा करायची का नाही हे कोर्ट ठरवणार. त्याला शिक्षा व्हायची असेल, तर तसे पुरावे पण हवेत. मी वचन देतो. मी पूर्ण प्रयत्न करेन. पण मला त्यासाठी तुमची मदत लागेल." विक्रांत मायेने रमा यांना आश्वासत म्हणाला.**

**"मी... मी करीन." त्या अजिजीने बोलल्या.**

**"खबरदार जर वेडंवाकडं काई ईचाराल तर!" महादेव मधे पडले. आपला मोहरा तोच ठेवून ते ओरडले होते.**

आपण हात उचलू शकत नाही ही हतबलता त्यांच्या ध्यानी आली होती. पण ते तोंड नक्कीच उघडू शकत होते. तोपर्यंत तरी, जोपर्यंत त्या तोंडून अपमानास्पद, बदनामी करणारं काही बाहेर पडणार नव्हतं...

**"मला हवं ते मी विचारणारच! जर ते वावगं वाटलं, तर त्याचं उत्तर न देण्याचा आईंकडे अधिकार आहे!" विक्रांत महादेवला ठणकावत बोलला.**

**"रमा, याच्या सगळ्या प्रश्नांची आणि मुळात व्हाय्यात प्रश्नांची उत्तरं द्याची अजिबात गरज न्हाय!" महादेव आग ओकत बोलले.**

**"तुम्ही त्यांच्या अभिव्यक्तीवर गदा आणू शकत नाही. तोही गुन्हाच ठरेल!" विक्रांतने शांत परंतु धमकावणीत महादेवना सूचना केली.**

आणि त्याची कडक झालेली मुद्रा सौम्य होत रमा यांच्याकडे वळली. महादेवला बघताना त्याची नजर जितकी उष्ण होती, तितकीच रमाकडे पाहिल्यावर शीतल झाली होती.

**"काय बोलायचं आणि काय नाही, ते या ठरवतील!" आपला करडा झालेला स्वर मृदू करत तो बोलला होता,**

**"आई, तुमची मुलगी तुमच्या बरोबर रहात नव्हती. ते का? कळेल?" त्याने रमा यांना विचारलं.**

**"आदुला येक मुलगा आवडायचा..." महादेव यांची भिड न ठेवता रमा यांनी सांगायला सुरुवात केली,**

**"प्रेम हुतं तिचं त्याच्याव म्हनाली. पन आमचा नकार हुता म्हनून ती घर सुडून गेलेली."**

**"त्या मुलाचं नांव?" विक्रांतने विचारलं.**

**"तुषार..." रमा आठवत बोलल्या.**

आणि विक्रांतच्या कपाळावर आठ्यांचं जाळं उभारलं.

**"तुषार नवले?" त्याने शंकीत विचारलं.**

**"हा... व्हय व्हय." रमाबाई पक्कं आठवून गडबडीने बोलल्या.**

आणि अचानक मुलीच्या आठवणीने त्या स्फुंदत रडू लागल्या...

**"तेनंच काय केलंय काय माज्या पुरीला?" त्या रडत विचारत होत्या.**

**"माहीत नाही. पण कळेल लवकर. आई, विश्वास ठेवा. आणि काही काळजी करू नका." विक्रांत समजावणीच्या स्वरात मृदू बोलला.**

महादेव आणि रमा दोघांवर एकच दुःखद प्रसंग गुदरलेला, पण दोघांशी वागायचं कसं हे विक्रांत त्यांच्या स्वभावानुसार ठरवत होता.

एक तीव्र कटाक्ष महादेवकडे फेकून विक्रांतने तडख घर सोडलं.

रागीष्ट महादेव तो जाताच बावरलेल्या व काय करावं सुचत नसलेल्या निरंजन यांच्याकडे चिडून रागे बघत होते.

निरंजन समजावत महादेव यांना म्हणाले,

**"माफ करा सर. थोडा वेडा आहे, पण काम चोख करतो. त्याने पकडलेला आरोपी हा तुषार नवलेच आहे..."**

केस वरील सुधारणा ऐकून देखील महादेववर काहीच फरक पडला नाही. ते धमकावत बोलले,

**"तुमचा ईश्वास हाय म्हनून या मानसाला सहन करतूय! पन जर का दोन दिवसात तुमच्या या मानसाच्यानं काई झालं नाई, तर मला सीबीआय आनल्याशिवाय पर्याय ऱ्हानार्नाय!**

**"विसरु नका. सेंट्रल आणि स्टेट दुनिकडं आमचं सरकाराय. सीबीआयला कोन आडवू शकनार नाय. आनि एक! ह्यो जर आसंच वागत ऱ्हाईला, तर मात्र आमी परत हेची उचलबांगडी केल्याशिवाय ऱ्हानार नाय! समजवा तेला!" महादेव यांनी धमकी दिली.**

धमकीचा निरंजन यांच्यावर काय तो अस्खलित परिणाम झाला.

**"ते... ते मी करतो सर... पण सर... एक परमिशन हवी होती..." ते कचरत म्हणाले.**

धुमसणाऱ्या महादेव मोहितेंच्या भुवया उंचावल्या.

**"नाही म्हणजे, प्रेस कॉन्फरन्स घ्यावी लागेल... जे घडलं ते जाहीर तर करावं लागेल ना... प्रेसवाले कसे असतात तुम्हाला ठाऊक आहे. आपण काही आऊट नाही केलं, तर वाट्टेल ते मनानं रचून सांगत फिरतील..." निरंजन घाबरत पुढे बोलले होते.**

**"त्याची काळजी तुमी करू नगा. आमी सांभाळंय सगळं. आज दिसली तुमाला काई बातमी?" महादेव निरंजन यांची अक्कल काढत बोलले.**

**"बरोबर आहे सर, पण कोणी ना कोणी अडमुठा असतोच. आज ना उद्या भलतंच काही आलं तर..." निरंजन त्यातूनही समजावत बोलले.**

महादेव यांना निरंजन यांचं म्हणणं तेव्हा कुठं पटलं होतं... महादेव थोड्या विचारांती बोलले,

**"घ्या! पन ह्यो इथं जे बडबडलाय ते आनि बाकीचं काई भाईर येता कामा नये. जेवडं केसशी संबंधिताय तेवडंच बोला." त्यांनी त्यातूनही ठणकावलं होतं.**

**"होय..." निरंजन संमत होत उद्गारले.**

मग महादेव यांनी निरंजन यांना अपमानजनक अनादराने भुवया उडवून मानेनेच जाण्यास खुणावले,

**"या!" ते गरजले.**

निरंजन यांनी लागलीच काढता पाय घेतला. खोली रिकामी होताच महादेव यांनी मोक्कार चिडून बायको रमाकडे डोळे फिरवले.

**"अजून का थांबलाय? निघा आत!" ते गरजले.**

बिचाऱ्या रमा तोंडाला पदर लावून आत जाण्यास वळल्या...

महादेव मोहितेंच्या घराबाहेर विक्रांत पायावर पाय टाकून गाडीला टेकून उभारला होता. त्याने कँडी सिगरेट ओठांत धरली. त्याचवेळी प्रचंड चिडलेले एसपी निरंजन घोलप त्याच्या समोर येऊन उभे ठाकले.

**"तुला काही अक्कल? काहीही काय आरोप करत होतास आत?" ते विक्रांतवर डाफरले.**

**"मुद्दामच बोललो." विक्रांत शांत बोलला,**

**"नाहीतर ते सारखे हस्तक्षेप करत बसले असते आपल्या कामात! या बसा. अजून प्रेस बाकी आहे." तो थंडच होता. त्याने असे करण्यामागे त्याचे प्रयोजन सांगितले.**

विक्रांतने थंडपणे ड्रायव्हिंग सीटकडे जाऊन दार उघडले.

निरंजन पॅसेंजर सीटचं दार उघडत ते वैतागी बोलले,

**"अरे पण यामुळे त्यांनी आपल्याला अल्टीमेटम दिला ना! आता ते आपल्या मुसक्या आवळायला बघणार." त्यांनी त्रागा व्यक्त केला.**

**"दॅट्स नन ऑफ माय कन्सर्न्!" विक्रांत गाडीत बसत बेफिकीर बोलला.**

निरंजन हतबलपणे त्रागा करत गाडीत स्थिरावले. त्यांनी दार जोरात ओढून घेतले. विक्रांतवरचा वैताग त्यांनी त्या गाडीच्या दरवाजावर काढला होता.

◆◆◆

सुप्रीटेंडेंट निरंजन घोलप आणि विक्रांत देशमाने समोर व त्यांच्या पुढे काही पत्रकार. पोलीस हेडकॉर्टर्स मधूनच त्यांची ही अल्प कालावधीत आयोजित पत्रकार परिषद चालू होती... त्यांच्यात काही प्रिंट, काही ऑनलाईन तर काही टेलिव्हिजनसाठी व्हिडीओ करणारे भरले होते.

निरंजन प्रेसला अदिती मोहिते मर्डर जेसची ब्रिफ देत होते,

**"मला वाटतं आतापर्यंत आपल्याला बातमी कळाली असेल. तरी ऑफिशियली आपल्याला सांगू इच्छितो, की माननीय आमदार महादेवराव मोहिते यांच्या मुलीचा अदिती मोहिते यांचा खून झाला आहे. वाडी रत्नागिरी येथील घाटात त्यांचा मृतदेह आढळून आला आहे."**

**"आपण ही न्यूज आऊट करायला वेळ लावलात यासाठी काही महत्त्वाचं कारण?" एका पत्रकारकारने कोंडी करण्याचा यत्न केला.**

महादेव मोरे यांनीच सगळ्या प्रेसच्या मुसक्या आवळलेल्या हे तो खुद्द पत्रकार असल्याने जाणून असणारच. परंतु तो याची पोलिसांवर खुन्नस काढत होता.

**"हो. काही ठोस हातात असल्याशिवाय सांगणं योग्य नव्हतं." निरंजन स्पष्ट करत बोलले.**

**"आणि तुम्हाला वाटतं हे डिसमिस्ड् पोलीस ऑफिसर खूनी शोधून काढतील?" दुसऱ्या पत्रकाराने विक्रांतच्या वर्मावर बोट ठेवलं.**

आणि नुसतंच ठेवलं नव्हतं, तर करकचून दाबलं होतं. अजून ओलीच असणारी त्याची ती जखम जास्तच भळभळली होती त्या प्रकाराच्या उल्लेखाने.

**"फॉर युअर काइन्ड् इन्फॉर्मेशन, त्यांनी नुकताच या केस संदर्भात एक आरोपी पकडला आहे. तुषार नवले असं नांव आहे त्याचं." निरंजन रागावर ताबा ठेवत म्हणाले.**

**"मग आता काय हाती लागलं आहे." तिसऱ्या पत्रकाराने कोंडीत पकडण्याच्या इराद्याने पृच्छा केली.**

**"हे तुम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही." विक्रांत तडकला.**

**"तुम्ही असं उद्धट बोलू शकत नाही पत्रकारांशी!" विक्रांतला मानहानी देऊ पहाणारा मघासचा पत्रकार चांगलाच उखडला.**

विक्रांतने प्रश्न केलेल्या पत्रकाराला उत्तर केलं असलं, तरी तो आपल्यावर पर्सनल अटॅक समजून हा पत्रकार स्वतःचा राग जाहीर करत होता.

विक्रांतने आता थेट यालाच प्रतिउत्तर केलं,

**"तुम्ही आमच्याशी उद्धटपणा केलेला चालतो?! लूक, तुम्ही लोक कोर्ट नाही आहात! फर्दर् इन्फर्मेशन तुम्हाला वेळोवेळी डिस्क्लोज केली जाईल." तो ठणकावून बोलला.**

आणि डोके गरम झालेल्या विक्रांतने भरल्या प्रेस मिटिंगला त्यागलं.

कॉन्फरसेन्स रूमच्या बाहेर रेवा त्या दिशेनेच येत होती. सिनियर इन्स्पेक्टर म्हणून लोकल क्राईम ब्रँचमध्ये काम पाहणारी रेवा, आतापर्यंत अदिती मोहिते मर्डर केस संदर्भात बरीच कामे तिने हातावेगळी केली होती.

तुषारचे इंटेरॉगेशन, त्याच्या ऑफिसात जाऊन त्याच्या स्टेटमेंटची शहानिशा, अशी खूपशी महत्त्वाची कामे आटोपून ती कॉन्फरसेन्स रूमकडे आली होती.

तिला विक्रांतने सूचना करण्याची देखील गरज नव्हती. आपल्या बुद्धीने तिने नेमक्या महत्त्वपूर्ण गोष्टी स्वतः मार्गी लावल्या होत्या.

आतून आलेला विक्रांत रेवाला क्रॉस करून निघून गेला. तो खुद्द भावनारहित होता, पण जाणाऱ्या पाठमोऱ्या त्याच्याकडे पाहणारी रेवा सहानुभूतीच्या नजरेने त्याला पाहत होती. आतील गोष्टी नकळत ऐकल्या होत्या तिने व अजूनही अगदी त्याचवेळी प्रेस मिट मधून येणारे आवाज देखील रेवाच्या कानी पडत होते...

**"हे तुम्हा लोकांचं प्रेसशी असं वागणं योग्य नाही. आम्ही..." विक्रांतचा अपमान करू पाहणारा पत्रकार रागीट होत चिडला.**

त्याच्यावर निरंजनही चिडले होते, तरी स्वतःच्या रागावर संयम ठेवून,

**"सॉरी फॉर दॅट. पण तुम्हीही त्याला दुखावलं आहे. असो, सिनियर इन्स्पेक्टर विक्रांत म्हंटल्याप्रमाणे आम्ही आत्ताच काही सांगू शकत नाही. आमच्या सांगण्यावरून शॉर्ट नोटीसवर तुम्ही इथं आलात त्याबद्दल थँक्यू." ते म्हणाले.**

आणि त्यांनी प्रेस कॉन्फरसेन्सची सांगता केली.

**परंतु सवाल असा होता; की विक्रांत आता काय, नेमकं करणार काय होता...???**

# ७. निर्वात पोकळी...

'न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा' (फॉरेन्सिक सायन्स लॅब) यांचेवर सोपलेले काम ते निगुतीने करत होते. डिपार्टमेंट् इंचार्ज सुकृतने तुषार नवलेकडून कलेक्ट केलेल्या 'आय. ओ. एफ. पॉईंट 32' रिव्हॉल्वर मधून टेस्टिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या वॉटर टँकमध्ये एक गोळी फायर केली.

मग त्याने रिव्हॉल्वर मधील रिकामी शेल काढून घेतली आणि रिव्हॉल्वर पुन्हा बंद केली. फायरिंगसाठीही त्याने फक्त एकच कार्ट्रेज लोड केलं होतं, तेही त्याने आता फायर केलं होतं. इतकी काळजी घेऊनही त्याने रिकाम्या रिव्हॉल्वरची सेफ्टी देखील ऑन केली होती. सुरक्षेबाबत तो किती सजग होता हेच त्याचं हे कृत्य दर्शवत होतं.

सुकृतने रिव्हॉल्वर सुरक्षित जागी ठेवली व वॉटर टँक मधील गोळी काढून ती 'कम्पॅरीजन मायक्रोस्कोप' खाली तिचे निरीक्षण तो करू लागला होता.

एका स्क्रिनवर डाव्या बाजूला 'अदितीच्या डोक्यातून काढलेली गोळी' दिसत होती, तर उजव्या बाजूला 'आत्ता फायर केलेली गोळी' दिसत होती. दोन्ही गोळयांवरचे बॅरेलने तयार होणारे पॅटर्न्स एकमेकांशी जुळत नसल्याने ते वेगवेगळे आहेत हे स्पष्ट दिसत होते.

सुकृत चक्रावला. निष्कर्ष कोणालाच अपेक्षित असा नव्हता!!!

**"मिस्टर राठोड!" सदर कार्य चालू असतानाच विक्रांत तिथं हजर झाला होता. ही त्याचीच हाक.**

निराश सुकृतने मागे बघितलं व विक्रांतला बघितल्यावर त्याचा तोंडवळा खुलून आला. आनंद पसरला त्याच्या मुखभर.

**"अरे, इन्स्पेक्टर! या. या." सुकृत हसतमुख बोलला,**

**"आपले पाय अखेर आमच्या लॅबला लागले म्हणायचे." तो म्हणाला.**

विक्रांतचे डोळे स्क्रिनवर रोखले होते,

**"काय चाललंय." त्याने विचारलं.**

**"तुमचंच काम करतोय." सुकृत उत्तरला.**

**"रिजल्ट निगेटिव्ह आहे तर." विक्रांत ओठ दाबत बोलला.**

तो निराश खासच झाला नव्हता. अनपेक्षित वळण आल्याने न थांबता लागलीच काही न काही मार्ग काढणाऱ्यातला होता तो.

**"हो. जसं तुम्ही पाहत आहात, तुषार नवलेची रिव्हॉल्वर पॉईंट थ्रीटू कॅलिबरची असली, तरी अदिती मोहितेचा खून ज्या रिव्हॉल्वरने झाला, ती तुषार नवलेची नाही." सुकृतने अधिक स्पष्टीकरण केलं.**

**"आणि नवलेची टू-व्हीलर? त्याला लागलेली माती..." विक्रांतने विचारलं.**

**"ती क्राईम स्पॉटवरचीच आहे. तिथल्या सॅम्पलशी ती जुळवून बघितली आहे. असं दिसतंय विक्रांत, की केस जास्तच कॉम्प्लिकेट होत चालली आहे." सुकृत वैतागाने भुवया उडवत बोलला. निराशेने त्याचे ओठ आवळले गेले.**

**"अजून तुम्हाला काही माहीतच नाही. डोकं फिरवणारी अजून एक बातमी आहे." भुवया उडवून विक्रांत स्फोटक बोलला.**

**"म्हणजे?" सुकृत आश्चर्य करत उद्गारला.**

**"अदिती मोहिते आणि या तुषार नवलेचं अफेअर होतं. आणि त्याच्यासाठी ती घर सुद्धा सोडून आली होती." विक्रांतने बॉम्ब फोडला.**

सुकृत मठ्ठच झाला.

**"सगळंच चक्रावणारं आहे." तो विस्मयी उच्चारला. मग विचार करून बोलला,**

**"असं तर नसेल? की त्याने खून करण्यासाठी दुसरीच कुठली रिव्हॉल्वर वापरली असेल?" सुकृत अंदाजे तर्क करत बोलला.**

संभाषण सुरू असतानाच रेवा लॅबमध्ये प्रवेशकर्ती झाली. त्यांच्यापाशी येत ती बोलू लागली,

**"असेल, त्याची लायसेन्सची रिव्हॉल्वर असल्याने त्याने दुसरी कुठली तरी रिव्हॉल्वर वापरण्याची शक्यता आहे." तिने आपले विचार प्रकट केले.**

येऊन ती विक्रांतपाशी स्थिरावली,

**"त्याला रीतसर कस्टडीत घेऊ. कसून चौकशी केली, तर बोलायला लागेल." तिने सुचवले.**

**"नाही. सबळ पुरावा असल्याखेरीज तसं करणं मला योग्य वाटत नाही." विक्रांतने त्याचा पक्का विचार, त्याची मोडस ओप्रेंडी बोलून दाखवली.**

हीच त्याची काम करण्याची पद्धत होती. आपल्याकडून कोणा निरपराधीला अपाय होऊ नये, शारीरिकच नव्हे, तर मानसिक त्रास होऊ नये, कुचंबना, होरपळ होऊ नये असा त्याचा प्रयास असायचा आणि म्हणूनच तुषार नवले बाबत कोणताही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याआधी त्याला तसे वागण्यासाठी सबळ पुरावे हवे होते.

काही सुचून विक्रांत सुकृतकडे वळला व त्याला उद्देशून,

**"तुम्ही एक डीएनए टेस्ट करू शकता?" विक्रांतने सुकृतला विचारलं.**

**"ऑफ कोर्स!" सुकृत उत्सुकतेने उत्स्फूर्त म्हणाला.**

त्याला खात्री होती विक्रांतच्या डोक्यात जरूर काही महत्त्वपूर्ण डोकावलं आहे. आणि ते नक्की काही लीड मिळवून देईल हाही सुकृतला विश्वास वाटत होता म्हणूनच त्याची ही उत्फुल्लता.

**"अदितीच्या वोम्बमध्ये जे अर्भक होतं, त्याचा डीएनए आणि या तुषार नवलेचा डीएनए मॅच कराल?" विक्रांतने विचारलं.**

आणि असं करण्यामागे त्याचा असलेला शास्त्रशुद्ध विचार त्याने बोलून दाखवला,

**"जर तसं झालं, तर तुषारने अदितीचा खून करण्यासाठी त्याच्याकडे मोटिव्ह होता हे तरी सिद्ध होईल."**

**"आणि तसं झालं नाही, तर?" रेवाने शंका काढली.**

विक्रांतने कमालीच्या गूढ नजरेने तिच्याकडे पाहिलं.

**"तर, आपला शोध अजून संपला नाही हे लक्षात घ्या!" ठामपणे तो तिला सूचक बोलला.**

◆◆◆

'स्थानिक गुन्हे अन्वेषण' कक्षात सर्व अधिकारी जमले होते. त्यांच्या समोर विक्रांत उभा होता. रेवा अजूनही साडीत होती. कामाच्या व्यापाने तिला अजून साडी बदलून सुटसुटीत कपडे करण्याला उसंतच मिळाली नव्हती. विक्रांतची तिच्यावर दृष्टी पडली.

**"मिस रेवा, जा चेंज करून या. अनकंफर्टेबल वाटत असेल. आपल्याला खूप काम करायचं आहे. कदाचित घरीही जाता येणार नाही." विक्रांत तिला म्हणाला.**

**"येस सर..." ती म्हणाली.**

पण ती जागची हलली नव्हती.

**"गो." विक्रांतने आग्रह केला.**

**"मिट झाली की जाईन." रेवा म्हणाली.**

**"ओके." तो म्हणाला.**

मग त्याने मूळ विषयाला छेडले,

**"लायसेन्सवरचे फिंगरप्रिंट्स आणि तुषारचे फिंगरप्रिंट्स सेम आहेत?" विक्रांत प्रमोदला विचारत होता.**

**"येस सर." प्रमोदने उत्तर दिलं.**

**"म्हणजे तोच कल्प्रिट आहे." सुमितने विनाविलंब निष्कर्ष काढला.**

विक्रांतने मात्र त्याला टोकलं,

**"एकदम कंक्लूजनवर जम्प करू नका. ते कार्ड कोणीही तिथं प्लांट करू शकतं. त्यामुळे तो एवढा मजबूत पुरावा नाही." विक्रांतने त्याला समज दिली,**

**"अदितीची डेडबॉडी ज्या गाडीत सापडली, त्यातील फिंगरप्रिंट्स आणि अदितीच्या डेडबॉडीवर सापडलेल्या फिंगरप्रिंट्सशी तुषारचे फिंगरप्रिंट्स जुळले?" तो पुन्हा प्रमोदकडे वळला होता.**

**"नाही!" प्रमोद खेद व्यक्त करत बोलला.**

विक्रांत मग सनाकडे वळला,

**"मग गाडीत सापडलेले डीएनए ट्रेसेस देखील तुषारच्या डीएनएशी साधर्म्य ठेवत नसतील?!" त्याने विचारलं.**

**"नाही..." सनाने देखील नकार घंटा दिली.**

**"आधीच्या दोन केसेसमध्ये तुषारची काही इन्वॉल्व्हमेंट? त्यातले फिंगरप्रिंट्स प्रोफाईल आणि डीएनए प्रोफाईल तुषारशी जुळवून पाहिले?" विक्रांतचा मोर्चा सनाकडेच होता.**

सनाने कार्यपूर्ती झाली हे दर्शवण्यासाठी होकारार्थी मान हलवली खरी, परंतु रिजल्ट;

**"निगेटिव्ह!" हाच सांगितला.**

विक्रांतने लगेच सुमितकडे रुख केला.

**"सी? त्यामुळे आपल्याला वॉटर टाईट एव्हीडेन्स हवाय." तो त्याला समजावत बोलला.**

**"येस सर..." सुमित समजुतीने उद्गारला.**

**"कुठल्या चौकीतून किंवा पोलीस स्टेशन मधून काही बातमी, की कोणी संदिग्ध वगैरे दिसलाय म्हणून?" विक्रांतने कंट्रोल रूम पाहणाऱ्या जोसेफला प्रश्न केला.**

**"नाही सर. पण सर्वजण अलर्ट आहेत." जोसेफने तत्परता दाखवली.**

**"गुड! जरा क्राईम सिनवर सापडलेलं एम्टी कार्ट्रेज पुन्हा दाखवाल मला?" विक्रांतने इच्छा व्यक्त केली.**

सोयीसाठी तिथंच टेबलवर मांडून ठेवलेल्या एव्हडेन्स व आतापर्यंतच्या रिजल्ट रिपोर्ट्स मधून तिथं जवळच असलेल्या अंकिताने रिव्हॉल्वरच्या कार्ट्रेजची 'एव्हीडेन्स' लिहिलेली पॉलिथिन विक्रांत समोर धरली.

**"सर." अंकिता उच्चारली.**

विक्रांतने ती घेतली. कार्ट्रेज पॉलिथिन मधून काढून तो ती रिकामी कार्ट्रेज नीट पाहू लागला.

**"पॉईंट थर्टी टू, स्मिथ अँड व्हेसन. कानपुर फॅक्टरी." त्याने गोळीच्या शेलवरील माहिती वाचली,**

**"ही कार्ट्रेज इंडियन ऑर्डीनंन्समध्ये बनवलेली आहे." कार्ट्रेज शेलवर नजर ठेवूनच तो म्हणाला.**

मग तो सर्वांना उद्देशून बोलू लागला,

**"फॅक्टरीत कॉन्टॅक्ट करून कोल्हापूरात 'पॉईंट थर्टी टू स्मिथ अँड व्हेसन' ही कार्ट्रेजेस् कोण कोण खरेदी करतं ते बघा. अँड वन मोअर थिंग्! ज्या अर्थी इंडियन ऑर्डीनंन्सची कार्ट्रेज खूनीने अदितीचा खून करायला वापरलीये, तर मोस्ट प्रोबॅब्ली हे शक्य आहे, की रिव्हॉल्वर सुद्धा इंडियन ऑर्डीनंन्सचीच असणार!"**

विक्रांतच्या मस्तकाची चक्रं गरगर फिरत होती. विक्रांतची नजर त्याच वेगाने अंकिताकडे फिरली,

**"मिस अंकिता, एक काम करा; मला माहीत आहे, तुमचं हे काम नाही, पण ऑर्डीनंन्सच्या सगळ्या फॅक्टरींत कोल्हापूरात आजपर्यंत बाय झालेल्या सगळ्या पॉईंट थ्री टूच्या रिव्हॉल्वर्सच्या व्हेरिएंट्सची माहिती घ्या. त्यांचे इथले खरेदीदार कोण आहेत बघा. मला खात्री आहे, जास्त नसणार!"**

**"ओके सर." अंकिता म्हणाली.**

मग विक्रांत सनाकडे फिरला,

**"आणि मिस सना, मी राठोडना एक काम सांगितलं आहे. तुम्ही जरा त्यांना हेल्प करा. कामाला थोडी गती येईल." त्याने तीस सूचना दिली.**

**"हो सर." सनाने ती मस्तकी धरली.**

**"सो, द मिट इज डिसमिस्ड्." विक्रांत सर्वांना उद्देशून बोलला आणि त्याने रेवाकडे आपली नजर केली,**

**"मिस रेवा. तुम्ही जाऊ शकता." तो तिला म्हणाला.**

**"थँक्यु सर." रेवाने कृतज्ञता व्यक्त केली.**

'हा पथ्थर दिसतो तसा इतकाही टणक नाही' हे रेवाला जाणवलं.

पण यावर विचार करण्याचा तिला आत्ता वेळ नव्हता. रेवा लगोलग साडी सांभाळत घरी जाण्यास निघाली.

**"चला, कामाला लागा! आणि तत्पूर्वी काही खाणार असाल, तर खाऊन घ्या." विक्रांत इतरांना बोलला.**

मग सगळे त्यांना त्यांना सांगितलेल्या कामाला गेले. ज्यांना बाहेर जाणं अपेक्षित होतं ते बाहेर निघाले. तर ज्यांचं डेस्कवरून काम होतं ते आपापल्या डेस्कला पोहोचले.

◆◆◆

मध्यरात्रीचा प्रहर बळावला होता. चंद्राचं चांदणं गडद झालं होतं. पोलीस मुख्यालयाच्या झगमगत्या प्रकाशात त्यांची एवढी तीव्रता किंतु भासत नव्हती. एक चंद्र आणि काही ठळक चांदण्या चमकताना दिसत होत्या. तरीही...

निसर्ग निर्मित तेज आणि मानव निर्मित उजेड यांत जणू स्पर्धा चालू होती, आणि... त्या किलकिल्या चांदण प्रकाशावर मानवनिर्मित कृत्रिम झगमगटाने मात केली होती.

त्या भेसूर प्रकाशांत विक्रांत पोलीस मुख्य कार्यालयाच्या पायऱ्यांवर एकटाच उभा होता. रात्रीचा काळोख तिथल्या प्रकाशझोतांनी इतका प्रबळ नसला, तरी ती शेवटी रात्रच. अशा रात्री देखील हा विक्रांत आपल्या डोळयांना काळा चष्मा लावूनच होता.

त्याच्या तोंडी असलेली एक लंबगोल नळी झळकत होती. आश्चर्य हे होतं, की चक्क 'धूर' येत होता त्यातून. काय विक्रांतला सदरहू प्रकरणाने इतकं तणावात टाकलं होतं...?

तिथं वर्दळ अशी कसलीच नव्हती. पोलीस डिपार्टमेंटने जणू या एकाच केसला वाहून घेतलं होतं. ते जागं होतं खरं; परंतु जी काही लगबग, चंचलता होती ती आत! बाहेरून ते मुख्यालय निश्चितच शांत भासत होतं.

जी काही गंभीरता होती, ती त्या कार्यायलाच्या खाली उभ्या विक्रांतमध्ये होती...

रेवा एव्हना घराहून परतली होती. ती तिचा पोलिसी गणवेश परिधान करून आली होती. विक्रांतचे तिकडे काही लक्ष नव्हते.

तिला आपसूक मुख्य दाराशी उभा तो नजरेस आला. गाडी लावून ती विचारात बुडालेल्या विक्रांतकडे आली.

**"मला वाटलं होतं, आपण स्मोक करत नाही..." रेवा त्याला बोलली.**

बोलायला सुरुवात करायला विषय म्हणून तिने विषय काढला. वास्तविक तिला शंकाही आली होती, की एक सेकंदही कँडी सिगरेट तोंडाची न काढणारा हा खरीखुरी सिगरेट का ओढतोय...?

तिच्या आवाजाने विक्रांत विचारांच्या खोल गर्तेतून बाहेर येत तिच्याकडे वळला.

**"आह! मिस रेवा." तो हसू चेहऱ्यावर घेऊन उद्गारला आणि निर्मळ हसला,**

**"हर्बल आहे." तो म्हणाला,**

**"हार्मलेस. कधी कधी खूपच स्ट्रेस्ड् वाटलं की..."**

मतितार्थ पोहोचला असल्याने त्याने वाक्य पूर्ण केलं नाही. त्याने कठड्यावर सिगरेट विझवली,

**"बाकी? जेवण झालं?" त्याने हसत तिला विचारलं.**

रेवा मानेनेच हो म्हणाली. विक्रांतला असं नीट आणि मुखत्वे आपुलकीने बोलताना पाहून ती देखील रिलॅक्स झाली होती.

**"हो. आपलं?" गोड हसून तिने विचारलं.**

**"जेवण जाईल असं वाटत नाही..." तो गंभीर बोलला.**

त्याने सवयीप्रमाणे स्वतःला या प्रकरणात आकंठ बुडवून घेतलं होतं. पर्स्नलाईज् केलं होतं...

काम आणि तो असं वेगळं कधी त्याला ठेवता आलंच नव्हतं. आताही तेच झालं होतं त्याच्यासोबत. त्याचा हाच स्वभाव तर त्याला नडला होता, त्याचं डिसमिसल... त्यासाठी त्याचा कामाप्रती असलेला हाच अतिहळवेपणाचा स्वभाव कारणीभूत ठरला होता.

या विक्रांत देशमानेची गत पार्श्वभूमी पहायची म्हंटलं, तर तशी विदारक पण आहे आणि हेलवणारी पण आहे काहीशी...

ती संक्षेपमध्ये सांगायचीच म्हंटली, तर ती अशी...

वास्तविक विक्रांत मुंबई क्राईम ब्रँचमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून काम करत असताना वरिष्ठांचा आदेश न पाळता याने स्वतःच्या जबाबदारीवर एका गुन्हेगार टोळीवर धाड टाकण्यासाठी आपली टीम प्रसारित केली होती. आणि त्यातच त्याचे बरेच सहकारी मारले गेले होते.

साहजिक वरिष्ठांचे आदेश न पाळल्याने व घेतलेल्या स्वनिर्णयाने पोलीस खात्याचे काही अधिकारी मृत झालेने सारा दोष याच्यावर आला आणि अखेर त्याला निलंबित केले गेले होते. तेव्हापासून त्याला आयसोम्नियाचा आजार जडला होता. तेव्हापासून निद्रादेवी याच्यावर कसली ती प्रसन्न झाली नव्हती.

दिवसरात्र उघड्या डोळ्यांनी अविश्रांत फिरणाऱ्या या विक्रांत नामी पिशाच्च्याच्या डोळयांखाली म्हणूनच काळी वर्तुळे तयार झाली होती. आपले असे काळे झालेले व तारवटलेले डोळे कोणास दिसू नयेत म्हणून ते लपवण्यासाठीच त्याने या काळया चष्म्यांना उपयोजित केलं होतं.

तोंडातील सततच्या त्या कँडी सिगरेटची देखील अशीच काहीशी विलक्षण कहाणी. सिगरेटची बरीच वर्षांपासूनची असलेली सवय सोडायची म्हणून कँडी सिगरेट त्याच्या ओठी कायमची चिकटलेली.

परंतु इतकंच तिचं परिमार्जन नव्हतं, तर कँडी चघळण्याचं आणखी एक विशेष कारण होतं, ते म्हणजे झोप न आल्याने शरीराला येणारा थकवा दूर करण्यासाठी तो अशी कँडी वारंवार खात असे. ज्यायोगे शरीराला शुगरचा अतिरिक्त पुरवठा होऊन तो नेहमी अलर्ट राहील.

विक्रांत कधीच आपल्या कँडी शिवाय दिसणाचा नाही. शुगरच्या एक्सेसिव्ह इंटेक म्हणजे अतिसेवनाने आपल्यावर कधीतरी त्याचा अंमल होऊन कधीतरी आपल्याला झोप येईल असाही विक्रांतचा प्रयत्न असायचा ही कँडी सिगरेट वारंवार चघळण्यामागे...

तरीही अगदीच तणावात गेलाच, तर तो हर्बल सिगरेट वापरायचा, जी शरीराला इतकी अपाय करणारी नव्हती. खऱ्या सिगरेटची नशा ती देत नसली, तरी पण त्याने त्याचे समाधान मात्र होत असे. असो;

काही काळ त्याचा काहीतरी विचार झाला...

**"लेट्स गो!" तो रेवाला म्हणाला.**

अचानक त्याच्या अशा बोलण्याने रेवा गंभीर झाली.

**"कुठे सर?" तिने विचारलं.**

**"क्राईम सिन!" तो झटकन उद्गारला.**

त्याच्या मनात नक्की काही तरी चालू होतं हे रेवाला देखील जाणवलं.

**"आत्ता?" तरी ती अशी उद्गारली.**

'काहीतरी असल्याशिवाय विक्रांत असा नाही तातडी करायचा, पण तिथं जाण्याची ही वेळ म्हणजे...' तिचा विचार झाला.

**"येस!" तो शीघ्रतेने बोलला.**

विक्रांतने त्याच त्वरेने बाजूच्याच डस्टबिनमध्ये विझवलेली सिगरेट टाकली आणि त्याला डिपार्टमेंट्कडून मिळालेल्या गाडीकडे तो धावला. रेवा त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्या मागून गेली. माणुसकीची झाक हळूहळू तिला याच्यात दिसू लागली होती. आणि त्याचाच हा परिणाम होता, की ती त्याच्या अशा विचित्र वागण्यावर आता रागवत नव्हती...

**परंतु विक्रांत या वेळेस डोंगरावर जाण्याचा ध्यास घेऊन का होता...???**

# ८. पूर्वतयारी आराखडा...

विक्रांतची गाडी येऊन, दरीला तोंड करून उभी राहिली.

निर्जन पठार...

इकडे कोणी तसेही येणे करत नसे आणि आता तर इथं कुणाचा तरी खून घडलेला म्हणून तर अजिबातच त्याज्य झालेली ही जागा. ज्योतिबा डोंगर रात्री तसा शांतच. देशभर प्रसिद्ध हे देवस्थान रात्रीच्यावेळी इतकं निवांत असतं, की ते कोणास ठाऊक आहे का असा प्रश्न पडावा.

इतकं शांत, की कोणीही या ठिकाणी येऊन मंत्रमुग्ध व्हावं... आपलं भान हरपून जावं. इतकी ही अवीट शांतता आणि त्यासोबत तो दरीतून वर वाहत येणारा गोड थंड वारा... गार असला, तरी तो बोचरा नक्कीच नव्हता...

ही पठाराची जागाही तशी देवस्थान पासून बरीच खाली. त्यात हे पठार आणि देवस्थानकडे जाणारा रस्ता यामधील जंगल झाडांनी पलिकडचे बरेच आवाज रोखलेले. म्हणून सामसूम देखील. अशाने जी काही थोडकी हालचाल डोंगराच्या मस्तकी चालली असेल तिचा मागमूस देखील इथं येण्याची सुतराम शक्यता नव्हती.

काम नसते तर या सुकून देणाऱ्या ठिकाणी विक्रांत त्याची आवडीची साठ-सत्तर सालची जुनी हिंदी अगर मराठी गाणी गाडीच्या स्पीकर्सवर वाजवत गाडीच्या टपावर निवांत पडून राहिला असता.

पण आत्ता नाही. आत्ता कामाची वेळ होती. त्यासाठीच तो इथं आला होता...!!!

विक्रांतने गाडीत असताना तोंडात टाकलेली कँडी संपल्याने नवी कँडी सिगारेट ओठांत धरली. त्याच्या बाजूस रेवा बसलेली होती. गाडीत त्यांच्यामध्ये ते मांजराचे पिल्लू त्याच्या बास्केटमध्ये तसेच होते. रेवाने इथंवरच्या प्रवासात त्याला खायला घालून चांगलंच गोलमटोल केलं होतं. तेही तृप्त होऊन निद्रेच्या कुशीत जाईल असं पेंगत होतं. त्याच्या डोक्याचं ओझं त्यामुळे त्यालाच पेलवत नव्हतं. आणि ते पुन्हा पुन्हा लुढकत जागं होत होतं. पाहताना ते मोहक वाटत असलं, तरी मग काही वेळाने रेवाला त्याची दया आली. शेवटी रेवा प्रेमाने त्या पिल्लाला थोपटून झोपवू लागली...

हे पिल्लू विक्रांतकडे कसं आलं, त्याचीही एक रोचक घटना आहे. एकटेपणा विक्रांतला नको होता, आणि माणसंही नको होती. मग एकटेपणा घालवण्याला उपाय म्हणून हे मांजराचं पिल्लू.

त्या पिल्लाला विक्रांतने एका वसुलीसाठी गेलं असता सुमसान ठिकाणी रणरणत्या उन्हात रस्त्याकडेला पाहिलं होतं. एक हिंस्र कुत्रं पिल्लाच्या जीवामागे लागलेलं पाहून विक्रांतने त्या पिल्लाची मदत केली होती. त्याने त्या पिल्लाच्या आईचा शोध घेतलाही, पण त्याला ती मांजरी मृत आढळली. तिचा देह फाटला होता. हे त्या कुत्र्याचंच काम, जे या पिल्लाच्या मागे लागलं होतं आणि आपल्याकडून ताडन झाल्यावर पांगलं होतं हे विक्रांत समजून गेला. विक्रांतने त्या कुत्र्याला घाबरवून पळवून लावलं होतं. त्याने त्याला मारलं नव्हतं हे विशेष. मानवतेचा विचार त्याच्या खोलवर रुजलेला, तो कसे त्याचे डोके फोडेल...

प्राण्यांनाही आपल्याकडून त्रास होऊ नये याचीही तो काळजी घेत असे.

शोषणकर्ता व अन्याय करणारे ते अन्याय करू नयेत इतपत त्यांच्यावर वचक रहावा म्हणून विक्रांत प्रतिकार करे, परंतु आपल्याकडून त्यांच्या जीविताची हानी होऊ नये याची काळजी त्याच्याकरवी घेतली जात असे.

म्हणून त्याने त्या कुत्र्यास घाबरवून सोडून दिले होते. त्यासाठी त्यांची एक गोळी खर्ची पडली होती. त्याने रस्ताच्या डांबरावर त्या कुत्र्याच्या पायात गोळी चालवून त्याला पळवून लावले होते.

मात्र या घटनेनंतर विक्रांतने त्या पिल्लाला जवळच ठेवलं. त्याचा एकटेपणा कमी व्हायला हे पिल्लू आशेचा किरण बनलं होतं त्या दिवसापासून. विक्रांत जाईल तिथं याला सोबत नेत असे, सोबत ठेवत असेल. अशी ही दोघांची गट्टी जमण्याची पूर्वकहाणी, जी महिन्याभरापूर्वीचीही नव्हती.  असो;

**"सर, एक सांगायचं होतं. एक ऑड गोष्ट समोर आली आहे." रेवा इतका वेळ अवसर न मिळाल्याने सांगू न शकली गोष्ट सांगण्याच्या इराद्याने अधीर बोलली.**

विक्रांतने तिच्याकडे 'अनपेक्षित काय ऐकायला मिळणार आता?' अशा भावाने पाहिले.

**"अदितीचे कॉल रेकॉर्ड चेक केले. तिच्या मोबाईल लॉग मधील लास्ट कॉल्स आणि रेकॉर्ड्स मधील लास्ट कॉल्स यांत विसंगती आहे." रेवाने माहिती दिली.**

इतका वेळ ती स्वतःहून या गोष्टींच्या मागावर होती. तपास करत होती.

**"आणि तुम्ही हे आत्ता बघितलंत?" विक्रांत तरी समाधानी नव्हता.**

रेवाला त्याच्याकडून शाबासकी तर मिळाली नाहीच, उलट तो जरा नाराज वाटला.

**"सॉरी सर, पण सकाळी आपल्यासोबत होते त्यामुळे... पण जसा वेळ मिळाला, आणि मी लगेच चेक केलं." रेवाने आपली बाजू मांडली.**

**"बोला." विक्रांत समजून घेत तिला पुढे बोलण्यास सुचवत उद्गारला.**

**"कॉल डिटेल्समध्ये लास्टचा जो कॉल आहे, तो मोबाईल लॉगमध्ये मिसिंग आहे." रेवाने द्यावयाची माहिती दिली.**

**"आणि तो कोणाचा आहे ते चेक केलं?" विक्रांतची विचारणा.**

**"जो अगदीच लास्टचा होता म्हणजे जो डिलीट केला होता, तो अदितीच्या रूममेटचा होता. दीक्षा नांव तिचं. आणि सेकेंड लास्ट होता, तो अमिता नांवाच्या मुलीचा आहे. स्ट्रेंज गोष्ट ही आहे, की ही अमिता तर वर्षभरापूर्वीच ऑस्ट्रेलियाला निघून गेलीये." रेवाने गोंधळ वाढवणारी माहिती पुरवली.**

विक्रांतच्या भाळी आठ्या पसरल्या.

**"कॉल डिटेल्स बघू." तो रेवाला म्हणाला.**

रेवाने तिच्या मोबाईलमध्ये असलेली अदितीच्या कॉल डिटेल्सची पीडीएफ फाईल विक्रांतला दाखवली. ती काळजीपूर्वक बघत...

**"हा नंबर तर इंडियन रिजनचा आहे." विक्रांत बोलला.**

**"तेच सर." रेवा उद्गारली.**

**"तुम्ही अमिता कुठं आहे याची खात्री केलीत?" विक्रांतने तीस प्रश्न केला.**

**"ती जी ऑस्ट्रेलियाला गेलीये, ती परत आलेलीच नाही. अगदी अलीकडील सर्व फ्लाईट डिटेल्स देखील चेक केल्या आहेत मी." रेवा म्हणाली.**

**"आणि दीक्षाचं काय?" विक्रांतची पृच्छा.**

**"तिच्याशीही बोलणं झालंय. तिने सांगितलं, की अदिती रूमला कधी परतणार आहे हे विचारण्यासाठी तिने कॉल केला होता. तेव्हा अदितीने तिला वेळ लागणार असल्याचं कळवलं होतं. कारण ती तिच्या बॉयफ्रेंड सोबत होती!" रेवाचा गौप्यस्फोट!**

हे कानी पडताच विक्रांतने चमकून रेवाकडे पाहिलं!

**"तिने अदितीच्या बॉयफ्रेंडचं नांव सांगितलं?" त्याने अधीर विचारलं.**

**"नाही. तिने नांव मेंशन केलं नव्हतं म्हणाली." रेवा नाराज बोलली.**

**"मित्च! दीक्षा अदितीची मैत्रीण आणि रूममेट सुद्धा आहे म्हंटल्यावर एनिवे तिला अदितीच्या बॉयफ्रेंडचं नांव माहीत हवंच ना?" विक्रांतचा साधा विचार.**

हा तसा कॉमनसेन्सच होता... पण...!

**"हो मी तसं विचारलं. पण अदितीने कधीच बॉयफ्रेंडचं नांव सांगितलं नसल्याचं दीक्षा म्हणाली. तो अदितीला भेटायला कधी रूमवरही आला नव्हता असं तिनं सांगितलं." रेवा बोलली.**

तिच्या या माहितीने विक्रांतचा मनसुबा उधळला. अदितीच्या प्रियकराचं नांव दीक्षा कडून समजलं असतं, तर ते योग्य मार्गावर आहेत का अजून भरकटत आहेत याची अधुरी रेषा स्पष्ट झाली असती. कच्च्या धाग्यावर जे ते चालत होते, त्याची बळकटी झाली असती असा विक्रांतचा विचार होता...

**"अदितीच्या रूमचा सर्च घेतला?" त्याने विचारलं.**

**"पर्सनली मी नाही, पण मी सुमितला सांगितलं होतं. रेश्मा कांबळे या आपल्या एका ऑफिसर करवी त्याने अदितीची रूम सर्च करवली. तिला काहीच संदिग्ध सापडलं नाही. बॉयफ्रेंड बद्दल तर काहीच नाही. रूममेट सोबत असल्याने तिने तसं काही रूममध्ये ठेवलं नसण्याची शक्यता आहे, ज्याने तिचं रिलेशन उघड होईल... पण असं का? ते समजत नाहीये..." रेवा आपली विचलता दर्शवत बोलली.**

**"याचा अर्थ अदितीचा बॉयफ्रेंडच तिचा खूनी असू शकतो. फोनवर अदितीकडून दीक्षाला त्यावेळी त्याचं अस्तित्व मेंशन झाल्याने त्याने दीक्षाचा नंबर डिलीट केला. जेणेकरून आपण तिच्यापर्यंत पोहोचू नये आणि अदिती शेवटी त्याच्यासोबत होती हे आपल्याला कळू नये. दुसरी गोष्ट, अमिताचं सिम कार्ड देखील त्यानेच युज केलं असणार हे उघडच आहे." विक्रांतने डोकं लावलं.**

रेवालाही त्याचं म्हणणं पटलं. तीही त्याच्या तर्कनौकेत सवार झाली...

"दाट शक्यता आहे सर, कारण अमिताच्या नंबर वरून अदितीला फक्त तिच्या मर्डर् दिवशीच कॉल झाले आहेत." रेवा बोलली.

"या अमितामध्ये आणि अदितीमध्ये कोणी कॉमन आहे? काही कनेक्शन त्यांच्यात? पाहिलं का?" विक्रांत अदितीला विचारत होता.

"नाही. इव्हन नमिताला अदिती कोण तेही माहीत नाही." रेवा निस्तेज बोलली.

"ते सिम कोणाच्या नावे आहे पाहिलंत?" विक्रांतचा प्रश्न.

"अमिताच्याच!" अदितीचं चक्री आणणारं उत्तर.

"हे कसं शक्य आहे? अमिताच्याच फोनवरून अमितालाच कॉल?" विक्रांतला अजबच वाटलं.

"मी अमिताला विचारलं त्याबद्दल. तिच्याकडून कळलं, की तिने तिच्या नावावर ते सिम घेऊन आपल्या वडिलांना वापरायला दिलेलं. आठवड्यापूर्वी तिचे वडील वारले, हे सांगायलाच तिच्या वडिलांच्या मित्राकडून तिला कॉल गेलेला त्या मोबाईल नंबर वरून." रेवाने विक्रांतचा गोंधळ सामान्य केला व पुढे सांगू लागली,

"तिने दिलेल्या सगळ्या माहितीची शहानिशा मी केलीये. तिच्या नावे असलेल्या रजिस्टर्ड नंबरचे, म्हणजे ज्यावर अदितीला तिच्या मृत्यूपूर्वी कॉल झालेत, त्या नंबरचे कॉल डिटेल्स पाहिले, तर त्या नंबरवरून अमिताला ऑस्ट्रेलियात जो कॉल गेला, त्यानंतर आठवडाभर त्या नंबर वरून कुणालाच कॉल्स झाले नाहीत. शेवटी जे झाले, ते अदितीलाच!

**"अमिताला अजिबातच भारतात येणं शक्य नव्हतं. म्हणून अमिताच्या वडिलांच्या मित्राने त्यांचे सगळे अंत्यसंस्कार केले. त्यांच्या वस्तूंचं काय करायचं विचारलं, तर अमिताने त्या विकायला सांगितल्या होत्या." रेवाने तिचा पुढील तपास विदित केला.**

**"म्हणजे मोबाईलही..." विक्रांत विचारी उद्गारला.**

**"होय. अमिताला मी तिच्या वडिलांच्या मित्राकडे चौकशी करायला सांगितली. आणि स्वतः मीही त्यांच्याकडे चौकशी केली दोन्ही वेळी त्यांच्याकडून हेच कळलं, की मोबाईल विकला गेला होता. आणि सिम त्यातच होतं." रेवा बोलली.**

**"म्हणजे ते सिम आणि मोबाईल खुनीनेच त्या दुकानातून विकत घेतलं असणार हे स्पष्टच होतं!" विक्रांत संगती लावत बोलला,**

**"त्या दुकानाचं नांव?" विक्रांत उत्सुकला.**

**"साई मोबाईल्स. त्या दुकानात देखील चौकशी केली, अमिताच्या वडिलांचा मोबाईल अगर तिचं सिम कार्ड किंवा दोन्ही कोणी त्याच्याकडून विकत घेतलं होतं का; पण दुकानदार काही आठवत नसल्याचे सांगतो." तिने सगळंच उडवून लावलं.**

विक्रांतचा हा पर्याय सुद्धा वाया गेला होता...

**"त्याला आठवत असेल, नसेल. पोलिसांचं प्रकरण म्हणून तो तोंड उघडायचा नाही कदाचित. वि कान्ट फोर्स एनीबडी टू टेल द ट्रूथ..." विक्रांत कायदा आठवत बोलला.**

**"बहुदा तसंही असेल. पण त्यानं काही रेकॉर्ड्स ठेवलं नाही का हे मी त्याला विचारलं, तर तो म्हणाला सेकंडहॅन्ड मोबाईलच्या विक्रीची बिलं तो बनवत नाही. ज्याने कोणी ते खरेदी केला असेल तो ओळखीचा असण्याची सुद्धा शक्यता नाही म्हणाला तो. कारण तसं असतं, तर त्याच्या लक्षात राहिलं असतं." अदितीने माहिती दिली.**

**"म्हणजे अमिता आणि हा खूनी यांच्यात काही संबंध असण्याची शक्यता देखील नाही!" विक्रांत विचार करत बोलला.**

**"हो सर. शिवाय अदितीच्या मोबाईलमध्ये देखील तिच्या वडिलांचा सोडला, तर दुसऱ्या कुठल्याचं पुरुषाचा फोटो नाही. तिचे सगळे सोशल मीडिया अकाऊंट्सही क्लिन आहेत. रादर् काही वर्षांपासून तिथं एक्टिव्हच नाही. त्यामुळे फिड्स पण जेमतेमच आहेत." आणि काही आठवून ती पुढे म्हणाली,**

**"अनादर् स्ट्रेंज थिंग इज, तुषारच्या कोणत्याही चपलेचे प्रिंट्स इथं सापडलेल्या फुटप्रिंट्सशी साधर्म्य दाखवत नाहीत." अदितीचा आणखी एक गौप्यस्फोट!**

काही कळायला मार्ग नव्हता. विक्रांतने आपलं डोकं हेडरेस्टवर जोरात आदळलं.

**"तुषारचे डीएनए अदितीच्या पोटातील अर्भकाशी जुळले, तर काही होप्स आहेत..." नाराज चेहऱ्यानेच अदिती आशावादी बोलली.**

विक्रांतने डोळे मिटले. काहीकाळ तो तसाच बसून राहिला. त्याचा काही विचार चालू होता.

मग तो गाडीतून उतरता झाला. त्याला क्राईम सिनकडे जाताना बघून रेवाही त्याच्या मागून खाली उतरली.

गुन्हा घडला ती जागा रिकामी झाली असली, तरी अजूनही कॉशन लाईन होती. चारी बाजूंनी मोठ्या फ्लड लाईट्स त्या ठिकाणी लावल्या होत्या. त्यांचा फोकस;

**गुन्हा घडला ते ठिकाण!**

कमरेवर हात ठेवून विक्रांत शांतपणे ती जागा पाहत होता. त्याच्या तोंडात कँडी सिगारेट होती. डोळ्यांना काळा चष्मा. विचारी ताणलेला चेहरा घेऊन रेवा देखील त्याच्या बाजूला येऊन उभी राहिली.

**"ही स्पॉट्स सोडलीत, तर दुसरा कोणताच सोर्स ऑफ लाईट इथं नाही. नो वंडर की मर्डररने ही जागा निवडली." लाईट्सना उद्देशून विक्रांत म्हणाला.**

**"ऑफ कोर्स सर..." रेवा सौम्य बोलली.**

निरव शांतता पसरली काहीकाळ. आणि मग त्या शांततेला भंग करत एक टू-व्हीलर तिथं आली.

तुषार नवले तिथं आला होता. बाईकच्या आवाजाने विक्रांत व रेवा यांच्या विचारांची तंद्री विस्कटली होती. दोघेही तुषारकडे वळले. ही टू-व्हीलर दुसरीच होती. त्याची बाईक पोलीस जमा जी होती...

तुषार हेल्मेट काढून बाईकला अडकवत विक्रांत व रेवाकडे आला. त्याला पाहून रेवा मात्र गोंधळली होती. विक्रांतला जणू तो तिथं अपेक्षितच होता. त्यामुळेच त्याला तुषारच्या इथं येण्याचे काहीच वाटले नव्हते.

वस्तुतः हेडकॉर्टर्समध्ये विक्रांत असतानाच फोनवरून विक्रांतने तुषारला इथं येण्यास कळवलं होतं. आणि तुषारला इथं पठारावर सोडण्याची इथल्या सुरक्षेसाठी तैनातीत उभ्या पोलिसांना सूचना देऊनच त्यांना ती जागा सोडून जंगलाबाहेर रस्त्यावर पहारे करत थांबण्यास सांगितलं होतं. आणि रेवा सोबत तो एकलाच इथं येऊन थांबला होता. विक्रांतला तुषार सोबत बोलण्यास एकांत हवा होता.

तो त्यांच्यापाशी स्थिरावल्यावर...

**"ही जागा कोणती आहे माहीत आहे?" विक्रांतने शांत धीरगंभीर अशी तुषारला विचारणा केली.**

गोंधळल्याने कपाळ आठ्यांनी भरलेल्या तुषारची नकारात मान हलली.

**"इथेच अदितीचा खून झाला आहे!" विक्रांतचा तोच धीरगंभीर आवाज.**

आधीच असलेल्या शांततेत भयाणतेची भर पडली. सगळेच स्तब्ध होते. सोसाट्याचा सुटलेला गार वारा त्यांचे केस व कपडे फडफडवत होते त्यांचाच काय तो आवाज...

नाही म्हणायला जनरेटरचा अंधुक, अस्पष्ट आवाज येत होता, परंतु जनरेटर मुख्य रस्त्यावर असल्याने त्याचा आवाज अगदीच नगण्य होता. मोठा जनरेटर ट्रक झाडांतून आत येऊ शकत नसल्याने तो बाहेरच ठेवून इथंवर लाईन टाकली गेली होती.

एकूणच जी शांतता होती, त्या शांततेत विक्रांत बोलला होता ती त्याची स्वरशांतताच तुषारसाठी मोठा स्फोट करून गेली होती.

तुषार जागीच हादरला. क्षणात त्याचे नेत्र तरळले. भावनिक नजरेने त्यानं त्या अभद्र जागेकडे पाहिलं.

**"तुम्हाला जे काही माहीत आहे, ते सांगाल अशी अपेक्षा करतो." विक्रांतची सूचक शांत नजर भावविभोर अशा तुषारकडे वळली.**

तुषार भानावर येत त्याने झटकन विक्रांतकडे बघितलं,

**"अदिती गेल्याचं मला पन खूप दुःखाय सर. जोतिबा डोंगरावर उभाय, खोटं नाई बोलनार. मी खरं सांगतोय, मला काय म्हाईत नाय!" तो रडवेला भावनिक बोलला.**

विक्रांतने भुवया उंचावून आपलं इरिटेशन व्यक्त केलं, त्याच्याकडून काही कळणार नाही हे विक्रांतने जोखलं.

**"तुम्ही येऊ शकता." त्याने निकाल केला.**

तुषार काही तिथं थांबला नाही मग.  तो लगोलग बाईककडे गेला. हेल्मेट घालून गाडीवर बसला. ती स्टार्ट करून वळवून निघून गेला तो...

विक्रांतही त्याच्या गाडीकडे चालला...

काळजीच्या छायेत रेवा त्याच्या मागून गेली,

**"सर, आपण यांना कस्टडीत का नाही घेत? गुन्हेगार असोत नसोत, आरोपी तर आहेतच..." तिने मनात धडकणारी शंका अखेर विचारलीच!**

**"वी निड अ स्ट्रॉंग एव्हीडेन्स. डीएनए रिपोर्ट येऊ देत. त्यासाठीच थांबलोय मी." विक्रांत ठाम बोलला.**

विक्रांत त्याच्या गाडीच्या बॉनेटवर बसला. अजूनतरी परतायचा त्याचा विचार दिसत नव्हता.

कामाचा सगळा विचार त्याने बाजूला सारला. डोकं जड होईल अशा गोष्टी समोर येऊन धडकत होत्या. मार्ग सुलभ होत नव्हता. उलट अजूनच किचकट होत चालला होता. विक्रांतला त्याच्या मगजला थोडा विश्राम द्यायचा होता. निचरा करायचा होता त्याला आलेल्या थकव्याचा...

रेवा त्याच्याकडे आली.

**"सीट." तो रेवाला त्याच्या बाजूस बसण्यास जागा निर्देशत बोलला.**

रेवा संकोचली. विक्रांतच्या हे ध्यानी आले. तो निर्मळ हसला,

**"बसा." आग्रह करत तो म्हणाला.**

ती त्याच्या बाजूला गाडीच्या बॉनेटवर स्थिरावली. विक्रांत दूर दिसणाऱ्या शहरांतील मनमोहक लाईट्स पाहत बसला होता. नेत्रांना सुख देणारं ते नियरम्य दृश्य त्याच्या मनाला आणि डोक्याला शांत व थंड करत जात होतं.

या रजनीच्या सौंदर्यात अजून भर पडली असती, ती चांदण्यांनी... परंतु मागे स्पॉट लाईट्स असल्याने चांदण्या अंधुक दिसत होत्या. रात्रीच्या आभाळ चादरीवर पसरलेल्या चांदण्यांचा सडा म्हणावा तसा सुस्पष्ट दिसत नव्हता. त्यांच्या तेजस तेजल प्रकाशास कृत्रिम प्रकाशाने बाधित केलं होतं.

**"सर... एक विचारू?" रेवा संकोचत बोलली.**

**"गो अहेड." विक्रांत मोकळ्या, हलक्या मनाने म्हणाला.**

**"आपलं डिसमिसल..." रेवा संकोचत हळू आवाजात बोलली.**

आपल्या प्रश्नाने विक्रांत दुखावला जाऊ नये या भीतीने तिने वाक्य पूर्ण केलं नव्हतं. विक्रांतच्या भूतकाळाविषयी विचारण्याचं तिचं कारण हे तिची त्याच्याबद्दलची काळजी इतकंच होतं. विक्रांत हे समजून घेईल की नाही... आणि रागावला तर... ही भीतीही कुठेतरी होतीच तिला.

मात्र असं काहीच झालं नाही. ना विक्रांत दुखावला, ना नाराज झाला, ना रागावला...

**"मला त्याबद्दल बोलायचं नाही. होप यु'इल् रिस्पेक्ट माय प्रायव्हसी." तो शांतपणे इतकंच बोलला.**

हे बोलत असताना त्याचं मुखमंडल कमालीचं शांत होतं. तो हसतमुख होता. त्याला सहानुभूती नको होती. तो स्वतःबद्दल खूप अभिमान बाळगून होता

असं नाही. तर त्याला स्वाभिमानचं जिणं हवं होतं. म्हणून तो कोणाला आपला पूर्वेतिहास सांगू इच्छित नव्हता.

**"सॉरी सर..." रेवा दिलगीर बोलली.**

**"डोन्ट बी." विक्रांत निर्मळ हसला.**

त्याचा आनंदी, शांत मूड पाहून रेवाने भिस्त बाजूला सारून आणखी एक विचारणा केली,

**"एक विचारू? आपण अगदी वॉर फ्रंटवर हे काम करण्याचं कारण?" तरी ती संकोचली होतीच नाही म्हणायला.**

तिला खरंच कळत नव्हतं, की इतकी तातडी का???

**"कारण मी तसं एका माऊलीला वचन दिलं आहे." विक्रांत गंभीर बोलला.**

**"कोण?" रेवाने गोंधळून विचारलं.**

**"अदितीची आई!" विक्रांतने शांतपणे उत्तर दिलं.**

आणि हे सत्यच होतं. महादेव मोहिते यांनी पोलिसांवर दबाव टाकलाय म्हणून निरंजन व अखिल कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंटला ठराविक मुदत दिली आहे याचं विक्रांतला काही सोयरसुतक नव्हतं. तो जे करत होता, ते फक्त आणि फक्त अदितीच्या आईसाठी. रमा मोहिते यांच्यासाठी!

या काटेरी फणसात अवीट मधुरता आहे हे रेवाला याक्षणी उमगलं.

रेवा तो जे बोलला ते ऐकून भावनिक झाली. कोणा तिऱ्हाईत 'आई'साठी त्याने अगदी आपला जीव पणाला लावला होता हे बघून तिला भरून आलं. द्रवलेल्या नयनांनी तिने विक्रांतकडे पाहिलं. विक्रांत मात्र निर्विकार होता.

**"बट फॉर् नाऊ, लेट्स रिलॅक्स." तो तिला म्हणाला.**

रेवाची मान मग दरीकडे फिरली. त्या एकाच दृष्टीक्षेपात त्या नेत्रसुख देणाऱ्या मनोहारी दृश्याने तिच्या मनावर ताबा घेत तिच्यावर मोहिनी टाकली. ती शांत झाली. तिच्या मनाची उद्विग्नता थंडावली.

थोडा वेळ शांततेत गेल्यावर...

**"ब्युडफुल..." विक्रांत तृप्त कंठाने उद्गारला. त्याच्या डोळ्यांत व मुखावर कमालीची शांतता होती.**

आपसूक त्याच्याही नकळत उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले होते.

**"अं?" रेवाने दचकून त्याच्याकडे बघितलं.**

मागे आपला जसा गैरसमज झाला होता, तसाच तिचाही गैरसमज झाल्याचं तिच्या उद्गगाराने तंद्री भंगलेल्या त्याच्या ध्यानी आलं.

**"मी समोरच्या दृश्याबद्दल बोलतोय." तो हसून म्हणाला.**

रेवाही मग मनमोकळी हसली. तीही रिलॅक्स होत पुढे ते सूंदर दृश्य पाहू लागली...

आणि मग या वातावरणात अधिकची भर घालण्यासाठी म्हणून विक्रांतने गाडीतल्या स्पीकरवर सत्तरीतली एक दृदयद्रावक ग़ज़ल सुरू केली...

तिथल्या वातावरणाने, समोरील मनभावन दृश्याने विक्रांत मनातून सुखावला होता. त्याच्या साऱ्या दुःखांचा, वेदनांचा, तणावाचा निचरा तात्पुरता का होईना झाला होता.

तृप्त सुखी मन आणि वेदनेने भरलेली ग़ज़ल परस्पर विरोधी असलं, तरी हे मिश्रणच इतकं भारलेलं विलोभनीय असं अल्हाददायक असतं, की तो स्वादानुभव घेत विक्रांत आनंदून गेला होता.

रेवाही तिच्या तणावांतून बाहेर आली होती. गार सुटलेला वारा तिच्या केसांशी चाळा करत होता.

या निवांत वातावरणाने आणि ग़ज़लच्या अल्हाद सुरावटींनी सुखावलेली ती आतून मात्र आपल्या बॉसच्या अशा गूढ व्यक्तिमत्त्वाचे स्वतःशीच आडाखे मांडत होती. त्याला जोखत होती...

तिचं मत आहिस्ते आहिस्ते याच्याबद्दल बदलत चाललं होतं, जे आपुलकीने भरत चाललं होतं...

◆◆◆

इमानेइतबारे दुसरा दिवस उजाडला. नित्यक्रम सूर्याला चुकलाय थोडीच...

विक्रांत डिपार्टमेंट् बाहेर दरवाजापाशी कॉरिडॉरमध्ये उभा होता. सुकृत व सना त्या दिशेने आले. सुकृतकडे एक रिपोर्ट होता. दोघे विक्रांतपाशी स्थिरावले. दोघांच्या मुद्रा जरा नाराजच. काय ते समजायला विक्रांतला विलंब झाला नाही.

तरी त्याने अटकळ नको स्पष्टता हवी म्हणून सगळं शब्दांत यावं यास्तव विचारणा केली,

**"रिजल्ट?"**

सुकृत नाखुश मान हलवत बोलला,

**"निगेटिव्ह!"**

सुकृतची ओळख झालेपासून विक्रांत प्रथमच त्याला असा पाहत होता.

त्याने रिपोर्ट्स विक्रांत समोर धरले. विक्रांतने चेहऱ्यावरची रेषही हलू न देता ते रिपोर्ट्स सुकृतकडून खेचून घेतले. सुकृतवर त्याची नाराजी नव्हती. त्याला परिस्थितीचा थोडा कड आला होता.

आवेशाने दार ढकलून तो दालनात गेला.

स्थानिक गुन्हे अन्वेषण कार्यालयात सर्व आपापल्या कामात. तुषारला खुर्चीवर बसवलं गेलं होतं. धाडकन दार उघडून विक्रांत आत आला.

**"सर, मला पुन्हा इथं का बोलवलंय? माझ्या ऑफिस मध्नं पन तुमाला कन्फर्म झालंय, की मी रात्रभर तितंच हुतो..." तुषार काकुळतीला आला होता,**

**"तुमच्या सारखं आसं बोलवन्यानं शेजारीपाजारी, ओळखीचे मला दोशी म्हनून बघाल्यात. माजी इमेज खराब व्हायल्या." तुषारचा उद्वेग सादर स्पष्ट होता.**

पोलिसांचा ससेमिरा लागल्याने समाजात त्याची किंमत कमी होत होती आणि त्याची त्याला घोर चिंता सतावत होती.

**"त्यासाठी मी माफी मागतो, पण त्याला आमचा नाईलाज आहे." विक्रांत संयमित मुखाने बोलला,**

**"आम्हाला असं कळलंय, की महादेव मोहिते तुम्हाला भेटले होते. का, ते कळेल?" त्याने तुषारला विचारलं.**

**"मला धमकी दिल्या तेंनी. अदितीचा खून मी केलाय आसं समोर आलं, तर माजा निकाल ते करतील म्हनून!" तुषार झिटलून हतबल बोलला.**

**"मग? नाही केला का?" विक्रांतने उगाच आरोप करणारा सवाल केला.**

**"सर!" तुषार अगतिक ओरडला. बोलून फायदा नाही पाहून तो मौन झाला.**

**"कुनाला समजवायचा पन आता वैताग आलाय. माणसं लावल्यात त्या मोहितेंनी माज्या मागं!" सगळं असह्य होऊन त्याची मान खाली गेली.**

**"तुम्हाला प्रोटेक्शन मिळेल. पण संशयाची सुई अजून तुमच्यावर आहे!" तुषारला काही माहीत असेल, तर अजूनही त्याने सांगावे म्हणून विक्रांत त्याला आठवण करून देत बोलला.**

आणि त्याने तुषारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करणारा प्रश्न केला,

**"तुमची बाईक तिथं काय करत होती ते सांगाल?" विक्रांतनं आवाज नॉर्मल ठेवत विचारलं.**

**"रात्री कुनीतरी नेली आसनार सर. कारन घरला परतल्यावर सकाळी मी बघितलं, तवा गाडीतलं पेट्रोल पन कमी दिसत हुतं, आणि बाईकला माती पन लागलावती. वाटलं मित्रांनी वगैरे कुनी निली आसंल आणि परत आनून लावली आसंल म्हनून मी लक्ष नाई दिलं... आनि हे पन माजं आदीच्या चौकशीत सांगून झालंय." तुषारने त्याच्या दृष्टीकोनातून परिस्थितीची जाणीव दिली.**

**"आणि तुमचे मित्र नाही म्हणतायत." विक्रांतने त्याला ठणकावलं,**

**"तुम्ही तुमची बाईक घेऊन ऑफिसवर जात नाही?" विक्रांतने प्रश्न केला.**

त्याला कुठली शंका बाकी ठेवायची नव्हती.

**"पंधरा मिनिटांच्या अंतरावर ऑफिसाय सर. चालत जातो." तुषारने स्पष्टता दिली.**

**"तुमचं आणि अदितीचं ब्रेक-अप झाल्यावर ती दुसऱ्या कोणासोबत रिलेशनमध्ये होती का हे तुम्हाला माहीत आहे?" विक्रांतने विचारलं.**

दीक्षाने अदितीचा मृत्यू झाला त्यावेळी तिचा बॉयफ्रेंड तिच्या सोबत असल्याचं सांगितलं होतं. जर तो हा नसेल, तर कोणी दुसरा...???

ही शक्यता विक्रांतला सोडायची नव्हती.

**"नाही. आमचं रिलेशन तुटल्यावर आम्ही एकमेकांशी अजिबात संमंध ठेवला नाई. त्यामुळं दोघांनाही एकमेकांच्या आयुष्यात काय चालुंय माहीत न्हवतं." तुषारने अंग झाडले.**

याच्याकडून काही कळण्याची आशा होती, तीही अखेर संपली होती. याच्याने काही मदत व्हायची नाही हे विक्रांतनं पुरे ओळखलं. किंतु विक्रांत जातीचा चिवट...

**"तुम्ही प्रेमात कसे पडलात?" त्याने पुढला प्रश्न केला. वास्तविक हा अगदी मागे नेणारा प्रश्न होता...**

**"आमी कॉलेजमदे एकत्र हुतो. तिथंच आमचं जुळंवतं." तुषारने आढेवेढे न घेता याचं उत्तर दिलं.**

**"तुमच्या व्यतिरिक्त तेव्हा अदिती अजून कोणाला आवडत होती अगर तिला अजून कोणी आवडत होतं असा तुमचा काही अंदाज?" विक्रांतचा सवाल.**

**"तिच्या मागे बरीच मुलं होती. पण ती माझ्याशी एकनिष्ठ होती हे मी पक्कं सांगतो." तुषार नकारात्मक ठामच होता.**

**"ब्रेकअप होऊन किती महिने झाले?" विक्रांतने पुढे विचारलं.**

**"सात." तुषारने नेमकं उत्तर दिलं.**

याच्याकडून हाती काहीच लागत नाही पाहून विक्रांतने त्याला रवाना करायचा निर्वाणीचा निर्णय घेतला.

**"तुम्ही जाऊ शकता." विक्रांत झणक्याने तुषारला म्हणाला.**

**"कृपा करून आता परत बुलवू नका." तुषार विक्रांतला हिदायत देत बोलला.**

तो खाली मान घालून निघून गेला. विक्रांतची चिडखोर नजर त्याच्यासोबत फिरली होती. तो गेल्यावर मग विक्रांत लोकल क्राईम ब्रँचच्या ऑफिसर्सकडे वळला.

**"अंकिता! रिव्हॉल्वर पजेसर्सशी माहिती गोळा करायला सांगितलेली. काय झालं?" विक्रांतने त्याचा तडाखा चालू केला.**

अंकिता रिपोर्ट्स अक्षरशः घेऊन पळत आली.

**"हे सर." ती बोलली.**

विक्रांत काळजीपूर्वक ती कागदं पाहू लागला.

**"आणि कार्ट्रेजेसच्या बायर्सची लिस्ट." रिपोर्ट्स पाहतच त्याने विचारलं.**

**"त्यातच खाली आहे सर." अंकिताने तत्परता दाखवली.**

विक्रांत खालील पेजेस पाहू लागला.

मग दोन्ही लिस्ट्स टॅली करू लागला. आणि त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत गेले. त्याला काहीतरी गवसलं होतं!!!

**पण जे सापडलं होतं ते नक्की काय, होतं काय ते...???**

# ९. मोहीम प्रस्थान...

विक्रांत रेलिंगला टेकून उभारलेल्या एका व्यक्तीपाशी आला. त्याच्या सारखाच बस स्टॉपच्या रेलिंग टेकला. हर्बल सिगरेट काढून  तोंडात धरली व लायटरने ती पेटती केली.

विक्रांतच्या बाजूस उभारलेल्या त्या व्यक्तीने त्याच्याकडे पाहिलं. हे ध्यानात येऊन विक्रांतने खिशातून दुसरं पाकीट काढून त्यातली खरी सिगरेट त्या माणसाला ऑफर केली. तो मान हलवून नाही म्हणाला.

विक्रांतने त्यास आग्रह केला,

**"घ्या हो." मित्रत्व असल्यासारखा  तो निर्मळपणे जोर देऊन बोलला.**

आणि मनगटाला हेल देऊन स्वतःच एक सिगरेट पाकिटातून टॉस करून विक्रांतने वर काढली. त्या माणसाने मग ती घेतली. ओठांत धरली. विक्रांतने स्वतःच्या लायटरने ती पेटवली.

**"पावनं कोन म्हनायचं?" विक्रांतनं त्याला सहज विचारलं.**

**"सुधीर देसाई." तो माणूस हसून बोलला. आणि त्याने एक कश मारला.**

**"कुठं?" विक्रांतचा आणखी एक सहज प्रश्न.**

नेहमीप्रमाणे अलोट गर्दीने गजबजलेल्या कोल्हापूरच्या मुख्य बस स्थानकावर उभारलेला तो. वेळ घालवायचा म्हणून सोबतच्या व्यक्तीशी सहज बातचीत करावा तसं तो अनायासे बोलत होता त्याच्याशी...

**"गावी. तुम्ही?" सुधीर देसाई म्हणवणाऱ्या इसमाने धूर सोडत विचारलं.**

विक्रांतची मुद्रा हसतमुख होती.

**"एकाला न्यायला आलोय." तो स्मित करत बोलला.**

आणि सुधीर देसाईला काहीतरी आठवलं... तो झटकन सावरून ताठ झाला,

**"एक मिनिट! तुम्ही इन्स्पेक्टर विक्रांत ना?" त्याने आश्चर्याने उत्तेजित होत विचारलं.**

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचा प्रभारी असणारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रांत देशमाने असा त्याच्या बाजूला आऊट ऑफ नो वेअर येऊन उभारला होता याचा त्याला जरा झटकाच बसला होता. त्याची स्थिती पाहून त्याची हडबडाहट दूर व्हावी म्हणून विक्रांत गोड, निर्मळ हसला.

**"तुम्ही ओळखता मला?" विक्रांतने विचारलं.**

देसाई पण हसला.

**"न्यूजमध्ये बघितलेलं. म्हणून लक्षात राहिलं." तो म्हणाला.**

विक्रांत पुनः नितळ हसला.

**"दोन दोन पाकीटं?" सुधीर त्याच्या आणि विक्रांतच्या सिगरेट्सकडे निर्देश करत विचारत होता.**

विक्रांत हट्टहास करत हसला.

**"मी हर्बल ओढतो. दुसरी मित्रांना ऑफर करण्यासाठी जवळ ठेवतो." तो म्हणाला.**

**"भारी कन्ट्रोल आहे." सुधीर देसाई विक्रांतची प्रशंसा करत म्हणाला.**

**"कन्ट्रोल असता, तर हर्बल तरी कशाला वढली असती...?" त्याने मस्करी केली. परंतु त्यातही तो सत्यच बोलला होता.**

सुधीर हसला. आणि त्याने विषय बदलला.

**"काय ओ? त्या आमदाराच्या मुलीचा खूनी सापडला असं सांगत होते. खरंय का?" सुधीर देसाईने सतत चर्चेत असलेल्या केस विषयी विक्रांतकडे चौकशी केली.**

**"हा... खरंय." विक्रांत होकारत बोलला,**

आणि त्याने त्याच्याकडे बघितलं,

**"पण यापेक्षा अधिक मी तुम्हाला काही सांगू शकत नाही." तो हसून बोलला.**

देसाई पहिल्यासारखा मागे टेकला.

**"नाही बरोबर आहे." तो समजूतीचं म्हणाला.**

त्याची बोलणी सुरू असतानाच 'शाहूवाडी' नेमप्लेट असणारी बस येताना सुधीर देसाईंच्या नजरेत भरली. तो या एस.टी.चीच वाट पाहत होता.

**"हे घ्या आली माझी बस." सुधीर उच्चारला.**

तो विक्रांतकडे वळला,

**"बेस्ट ऑफ लक." हसून त्याने विक्रांतला केसच्या प्रोग्रेससाठी शुभेच्छा दिल्या.**

विक्रांत ओठांच्या कोनातून हसत,

**"यु टू." तो सुधीरला प्रतिक्रिया म्हणून म्हणाला.**

सुधीर स्मित करून बसकडे पळाला. नीट उभारत विक्रांतने त्याला मागून जलदीने आवाज दिला,

**"देसाई! ती सिगरेट फेकून द्या. पब्लिक ट्रान्सपोर्टमध्ये स्मोक करणं बॅन आहे!" विक्रांतने हसतमुख ओरडत सूचना केली.**

सुधीर देसाई वेंधळं हसला आणि त्याने सिगरेट फेकून दिली. एकवार त्या सिगरेटकडे त्यानं बघितलं. अन मग एस.टी.मध्ये शिरला.

काही जण उतरून आणखी दोन-चार जणं चढल्यावर बस निघून गेली. त्या बरोबरच एक टू-व्हीलर त्या बसच्या मागून गेली.

विक्रांतने पुढे जाऊन सुधीर देसाईने फेकलेली सिगरेट उचलली.

विक्रांत अर्धवट जळलेल्या सिगरेटकडे बघत स्वतःशीच बोलल्यागत म्हणाला,

**"खरं बोलतात एक्स्पर्ट्स; स्मोकिंग इज इंज्युरियस टू हेल्थ!" एक हसू त्याच्या ओठांवर तरळलं.**

ते रेवाला छद्मी भासून गेलं. दूरवर गाडीत बसून असलेली रेवा त्याच्या मागे आली.

**"तुम्ही सिगरेट पित नाही ना?" रेवाने भुवई उंचावून त्याला विचारलं,**

विक्रांतचा उपद्व्याप तिने गाडीतून बघितला होता.

विक्रांत हसला,

**"मी हर्बलच घेतली. पण दुसऱ्याला ती कशी ऑफर करणार?" तो साळसूद म्हणाला.**

आणि तिच्याकडे बघून तो हसला.

**"म्हणजे दुसऱ्याचे लंग्स खराब झाले तर चालतात? अं? सर?" रेवा उखडून विक्रांतला म्हणाली.**

तिच्या त्रागयात मस्करी होती, ती टर उडवत होती हे विक्रांतने नेमके ओळखले. विक्रांत पुन्हा मनमोकळं हसला. आणि तो सिगरेटकडे पाहू लागला,

**"लोकांची परिसर घाण करायची सवय काही जात नाही!" तो छद्मी हसला.**

◆◆◆

सुकृत फॉरेन्सिक लॅबमध्ये मायक्रोस्कोप खाली डीएनए पॅटर्न्स ऑब्जर्व्ह करत होता.

'तेच दोन एकसारखे डीएनए पॅटर्न्स स्क्रिनवर दिसत होते.'

सना देखील त्याला असिस्ट करायला तिथं हजर होतीच. विक्रांतची तशी सुचनाच होती. बऱ्याच वेळाने सुकृतने विक्रांतकडे पाहिलं... भाव खूपच गंभीर. एक गूढ असे वातावरण सुकृतच्या काही क्षणांच्या मौनतेने तिथं निर्माण झालं होतं...

**"मग? मास्टर? काय म्हणणं आहे?" विक्रांतने सुकृतला प्रश्न केला.**

सुकृत बावरून बोलला,

**"दे आर आयडेंटिकल..." तो कमालीचा गंभीर होता.**

घासलेटमध्ये ठिगणी पडावी आणि सगळं क्षणात झरझर भडकत जावं तसं झालं...

आणि विक्रांतच्या चेहऱ्यावर एक विजयी स्मित तरळलं. बाजूस उभारलेली रेवा आर्श्चयचकीत होऊन विक्रांतकडे पाहू लागली. त्याने लावलेला तर्क खरा ठरला होता. ओझं खाली झाल्यागत विक्रांतचा चेहरा उजळला होता.

सुस्मित विक्रांतने मोबाईल काढून लगेच एक फोन लावला,

**"सुमित, आपल्या पाहुण्यासाठी अरेस्ट वॉरन्टची व्यवस्था करा!" विक्रांत मोबाईलमध्ये दुसऱ्याच क्षणी सूचना करत होता.**

गुन्हेगार शोधून काढण्यासाठी, त्यांना जेरबंद करण्यासाठी विक्रांत अगदी कोणत्याही थराला जात असे, परंतु ते कायद्याच्या चौकटीत राहून! ती चौकट तो कधीच मोडत व उल्लंघत नसे!

जोवर त्याला खात्री होत नाही, तोवर तो कुणाला आत देखील घेत नसे... परंतु आता... त्याच्याकडे तसे भरभक्कम पुरावे संलग्न झाले होते...

◆◆◆

काही काळाच्या अवकाशाने विक्रांत एका सूंदर, प्रशस्त घराबाहेर उभा त्या दाराची बेल वाजवत होता.

त्याच्या हाती एक एन्वेलोप होतं. त्याच्या मागे रेवा आणि इतर क्राईम ब्रँच ऑफिसर्स उभे होतेच.

थोड्यावेळाने ते दार उघडलं गेलं. दार उघडणारा माणूस विक्रांतच्या ओळखीचा होता. विक्रांत त्याला ओळखीचा होता...

दाराच्या आतील बाजूस कोपऱ्यात दोन-चार प्रवासी बॅग्स तयार होत्या. निसटून जाण्याची त्या व्यक्तीची तयारी जोरात होती हे नदरेस पडून विक्रांतचे ओठ लांबट होत त्यांच्यावर स्मिताची लकेर आपसूक खेचत गेली.

**"इन्स्पेक्टर विक्रांत?! तुम्ही?" तो माणूस कचरत कसासा खोटं स्मित करत बोलला.**

**"कुठं जाताय वाटतं?" विक्रांत  भरलेल्या बॅग्स पाहत विचारत होता.**

**"हा... जरा... पण तुम्ही इथं...?" तो कसंतरी बोलला.**

**"काम होतं थोडं. जरा मदत कराल मिस्टर सुधीर देसाई? की मी म्हणू... जगत किल्लेदार?" विक्रांतने आपलं हसू अजूनच रुंद केलं. पाहणाऱ्याला ते राक्षसी वाटावं असं काहीसं ते भेसूर होतं.**

**"हे काय बोलताय..." तो गडबडला.**

विक्रांत दाराच्या बाजूस असलेल्या भिंतीकडे जरा वाकला, 'जगत किल्लेदार' लिहिलेल्या नेम प्लेटकडे बघून तो हसत म्हणाला,

**"अहो निदान नांवाची पाटी तरी बदलायची? का बायकोला तुमचं दुसरं नाव माहीत नाही?! हा... कसं माहीत असेल म्हणा? ते फक्त मला सांगण्यासाठी होतं, नाही का...?"**

**"तुम्ही काय बोलताय मला काही कळत नाही..." जगत हे अस्सल नांव असलेला सुधीर बचाव करत होता.**

विक्रांतला त्याच्या खोटेपणाची चीड आली नाही. त्याला उलट हसू आलं... स्वतःला वाचवण्यासाठी जगतची केविलवाणी धडपड विक्रांतला दिसत होती. वेळेगणिक जसंजसं जगत खोटं बोलत चालला होता, विक्रांतचं हसू अधिकच रुंदावत होतं.

**"कळेल! चला, तुमची सासुरवाडी तुमचा पाहुणचार करायला आसुसली आहे... बॅग्स भरलेल्याच आहेत." विक्रांत जगतला मस्करीच्या**

**सुरात बोलला. परंतु तो जे बोलत होता ती मस्करी नव्हती. ते सोळा आणे अस्सल होतं.**

'सुधीर देसाई' उर्फ 'जगत किल्लेदार' याला घेऊन जायलाच विक्रांत ही वरात घेऊन आला होता.

जगत प्राणांतिक घाबरला. त्याने घराचे दार लावू बघितलं,

**"मी कुठेही येणार नाही!" दार लोटत तो भयाने ओरडला.**

आता मात्र विक्रांत भयंकर गंभीर झाला. दार अडवण्यासाठी दारावर जोरात मारून त्याने जगतला दार बंद करण्यापासून रोखलं. जगत पूर्ण शक्तीनिशी दार झाकण्याचा प्रयत्न करत होता. विक्रांतने अडवून धरल्याने त्याच्यापुढे जगताचा जोर चालत नव्हता.

**"अदिती मोहिते यांच्या खुनाच्या आरोपाखाली इंडियन पिनल कोड सेक्शन तीनशे दोन अंतर्गत मी तुम्हाला अटक करतोय!" विक्रांत वज्रमुखी बोलला.**

**"सर, शुड वी सर्च फॉर् दि रिव्हॉल्वर?" रेवाने सुचवलं.**

**"नो निड." विक्रांत डोळे बारीक करडे करत उच्चारला.**

विक्रांतने कोटातून उजव्या हाताचे ग्लव्ह काढून उजव्या हाती घातलं. त्याने पुढे होऊन जगतच्या कोटच्या आतून रिव्हॉल्वर काढून घेतली व निरखली.

**"पॉईंट थ्रीटू! निशंक!" त्याने मॉडेलचे नांव वाचले. त्याची भेदक नजर जगतवर फिरली,**

**"एव्हीडेन्स साहेब मागे सोडून कसे जातील. नाही?" विक्रांत जगतकडे जळजळीत नजरेने पाहत बोलला.**

जगत दार उघडून समोर येताच त्याच्या छातीशी फुगीर झालेला कोट विक्रांतच्या डोळ्यांत भरला होता.

मागे न पाहताच विक्रांतने ती रिव्हॉल्वर रेवाकडे केली. रेवाने एव्हीडेन्स कलेक्ट करायची पॉलिथिन उघडून धरली. विक्रांतने रिव्हॉल्वर अलगद पॉलिथिनमध्ये सोडून दिली.

**"लेट्स गो." तो ऑर्डर देत बोलला.**

सगळे मागे फिरून गाड्यांकडे चालले. जगतला काही पर्याय उरला नाही. हतबल त्याला पोलिसांसोबत जाणे क्रमप्राप्त झाले.

विक्रांत जगतला घेऊन जात असताना विक्रांतची नजर आत गेली. जगतच्याही ते लक्षात आलं.

जगतने देखील आशेने व त्याहून अपराधी भावनेने आत पाहिलं. डोळे पाणावले होते त्याचे. कडा ओलसर झाल्या होत्या. पाण्याचा पापुद्रा जगतच्याही नेत्रांवर जमा झाला होता. त्याला घरातील ती व्यक्ती अंधुक दिसत होती.

आत जगतची बायको धक्का बसल्याने जडवत होऊन उभी जगतच्या अटकेचे ते तिच्यासाठी अविश्वसनीय दृश्य पाहत होती.

नवऱ्यासोबत फिरायला जायचंय म्हणून जगतची बायको गावी जाण्यासाठी नवीन साडी नेसून, नेटकी केशभूषा करून, मोजके, परंतु उंची दागिने लेवून सूंदर अशी सजलेली होती.

काही क्षणांपूर्वी अनेक सुखद आशांनी भरलेल्या बिचारीच्या नेत्रांच्या वाट्याला हे दुःखद चित्र आलं होतं.

तिच्या डोळ्यांत उभे पाणी गालावर घरंगळले होते, ते तिच्याही नकळत...

**तिच्यासाठी हे अनभिज्ञ होतं, की हे सर्व का घडतंय...???**

# १०. प्रतिस्थापना...

'स्थानिक गुन्हे अन्वेषण' संस्थेचं प्रशस्थ दालन!

ऑफिसात जगतला खुर्चीवर बसवलं होतं. निरंजन, रेवासह सर्व जण त्याच्या भोवती उभे ठाकले होते.

एव्हीडेन्सच्या कन्फर्मेशनसाठी सुकृतला देखील बोलवलं गेलं होतं. विक्रांत सुद्धा आता सगळं एक्स्प्लेन करण्यास तयार होता...

**"तर हा आहे अदिती मोहितेचा खूनी?" निरंजन यांनी शांतता भंग केली.**

**"येस सर!" विक्रांत जगतवर डोळे ठेवूनच होकारात बोलला.**

चिडलेला, परंतु हतबल  जगत फणकाऱ्याने खिजला,

**"मी काही केलेलं नाही. या तुमच्या ऑफिसरला वेड लागलं आहे. माझा काही संबंध नाही त्या अदितीशी! मी ओळखत पण नव्हतो तिला!"**

**"खोटं बोलू नका मिस्टर जगत." विक्रांत शांत बोलला,**

**"बरं मला सांगा, जर तुम्ही काही केलं नाही, तर आपल्या पहिल्या भेटीत तुम्ही मला खोटं नांव का सांगितलंत?" त्याची कोंडी करत विक्रांत हसला. पुढे म्हणाला,**

**"थोडं थांबा. तुमची बोलती आपसूक बंद होईल!"**

जगत गप्प झाला. आता आपण काही बोललो, तर ते आपल्या विरोधात नक्की जाणार हे त्याने ताडले. हा विक्रांत पक्की माहिती असल्याशिवाय आपल्याला उचलायचा नाही हे आतापर्यंत त्याने जोखले होते.

कारण असेच फक्त संशयाच्या जोरावर उचलायचे असते, तर विक्रांतने जगतला बस स्टॅण्डवरच उचलले असते हे त्याच्या ध्यानात आले. तो शांत राहिला...

विक्रांत निरंजनना म्हणाला,

**"सर, फक्त अदितीचाच नाही. मागील दोन वर्षांत झालेल्या रमा आणि निलोफर यांचे खून देखील यांनीच केले आहेत."**

विक्रांत तोंडून सत्य ऐकून निरंजन यांना धक्का बसला तो सावरण्यालिकडे!

**"व्हॉट?" निरंजन किंचाळलेच.**

बाकी सर्वजण ही गोष्ट आधीच माहीत असल्याने अविचल होते.

**"होय." विक्रांत शांत मुद्रेने पुष्टी देत म्हणाला.**

**"पण तू जगत किल्लेदार याच्यापर्यंत पोहोचलास कसा पण?" निरंजन यांना ही गोष्ट अजून अंधारात होती. ती जाणून घेण्याचा इच्छेने त्यांनी विक्रांतला विचारलं.**

आता विक्रांत थोडा उत्तेजित झाला, तो जरा दीर्घ स्मितेत हसला व म्हणाला,

**"नाऊ हिअर कम्स द इंटरेस्टिंग पार्ट. लेट मी एक्स्प्लेन एव्हरीथिंग! ऑर्डीनन्स फॅक्टरीतून जगत बद्दल माहिती मिळाली. त्याने तीन वर्षांपूर्वी**

**रिव्हॉल्वर खरेदी केली होती. आणि अदितीला मारण्यासाठी तिच्या खुनाच्या दोन दिवस आधीच त्याने ऑर्डीनन्सच्याच कानपूर फॅक्टरीतून गोळ्या विकत घेतल्या होत्या.**

**"ऑर्डीनन्स मधून साहेबांचा पत्ता व इतर माहिती मिळवली. आपले ऑफिसर्स अलर्ट होतेच म्हणून मिस्टर जगत यांना शोधणं अवघड गेलं नाही. जगत बस स्टॉपवर असल्याची लीड मिळाली. कळलं, की ते त्यांच्या मूळ गावी जात आहेत. मिस्टर जगत पुढे काय करणार हे मला बघायचं म्हणून मी त्यांना जाऊ दिलं, पण भक्कम पुरावा मिळावा म्हणून सिगरेटचा फार्स रचला.**

**"सुकृत व सना यांच्याकडून डीएनए मॅच झाल्याचं कन्फर्मेशन मिळताच जगत साहेबांच्या गावी पोहोचलो, तर महाशय बायकोला घेऊन पळून जात होते. रावसाहेबांनी बायकोला पण याचा पत्ता लागू दिला नव्हता, की ते अचानक गावी का परतले होते आणि पुन्हा त्यांना घेऊन गांव सोडून का चालले आहेत. मग यांनी खून केले असल्याबद्दल यांच्या पत्नीला माहीत असण्याचं कारणच नाही. असो..."**

**"मोटिव्ह?" निरंजन यांनी शंका व्यक्त केली.**

त्यांना विक्रांतवर शंका नव्हतीच मुळी. पण हा प्रश्न पुढे उपस्थित झालाच असता, त्यामुळे त्याचे भक्कम उत्तर तयार असणे आवश्यक होते.

विक्रांतनेही ते आधीच साधले होते. तो हसून विदित करत गेला,

"आहे. अदितीचं तुषार सोबत ब्रेक-अप झालं. आणि त्या दरम्यान तिला मानसिक आधाराची गरज होती, ती तिला दिली जगत यांनी!

"आता प्रश्न असा उभा राहतो, की अदिती आणि जगत संपर्कात आले कसे? तर; जगत हे महादेव मोहिते यांच्या कन्स्ट्रक्शन् साईट्सवर सुपरवायझर म्हणून काम करतात. यांच्यावर मोहिते यांचा प्रचंड विश्वास. अदितीने तुषारसाठी घर सोडलं, तेव्हा मोहितेंनी तिच्यावर लक्ष ठेवण्याचं काम जगत यांच्यावर सोपवलं. अदिती आणि तुषारचं ब्रेकअप झाल्यावर घर सोडल्यानं अदितीला घरी परतणं लाजिरवाणं वाटत होतं.

"या दरम्यान जगत अदितीला भेटत होते. अदितीला आधाराची गरज होती, त्यातून मग दोघांचे संबंध जुळले. अगदी शारीरिक जवळीक सुद्धा घडली. तुषारच्या बाबतीत आधीच पोळलेली अदिती, आताही तसेच होऊ नये म्हणून तिला जगत सोबत स्थिर आयुष्य हवं होतं.

"पण यात गोम अशी होती, की जगतचे लग्न आधीच झाले होते. तशात अदिती जगत कडून गरोदर राहिली. आपण गरोदर आहोत आणि होणाऱ्या बाळाचा बाप जगत असल्याने त्याच्या बायकोला डिवोर्स देऊन तिच्याशी लग्न करण्याचा तगादा अदितीने जगत यांच्याकडे लावला.

"मेख अशी होती, की जगत यांचं आपल्या बायकोवर नितांत प्रेम असल्याने त्यांनी सतत तो विषय टाळला. पण जेव्हा अदिती ऐकतच नाही म्हंटल्यावर यांनी तिला समजावून विश्वासात घेतलं आणि ज्योतिबा डोंगरावर त्या निर्जन पठारावर नेलं, आणि तिथं या महाशयांनी अदिती मोहिते यांचा खून केला!

**"आता यात माझी काही चूक झाली असेल, तर ती सुधारायला जगत स्वतंत्र आहेत." विक्रांतने कुटील हसून जगतकडे बघितले.**

घामाने थबथबलेला जगत खाऊ का गिळू अशा नजरेने अत्यंत चिडून विक्रांतकडेच पाहत होता. विक्रांतवर मात्र त्याचा अनुकूल वा विपरीत काहीच प्रभाव पडला नव्हता.

**"पण हे सगळं तुला कळलं कसं?" एक एक खुलासे होत असता निरंजन यांचं डोकं भण्ण तापलं होतं.**

**"कारण लग्न झालेलं असून हे अदितीशी रिलेशनमध्ये राहिले आणि जेव्हा बायको आणि अदिती यांच्यात निवड करण्याची वेळ आली, जगत साहेबांनी बायकोची निवड केली. आएम मोस्ट सर्टन, की पूर्वीच्या दोन्ही केसेस सुद्धा अशाच असतील." विक्रांतने स्पष्टता दिली.**

विक्रांतने पुनःश्च जगतवर सस्मित कटाक्ष टाकला.

**"एव्हीडेन्स आहेत?" निरंजन याचा थेट प्रश्न.**

शिक्षा तर्काच्या रडारवर नाही, तर सबळ, सज्जड पुराव्यांच्या आधारे होते. त्यासाठी पुरावे महत्त्वाचे होते शाब्दिक चुणूक नाही. कोर्ट पुरावेच पाहणार होते. नुसती शब्दपंची कोर्टाला उपयोगी नाही. तिला ते जुमानत नाही. सो, निरंजन यांनाही ते हवे होते. आणि म्हणूनच त्याची ही पृच्छा!

**"ते आहेत म्हणून तर यांना अटक करू शकलो." विक्रांतने स्मित केलं. तो पुराव्यांची चिकित्सा पुढे सांगू लागला,**

"जगत यांनी मी दिलेली जी सिगरेट ओढली होती, त्या सिगरेटमध्ये त्यांचे जे सलाईव्हाचे ट्रेसेस मिळाले, त्यातून मिळालेले त्यांचे डीएनए प्रोफाईल व सिगरेट वरील त्यांचे फिंगरप्रिंट् प्रोफाईल्स गाडीत सापडलेल्या फिंगरप्रिंट् आणि डीएनए प्रोफाईलशी मोअर दॅन नाईन्टी प्रसेन्ट जुळले आहेत.

"मी ऑफर केलेली सिगरेट साहेब माझ्यासमोर टाकायला तयारच नव्हते. यातूनच यांची धूर्तता स्पष्ट होते. मी मुद्दामच त्यांना तसं करायला सांगितलं, कारण हे सिगरेट घेऊन गेले असते, तर ती सॅम्पल मिळायला कठीण गेलं असतं.

"असो, मी सांगितलं म्हणून मला संशय यायला नको या खातर मन मारून यांना सिगरेट टाकायला लागली." विक्रांतने हसून एक कटाक्ष जगतकडे टाकला व निरंजनकडे पाहून पुढे बोलू लागला,

"क्राईम सिनवरच मी चेक केल्याप्रमाणं अदितीला सिगरेटची सवय नव्हती. म्हणजे जरूर ती सवय तिच्या खुन्यालाच असणार, कारण गाडीत सिगरेटची राख सापडली आहे. त्या धर्तीवर मी जगतला सिगरेट ऑफर केली. माझ्या आग्रहावरून त्यांनी ती घेतली आणि माझ्या खात्रीला बळ मिळालं. नंतर त्यांना जेव्हा अटक केली, तेव्हा त्यांच्याकडून जी रिव्हॉल्वर जप्त केली, जगत सोडून कोणाचेच फिंगरप्रिंट्स त्यांच्या त्या रिव्हॉल्वरवर नाहीत. आणि अगदी त्याच रिव्हॉल्वरनेच अदितीच्या डोक्यात सापडलेली गोळी चालवली गेली आहे हे बलिस्टिक रिपोर्ट वरून

**सिद्ध झालं आहे. तुम्ही राठोड यांच्याकडून कन्फर्म करू शकता." विक्रांत अधिक स्पष्टता देत थांबला.**

सुकृत विक्रांतच्या बोलण्याला पुष्टी देत निरंजन यांना म्हणाला,

**"विक्रांत सर म्हणतायत ते बरोबर आहे सर."**

**"तुमच्या समोर जो बसलाय सर, तो एक सायकोपॅथ आहे. तीन तीन होमिसाईड्स केल्यात त्याने!**

**"मुलींना जाळ्यात ओढायचं. त्यांचा फायदा घ्यायचा आणि त्या हट्ट करू लागल्या, की त्यांना संपवून टाकायचं!" विक्रांत कमालीच्या खोल गंभीर आवाजात ठसठशीत बोलला.**

चिडलेल्या त्याचा मोर्चा मग जगतकडे वळला,

**"काय बरोबर ना? पण बायको वर प्रचंड प्रेम. म्हणून तिला सोडवत नाही!"**

**"हे खरंय सर. विक्रांत सरांच्या सुचनेने आम्ही निलोफर आणि रमा यांच्या संबधितांशी बोललो. त्या सर्वांनी त्या जगतशी रिलेशनमध्ये होत्या हे कन्फर्म केलं आहे." सुमितने प्रमाण जोडले.**

**"इव्हन त्या दोन्ही केसेसमध्ये जे डीएनए व फिंगरप्रिंट् प्रोफाईल्स रजिस्टर झालेत. ते देखील यांच्याशी आयडेंटिकल आहेत." सुकृत विक्रांत आणि सुमितच्या बोलण्याला सत्य पुराव्यांची झालर चढवत बोलला.**

**"आणि सगळ्यांत मोठा पुरावा म्हणजे सर, अदितीच्या पोटातील अर्भक आणि जगत यांचे डीएनए एकमेकांशी जुळतायत." सनाने देखील विक्रांतच्या सांगण्याला बळकटी दिली.**

एकावर एक आघात होत असल्यासारखी ही विचित्र स्पष्टीकरणं ऐकून निरंजन एकूणच थकत चाले होते...

**"पण याने हे साधलं कसं? लेट्स बी स्पेसिफिक फॉर् अदिती फॉर् नाऊ!" त्यांना मोठा अचंबा पैदा झाला होता. परंतु केस न भरकटता तूर्त आदितीवर केंद्रित राहावी यावर त्यांनी कटाक्ष ठेवला.**

**"ओके सर." विक्रांतने एसपींची सूचना शिरी धरली व तो बोलू लागला,**

**"अदिती आणि जगत यांचं रिलेशन लपवायला जगतनेच अदितीला सांगितलं होतं. एकदा पहिलं रिलेशन फेल झाल्याने त्याबद्दल एक लाजिरवाणी भावना अदितीच्या मनी होतीच. त्यामुळे तिने या दोन्ही कारणांनी जगत सोबतच नवं रिलेशन सिक्रेट ठेवलं. अगदी आपल्या रूममेट पासून सुद्धा. पण एकत्र रहात असल्याने इतकं लपवणं शक्यच नव्हतं. मैत्रिणीला शंका आल्याने तिने अदितीला ती रिलेशनमध्ये आहे का असं विचारल्यावर अदितीने तिला सत्य सांगितलं होतं, पण तिने नांव मात्र मुद्दाम सांगितलं नाही. त्यासाठीची कारणं वर नमूद केलेली.**

**"पण अदिती जगत पासून गरोदर राहिल्याने ती जगतवर रिलेशन जगजाहीर करण्यासाठी प्रेशर टाकू लागली. या सर्व गोष्टी अदितीची रूममेट कोर्टातही सांगण्यास तयार आहे. तर अदितीची भुणभुण चालू**

असल्याने तिच्या पायी आपल्याला आपली पत्नी सोडायला लागू नये म्हणून जगतने तिला मारण्याचं पक्कं केलं. आणि त्यासाठी प्लॅनिंग सुरू केलं. अदितीला शांत करण्यासाठी आधी जगतनी तिला काही दिवस प्रेमाने वागून विश्वासात घेतलं. या दरम्यान अदितीचा खून करण्याची त्यांची तयारी चालू होती.

"जगत यांनी कानपूर फॅक्टरीतून 'पॉईंट थर्टीटू स्मिथ अँड व्हेसन' या नवीन बुलेट्स खरेदी केल्या. तुषार जो अदितीचा एक्स बॉयफ्रेंड होता, त्याचं टू-व्हीलर लायसेन्स चोरलं. अगदी अदितीचा खून करण्याच्या रात्री तुषार नवलेची त्याच्या घरी असलेली बाईकही जगत यांनी चोरली. ती आधी यांनी क्राईम स्पॉटवर नेऊन झाडांत लपवली. मग एका जुन्या सिम कार्डवरून अदितीला फोन लावला आणि भेटायला बोलावले. हे सिम जगत यांनी एका मोबाईल रिपेअरिंग शॉप मधून मिळवलं होतं. असा गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्या मोबाईल शॉप ओनरवर देखील कारवाई चालू आहे.

"असो. तर, अदितीच्या मनासारखं करण्याचं आश्वासन देऊन तिचा रुसवा काढायचं ढोंग करून जगत तिला तिच्याच कार मधून तिकडे निर्जन अशा ज्योतिबा डोंगराच्या पठारावर घेऊन गेले आणि तिला जीवे मारलं.

"मग तुषार नवलेचं लायसेन्स यांनी तिथंच सोडलं आणि तुषारची गाडी परत आणून तुषारच्या घरी लावली. यावेळी आपले फिंगरप्रिंट्स लायसेन्सवर आणि गाडीवर उमटू नयेत याची खास काळजी यांनी घेतली होती." विक्रांत बोलला व थोडं थांबला.

तेव्हा रेवा मधेच बोलती झाली,

**"घटना घडली त्या दिवशी रात्रीच्या बऱ्याच सीसीटीव्ही फुटेजेसमध्ये ही बाईक ज्योतिबा डोंगरकडे जाताना आणि परत येताना दिसलीये. फक्त त्यावरचा माणूस नखशिकांत काळ्या पोशाखांत असा झाकला असल्याने त्याला ओळखता येणं कठीण आहे. इतरवेळी हेल्मेटला विरोध करतील, पण अशावेळी गुन्हेगार अगदी इमानेइतबारे हेल्मेट वगैरे वापरतात!" माहिती देतच रेवाने विशेष अशी टिप्पणी सुद्धा केली.**

ती तिटकाऱ्याने जगतकडे बघत होती. विक्रांतला मोलाची साथ मिळाली होती, ती रेवाची. विक्रांत त्याच्या कामांत मश्गुल असताना त्याच्या सोबत असून देखील वेळ मिळेल तसा स्वतः तपास करून तिनेही या केस संदर्भात जमेल तशी पाळेमुळे खणून काढली होती. आणि वेळोवेळी विक्रांतला माहिती पुरवली होती.

आणि याबद्दल विक्रांतला रेवाचं मोठं कौतुक देखील होतं. ते त्याच्या डोळ्यांतून अगदी निखळ सुस्पष्ट असं व्यक्त होत होतं.

**"तुषार जगत यांच्यापेक्षा उंचीने जास्त म्हणून यांनी खून करतेवेळी ओव्हर साईज्ड् बूट घातले होते. जर पोलीस इन्क्वायरी झालीच, आणि जी होणारच होती; पोलीस तुषारच्या मागे लागणार होते."**

जगतकडे बघून विक्रांत हसला. मात्र त्याचं हे हसू जगतच्या सुपीक व बुद्धिमान डोक्याची प्रशंसा करणारं होतं, की त्याची कीव करणार होतं हे मात्र कुणाला सांगता येणं कठीण होतं.

**"प्लॅन तर चांगला होता, पण तुषारकडे परफेक्ट एलिबाय होता. ही गोष्ट जगत यांनी ध्यानी घेतली नाही. तुषार नवले हे ओव्हर टाईम करत असल्याने ते रात्रीभर ऑफिसमध्येच होते हे सांगायला त्यांचे किमान आठ-दहा कलिग्स आणि त्यांचे बॉस पण समोर येतील.**

**"शिवाय त्याचे आणि अदितीचे ब्रेक-अप होऊन सात-आठ महिने झालेत. त्यामुळे अदितीच्या गाडीत तुषारचे कोणतेही ट्रेसेस असणं शक्य नव्हतं. त्यावर अदितीने बऱ्याचदा गाडी धुतली असण्याची शक्यता आहे. त्यामुळेच तिच्या गाडीत अदिती आणि हे मिस्टर जगत सोडून कोणी बसल्याचे किंचितही ट्रेसेस नाहीत. अदितीच्या रूममेटचं सांगणं बरोबर होतं, की अदितीचा बॉयफ्रेंड कधीच रूमवर अदितीला भेटायला आला नाही, कारण तो तिच्या वडिलांचा एम्प्लॉयी म्हणून तिथं जायचा."**

**"एक शंका आहे. परवानगी असेल, तर..." रेवा म्हणाली.**

विक्रांत सह सर्वांनी तिच्याकडे नजर केली. विक्रांतच्या डोळ्यांत रेवाला परवानगी दिसली तशी ती विचारती झाली,

**"पिस्टल मधून रिकामी शेल बाहेर फेकली जाते, तसं रिव्हॉल्वर मधून नाही होत. रिकामी शेल चेंबरमध्येच राहते गोळी फायर झाल्यावर. मग आपल्याला शेल कशी सापडली? म्हणजे पूर्वी जे दोन खून झाले, तेव्हा अशा रिकाम्या शेल्स मिळाल्या नव्हत्या. म्हणजे खून केल्यावर रिकाम्या शेल्स तिथंच सोडणं ही जगत यांची खून करण्याची पद्धत नाही. मग आत्ता यावेळी जगत यांनी फुलप्रूफ प्लॅन करत असताना ही चुक करावी हे पटत नाही..." ती संभ्रम व्यक्त करत बोलली.**

विक्रांत हसला.

**"बरोबर आहे तुमचं मिस रेवा. ती चूक नव्हती, तर ती शेल जगत यांनी मुद्दामच मागे सोडली होती. तुषारकडे रिव्हॉल्वर आहे हे माहीत असल्यानंच अदितीचा खून करायला रिव्हॉल्वरच वापरायची हे जगत यांनी पक्कं केलं असेल. ती शेल मिळाल्यावर पोलीस तुषारलाच खूनी समजतील असा यांचा कयास होता. कारण तपासात तुषारकडे पोलिसांना रिव्हॉल्वर सापडणारच होती.**

**"आणि पोलीस तुषार पर्यंत पोहोचणार होते, जगत यांनी तिथे टाकलेल्या तुषारच्या लायसेन्स वरून. त्याला अडकवण्यासाठीच या गोष्टी तिथं प्लेस केल्या होत्या. तुषारचं हे काम असतं, तर आपलं लायसेन्स कार्ड हरवलंय हे लक्षात येताच तो घटनास्थळी आला असता ते शोधायला, पण मी बोलावण्यापूर्वी कधीच तो तिथं गेला नव्हता. यांना वाटलं, आपण हुशारी करतोय, पण हे मूर्खपणा करून बसले!" विक्रांतने कीव करणारी नजर जगतवर टाकली.**

**"म्हणजे ती रिकामी शेल सापडली नसती, तर जगत सापडले नसते?" नवख्या सुमितने प्रश्नार्थक आश्चर्याने विचारलं.**

**"नक्कीच सापडले असते. अदितीच्या डोक्यात सापडलेल्या गोळीच्या आधारे आपण यांच्या पर्यंत पोलोचलोच असतो. पद्धत सेमच असती तपासाची." विक्रांत त्याचं ठेवणीतलं हसला.**

**"या पूर्वीचे दोन्ही खून पण तर जगत यांनी रिव्हॉल्वरनेच केले आहेत, तर इथं त्यांनी खास तुषारला अडकवायलाच रिव्हॉल्वर वापरली**

**असं कसं म्हणता येईल? ही त्याची मोडस ओप्रेंडीच आहे ना...?" अंकितानं शंकीत विचारलं.**

**"एग्जॅक्ट्ली! ही यांची मोडस ओप्रेंडी आहेच. कारण बंदुकीने समोरचा क्षणात मृत होतो. इट्स अ सेफ अँड इसी वे टू किल समवन. म्हणून तर गन्स खूप पॉप्युलर आहेत. जाऊ द्या. इकडे बघू. तरीही मी हेच म्हणेन, की  तुषारकडे रिव्हॉल्वर असणं यांच्या पथ्यावरच पडलं. तुषारकडे रिव्हॉल्वर आहे समजल्यावर यांनी हा खून पण रिव्हॉल्वरनेच करायचं ठरवलं. कारण यामुळे तुषारला अडकवणं अधिकच सोपं झालं होतं यांना." विक्रांत आपली तार्किक बाजू मांडत बोलला.**

**"मला एक सांग, या जगतला अदितीला मरायचंच होतं, तर तो तिच्यासोबत कारमध्ये असतानाच त्याने तिला का मारलं नाही? तो गाडीतून उतरून बाहेर गेला आणि मग त्याने फायर केलं. का?" सगळे आपलाली संदेह तृषा भागवत होते, तर निरंजन यांनीही आपल्या मनातील अढी विचारली.**

**"जवळून फायर करण्याचा प्रयत्न केला असता, तर अदितीला प्रतिकार करण्याची संधी होती. तिला पूर्णतः गाफील ठेवायचे होते म्हणून कदाचित. पण हा माझा अंदाज झाला. याचं उत्तर तर मिस्टर जगतच सांगू शकतील!" विक्रांत समंजस हसला.**

त्याच्यासह सर्वांनीच जगतकडे पाहिले. त्याच्या उत्तराची सर्वांनाच प्रतीक्षा होती. मात्र तो खाली मान करून गप्प होता. शून्यात नजर गाडून बसलेल्या त्याचा

मोठमोठा उष्ण श्वासोच्छ्वास सुरू होता. त्याचं मौन विक्रांतचा अंदाज खरा ठरवत होते...

आपला अजमास बरोबर आहे असं सुचवत विक्रांतने निरंजन यांकडे पाहिले. हे आगळं आक्रीत पाहून निरंजन यांच्या भुवया उंचावल्या, डोळे काही क्षण बंद झाले, मान डोलली गेली...

**"तुम्ही एक गोष्ट विसरलात मिस्टर जगत किल्लेदार, की; नो क्राईम इज ए परफेक्ट क्राईम!" विक्रांतने ठामपणे ठणकावले.**

विक्रांतची खोचक नजर पुन्हा जगतकडे गेली,

**"मिस्टर जगत!" तो मोठ्याने उद्गारला.**

डोळ्यांत अंगारे धुमसत खाली पाहणाऱ्या जगतनं ताडकन विक्रांतकडे वर बघितलं.

जगत जळजळीत डोळ्यांनी विक्रांतला पाहत होता. जगत भस्मासुर असता, तर त्याने आत्ताशा विक्रांतला उभ्या उभ्यानेच जाळला असता!

विक्रांत जगतची बेअब्रू करणं अजूनही थांबवत नव्हता. तो त्याचा अपमान करत बोलला,

**"पूर्वी दोनवेळा तुम्ही सुटला असाल; कारण त्यावेळी विक्रांत इथं नव्हता!" विक्रांत ठासून जगतला बोलला.**

विक्रांत विजयी मुद्रेने जगतला कमीपणा देणारं, त्याची अवहेलना करणारं स्मित करून त्याच्याकडे बघत होता.

निरंजनला हे सगळं ऐकूनच गरगरल्यासारखं झालं...

**"थांब. मला जरा बसू दे." निरंजन सहन न होऊन बुदबुदले.**

प्रमोद कडून त्यांना बसायला डेस्कची खुर्ची दिली गेली.

मग प्रमोदनेच डेस्कवरील पाण्याचा भरलेला ग्लास निरंजन यांना देऊ केला. निरंजन घटघट पाणी प्यायले व ग्लास जवळच्या डेस्कवर त्यांनी अक्षरशः आदळला.

आणि मोठमोठे श्वास घेत निरंजन यांनी खाली मान घालून रागाने धुमसत बसलेल्या जगतकडे नजर टाकली.

सदर महानाट्यावर पडदा टाकत मग विक्रांतनेच या प्रकरणासंबंधी निर्वाणीचे, अखेरचे शब्द काढले,

**"आणि अशाप्रकारे सर, आमदार साहेबांनी आपल्याला दिलेल्या मुदतीत आपण केस सॉल्व्ह केली आहे. त्यामुळे..." तो एसपी निरंजनकडे निर्देश करत त्यांना उद्देशून बोलला,**

**"आपली इभ्रत देखील तशीच शाबूत आहेत."**

◆◆◆

त्याचं काम संपलं होतं. 'नेकी कर दर्या में डाल!' या उक्तीला जागत विक्रांत पोलीस हेडकॉर्टर्स सोडून बाहेर चालत आला.

कदाचित तो आपल्या स्वतःच्या पूर्व प्रवासाला, स्वतःच्या पूर्व जीवनात एकटाच परत चालला होता.

ओठांत कँडी सिगरेट दाबलेली ती नेहमीसारखी. डोळ्याला कायमसारखा गॉगल. तो त्याच्या बाहेरच्या वाटेवर चालत असताना एसपी निरंजन यांनी घाईने येत त्याला हाक मारली,

**"विक्रांत!"**

विक्रांत मागे वळला. निरंजन त्याच्यापाशी पोहोचून...

**"तुझं रिक्रुटमेंट लेटर." 'आता तरी हे पत्र घे' असं सुचवत त्यांनी ते लखोटा बंद पत्र विक्रांतसमोर केलं.**

विक्रांत 'यातून आपली सुटका नाही' अशा भावनेने हसला.

**"आता दलदलीत पुन्हा उतरलोच आहे, तर बुडतोय असं ओरडून काय हाशील? आलिया भोगासी... असावे सादर." तो म्हणाला.**

तिकडे जगतला कोर्टासमोर उभा करण्यासाठी सुमित व कॉन्स्टेबल्स करवी नेलं जात असताना जगत रागीट चेहऱ्याने विक्रांतला बघत होता. अतीव द्वेष आणि तिरस्कार यांनी त्याचा मोहरा व्यापून गेला होता.

जगतला विक्रांत त्याच्या नदरंसमोर सहनच झाला नाही आणि झटापट करून पोलिसांच्या घोळक्यातून स्वतःची सुटका करून घेत त्वेषाने त्याने विक्रांतवर हल्ला चढवला.

हे पाहून त्या सर्वांच्या पाठी बाहेर आलेल्या रेवाचा श्वासच अडकला. इतर ऑफिसर्स देखील चक्रावले.

मागे होणारी हालचाल जाणवून विक्रांत सावध झाला होता.

स्वतःचा बचाव करण्यासाठी त्यानं प्रतिकारपर जगतला पाठीवर उचलून समोर आदळलं. याने अजूनच चिडलेल्या जगतने उठून विक्रांतवर हल्ला चढवला. दोघांची हातापाई सुरू झाली...

जगतला काही विक्रांतवर मात करणं या झुंजीत शक्य झालं नाही. विक्रांतने परत जगतला खाली पाडलं. आपला पाय त्याच्या पायाभोवती गुंडाळून दोन्ही हातांनी जोराचा हेल देऊन विक्रांतने जगतचा पाय मोडला!

आता तूर्तास इतक्यात तरी जगत विक्रांतवर हल्ला करण्याची अशी आगळीक पुन्हा करू शकणार नव्हता.

विक्रांतच्या बुद्धीचातुर्यासोबतच त्याच्या बाहुबलाचीही चव-प्रचिती जगतने आता चांगलीच चाखली होती.

कोर्टाचा निकाल लागल्यावर जगत काय कळंबा जेलची कोंदट हवाच खाणार होताच, सो तेव्हा सुद्धा बरा झाला तरी तो काही करू शकणार नव्हता...

निरंजन मात्र त्रागा व वैताग मुद्रेवर घेऊन होपलेस्ली विक्रांतकडे पाहत उभा होते. आपण एक वादळ कोल्हापूरात आणि तेही आपण आपल्याच पोलीस खात्यात भरलं आहे याची त्यांना प्रखर जाणीव होत होती...

विक्रांतने मात्र ही मोठी गोष्ट नसलेगत मस्करीत खांदे उडवले, कुत्सितपणे तो म्हणाला,

**"सॉरी. सेल्फ डिफेन्स!" तो स्वतःच्या बचावासाठी, परंतु त्याहून मस्करीच्या सुरात खट्याळ बोलला.**

आणि विक्रांतने लेटर निरंजन यांच्याकडून खेचून घेतलं व तसाच हात वर करून त्यांना सलाम ठोकला.

वैतागाने निरंजन यांच्या भुवया उंचावल्या. ते करू काय शकणार होते दुसरं? हा सैतान त्यांनीच तर पाचारण केला होता.

त्यांनी पुन्हा हतप्रभ मान डोलावली.

रेवाचा लटकलेला श्वास मोकळा झाला होता. ती देखील 'याचं काही व्हायचं नाही.' या आशयाचं होपलेस्ली मान डोलावून हसली.

इतक्यात सुमित, इतर ऑफिसर्स व कॉन्स्टेबल्स विक्रांतशी आले. अचानक जगतच्या या तिरसट प्रमादाने सगळेच कसे स्तब्ध झाले होते.

त्यांच्यासोबत स्तब्ध झालेली वेळ आता सक्रिय चलायमान झाली होती त्यांच्यासाठी...

**"घेऊन जा याला. पुन्हा असं होता कामा नये!" निरंजन त्यांना उद्देशून रागाने बोलले.**

त्यांचा हा राग जगतवर नव्हता फक्त. तर तो त्यांच्या सहकाऱ्यांवर देखील होता. त्यांच्या हातून गुन्हेगार सुटून एका पोलीस अधिकाऱ्यावरच हल्ला करतो, नी तेही आपल्यासमोर; ही गोष्ट कल्पनातीत होती त्यांना.

निरंजन यांच्या रागावर नाराज न होता आपली चूक मनाशी मान्य करून निरंजन यांच्या हुकुमाची तामिल करत जगतला ऑफिसर्स करवी नेलं गेलं. निरंजन यांनी विक्रांतशी मैत्रीपूर्ण हातमिळवणी केली.

विक्रांतने आरोपीचा पाय मोडला याच्या रागापेक्षा विक्रांत त्या आरोपीच्या हल्ल्यातून सुखरूप वाचला याचा त्यांना आनंद अधिक होता.

त्याहून अधिक याचा, की विक्रांतने ही नोकरी मनापासून स्वीकारली होती. त्याच्या चेहऱ्यावरचं निर्भेळ हसूच याचं द्योतक बनून पुष्टी देत होतं.

**"यु हॅव डन इट एट लास्ट." निरंजन विक्रांतला कौतुकास्पद बोलले.**

**"एकट्याने नाही. मिस रेवा आणि आपले बाकीचे टीम मेंबर्स यांची देखील मोलाची मदत झाली. इट वॉज ए टीम एफर्ड्!" विक्रांतने स्मित केलं.**

सदर खून प्रकरणाच्या सुरवातीला स्वतःहुन एकट्याने काम करण्यावर भर देणाऱ्या विक्रांतला टीमवर्कचं महत्त्व अखेरीस येताना ज्ञानात आलं होतं...

स्थानिक गुन्हे अन्वेषणचा वरिष्ठ प्रभारी असून सुद्धा तपास करताना विक्रांतची एकट्याने फिल्ड्वर, वॉर फ्रंटवर राहण्याची केलेली निवड ही त्याच्या स्वतःवरील अभिमानाने व दुसऱ्यांना तो कमी लेखतो म्हणून आलेली नव्हती, तर पूर्वी जे घडलं, त्या इतिहासाची पुनरावृत्ती, पुनर्निर्मिती होऊ नये या भावनेतून आली होती.

यामुळे तो कोणालाही तुसडा वाटला असावा, परंतु हे लोकांवर असणाऱ्या प्रेमातून आलेले होतं, आपल्यामुळे कोणावर पुन्हा संकट येऊ नये म्हणून तो लोकांना दूरच ठेवत होता, फिल्डवरून आणि स्वतःपासून देखील...

सद्य प्रकरणात अदितीने जीव गमावला, परंतु या घटनेने विक्रांतला पुन्हा माणसांत आणलं होतं... लोकांपासून दूर दूर राहणारा विक्रांत थोडा का होईना खुलला या शोध प्रवासात... त्याचं प्रमाण किती हे त्यासच ठाऊक, किंतु त्याच्यातील बदल नक्कीच सकारात्मक होता...

**"बाय द वे; काँग्रेच्युलेशन्स. यु हॅव क्रिएटेड् युअर फर्स्ट एनिमी इन थिस टाऊन." निरंजन विक्रांतला हसतमुखाने बोलले.**

विक्रांत लहान मुलाच्या निरागसतेने हसला.

आपल्या बॉसला मनमोकळं हसताही येतं हे प्रथमच रेवाला कळत होतं...

●●●

महत्त्वपूर्ण सूचना :-

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

© All kind of copyright solely remains to the writer Suraj Kashinath Gatade.

# सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf

७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf

९) तूमाझासांगाती - (सायन्सफिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tu_majha_saangaati_suraj_gatade.pdf

१०) वृत्र (सायकॉलॉजिकल/एक्शन/मिस्ट्री/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vrutra_suraj_gatade.pdf


११) अ प्योर वन


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/the_pure_one_suraj_gatade.pdf

१२ ) अंतःपूर


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/antahpur_suraj_gatade.pdf



सूरज गाताडे


अ हेवी प्राईझ



सूरज गाताडे
द पॅरासाईट



सूरज गाताडे
दै
किस
बाय मिस्टेक


सूरज गाताडे
डेथ विल


सूरज गाताडे
डेडली मीटिंग्ज



सूरज गाताडे
अंतःपूर


सूरज गाताडे
वृत्र


सूरज गाताडे


सूरज गाताडे
फ्लेम


सूरज गाताडे
X


सूरज गाताडे
'अ प्योर् वन-दि एप्रिल चेज्!'